सभापतीस्थानी - माननीय सभापती

तोंडी उत्तरे

-ंदूरबार जिल्ह्यातील बाहेरपुरा येथील एज ा ज्भवती महिलेस हुंड्यासाठी तिच्या पतीसह जाळज्याची घडलेली घट-ा

* 1871 **श्री. जयंत पाटील , श्री. जुरुमुज ा जाजवा , श्री. प्रतापराव सो खजे , श्री. ि ी जडज री , श्री. पांडुरंज फुंडज र , श्री. श्रीज ंत जोशी , श्री. मधुज र चव्हाज** : स-मा-ा-नीय उप मुज्य मंत्री पुढील जोष्टींचा ज ुलासा ज रतील ज ाय :-

(1) -ंदूरबार जिल्ह्यातील बाहेरपुरा येथील एज ा ज्भवती महिलेस हुंड्याच्या माज्जीसाठी तिच्या पतीसह जाळज्याची घडलेली घट-ा दि.27-12-2004 रोजी वा त्या सुमारास घडल्याचे शास-ाच्या ि दर्श-ास आले वा आजज्यात आले हे जरे आहे ज ाय,
(2) असल्यास, उक्त प्रज रजी शास-ा-े चौज शी ज ेली आहे ज ाय,
(3) असल्यास, चौज शीचे ि ष्ज र्ष ज ाय आहेत व तद्-ुसार दोषी व्यक्तींविरुध्द शास-ा-े ज ोजती ज ारवाई ज ेली वा ज रज्यात येत आहे ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांचेकरिता : (1) सदरहू महिलेस तीच्या पती-े हुंडयासाठी जाळज्याची घट-ा घडली हे जरे आहे.
(2) होय.
(3) सदर प्रज रजातील मृत उज्वला मराठे हिचे चार वर्षापूर्वी लज ा झाले होते ती-े माहेरु-ा दिराच्या -ोज रीसाठी 10,000/- रु. व पतीच्या -ोज रीसाठी 50,000/- रु. आजज्याची माज्जी सासरच्या मंडळीं-ी ज ेली होती. ती पूर्ज ज ेल्या-ंतर तीला माहेरु-ा घर बांधज्यासाठी 50,000/- हजार रुपये आजावेत अशी माज्जी सासरच्या लोज ां-ी ज ेली होती ती पूर्ज -ा झाल्या-े तीचा पती, दिर व सासू यां-ी संज ा-मत ज रु-ा तीच्या व तिच्या दीड वर्षाच्या मुलीच्या अंज ावर रॉज ेल टाज ू-ा त्यां-ा जाळू-ा मारल्या-े ि ष्पन झाले आहे. सासरच्या मंडळीज डू-ा तिचा शारीरिज व मा-ासिज छळ होत होता असे तपासात ि ष्पन झाले आहे. सदर प्रज रजी -ंदुरबार शहर पोलीस ठाजे येथे वर्ज 5 ज ु.र.-ं.185/2004 भा.दं.वि.ज .302, 498 (अ) (ब), 34 प्रमाजे ज ु-हा दाजल ज ेला आहे. ज ु-ह्यातील ती-ही आरोपीं-ा अटज ज रु-ा त्यांच्या विरुध्द दि.14.3.2005 रोजी -ंदुरबार येथील -यायालयात दोषारोपपत्र दाजल ज ेले आहे. प्रज रज -यायप्रविष्ठ आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : अध्यक्ष महाराज, ही घटना घडली तेव्हा वा त्यापूर्वी या मृत महिलेच्या कोणा नातेवाईकांनी पोलिसांकडे त्या संदर्भात तक्रार केली होती काय ? असल्यास, पोलिसांनी त्या बाबत कोणती दक्षता घेतली होती ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, चार महिन्यापूर्वी या महिलेच्या संदर्भात पोलिसांकडे कोठलीही तक्रार कोणीही केलेली नव्हती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : अध्यक्ष महाराज, महिलांवरील अत्याचारा संबंधातील हा गंभीर प्रश्न आहे. 1994 च्या महिला धोरणामध्ये अशा सूचना आल्या होत्या की, जेथे जेथे कुटुंबामध्ये असे प्रश्न आहेत ते सोडविण्यासाठी दक्षता समिती नेमल्या जाव्यात. आता मंत्री महोदयांनी सांगितले की, सदर महिलेच्या बाबतीत अशी कोणतीही तक्रार त्या महिलेने स्वत: वा तिच्या माहेरच्या कुटुंबियांनी केलेली नव्हती. परंतु प्रत्येक पोलीस ठाण्याच्या अखत्यारित आपण दक्षता समितीची नेमणूक केलेली आहे. तेव्हा त्या दक्षता समितीकडे आपण व्यापक जबाबदारी टाकणार काय की, त्या समितीने अशा प्रकारे कोणा कुटुंबात प्रश्न असतील तर ते सोडविण्याचे प्रयत्न करावेत. त्या दृष्टीने दक्षता समितीला व्यापक अधिकार आणि अनुदान दिले गेले पाहिजे जेणे करून अशा कुटुंबापर्यंत ती समिती पोहोचून योग्य ती प्रतिबंधात्मक उपाय करू शकेल. तर असे काही आपण करणार आहात काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, दक्षता समितीकडे तक्रार आली तर निश्चितपणे समिती कडून त्याबाबत लक्ष घातले जाईल, तेवढे अधिकार त्यांना निश्चितपणे दिलेले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, ही घटना 23.12.2004 ला घडलेली आहे. त्यानंतर या घटनेसंबंधातील तक्रार पोलीस ठाण्यामध्ये कोणी केली ? आणि तक्रार आल्यानंतर सदर महिलेची मृत्यूपूर्व जबानी झालेली आहे काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, 23.12.2004 ला ही घटना घडली आणि त्यानंतर म्हणजे 27 तारखेला मयत महिलेच्या वडीलांनी ही तक्रार केलेली आहे. मात्र मयत महिलेची मृत्यूपूर्व जबानी झालेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : अध्यक्ष महाराज, या प्रकरणातील आरोपींना जामीन मिळाला आहे का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, मी असा प्रश्न विचारला होता की, मयत महिलेची मृत्यूपूर्व जबानी झालेली होती काय ? असल्यास, त्यामध्ये तिने काय सांगितले आहे ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, मी यापूर्वीच सांगितले आहे की, सदर महिलेची मृत्यूपूर्व जबानी झालेली आहे आणि त्यामध्ये तिने सांगितले आहे की, तिला नेहमीच माहेराहून पैसे

..... ए 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणण्यासाठी त्रास दिला जात होता आणि ही घटना घडण्यापूर्वी देखील तिला माहेराहून 50 हजार रुपये आणण्यास सांगितले होते पण ती ते आणू शकली नाही म्हणून तिला पेटवून दिले गेले.

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, आता मंत्री महोदयांनी सांगितले की, अशा प्रकारे दक्षता समित्या सर्वत्र उपलब्ध आहेत. तर महाराष्ट्रामध्ये वारंवार अशा घटना घडत आहेत. तेव्हा राज्यातील सर्व प्रमुख ठिकाणी या दक्षता समित्या उपलब्ध आहेत काय ? आणि त्या योजनेत आल्या आहेत काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, ही माहिती आता माझ्याकडे नाही, मी ती सभागृहाच्या पटलावर नंतर ठेवीन.

सभापती : दक्षता समिती अशा प्रकारे प्रत्येक ठिकाणी असणे आवश्यक आहे. ते बंधनकारक असल्यामुळे त्या कशा तातडीने स्थापन होतील हे आपण पहावे. जेणे करून हे असे प्रकार टाळण्यासाठी प्रयत्न त्यांचेकडून केले जावेत.

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महाराज, आपणच मंत्री महोदयांना हे सांगितले ते उचित झाले. पण मंत्री महोदयांकडे आता ही माहिती नाही तर मग कशाच्या आधारे त्यांनी असे स्टेटमेंट केले की, दक्षता समित्या आहेत म्हणून.

श्री. सिद्धराम म्हेत्रे : दक्षता समित्या आहेत, पण सर्वच ठिकाणी आहेत की नाही याची माहिती आता माझ्याकडे नाही.

****

(यानंतर श्री. जागडे .... बी 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड-लाहेरी मार्गावरील धोडराज या गावाजवळ नक्षलवाद्यांनी केलेला हल्ला

(२) * ४९०१ श्री. नातिकोद्दीन खतिब : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील ज्ाय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड-लाहेरी मार्गावरील धोडराज या गावाजवळ नक्षलवाद्यांनी दि-ांज २२-२-२००५ रोजी वा त्या सुमारास केलेल्या हल्ल्यात भामरागड पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक व पाच पोलिस मृत्यु पावल्याची घटना घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार नक्षलवाद्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) उक्त घटनेतील मृत पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना व जखमी व्यक्तींना शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) होय.

(३) सदर घटना भामरागड दलम, अहेरी दलम व पेरमीली दलमच्या नक्षलवाद्यांनी संगनमत करुन घडविलेली असून सदर नक्षलवाद्यांविरुध्द भादंवि,भारतीय हत्यार कायदा व सार्वजनिक मालमत्ता नुसान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) सदर घटनेत मृत्यू पावलेले पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रु.नुकसान भरपाई, पाच हजार रु.सानुग्रह अनुदान व पन्नास हजार रु. संजीवनी निधी तसेच शिल्लक रजा रोखीकरणाची रक्कम अदा करण्यात आली आहे, तसेच शहीद पोलीसांना गटविमा योजना, मृत्यू-ि-सेवा उपदान, अपघात विमा व कुटूंब निवृत्ती वेतनाची रक्कम मिळण्याबाबतही कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मला उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. प्रश्न क्र. 1 चे उत्तर पुढीलप्रमाणे वाचावे. (1) होय. तथापि मृत पोलीस अधिकारी व कर्मचा-यांची संख्या 7 आहे. नंतर छापल्याप्रमाणे.

श्री. नतिकोद्दीन खतिब : सभापति महोदय, गडचिरोली जिले में नक्सलवादियों की मुहिम बहुत ज्यादा तेज हो गई है और इस साल हमारे पुलिस के कई जवान मारे गए हैं. यहां पर खास तौर से नक्सलवादियों के साथ अभियान शुरु किया गया था और ये पुलिस के लोग भामरागढ़ जा रहे थे तो नक्सलवादियों को इस बात की जानकारी कैसे मिली, क्या इस बात की जांच की गई है ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि जिन नक्सलवादियों ने यह कट रचा था, क्या वे पकड़े गए हैं ? मेरा तीसरा प्रश्न यह है कि पुलिस के जो जवान इसमें मारे गए हैं तो क्या उनके बच्चों को अनुकम्पा तत्व पर नौकरी दी जाएगी ?

. . . B-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4901. . . .

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलीस अधिकारी व कर्मचारी भामरागड येथे चालले होते. नक्षलवाद्यानी सुरुंगाचा स्फोट केला त्यामध्ये या अधिकारी आणि कर्मचा-यांचा मृत्यू झाला आहे. आता या बाबतची माहिती नक्षलवाद्यांना कोणी दिली, याचा तपास चालू आहे. यामध्ये मृत झालेल्या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांच्या कुटुंबियांना मदत करण्यात आलेली आहे.

सभापती : माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला होता की, मृत झालेल्या कर्मचा-यांच्या मुलांना नोकरीत सामावून घेण्यात येणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम मेत्रे : सभापती महोदय, वारसांना नोकरी देण्यात येईल.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, अनुकंपा तत्वावर नोकरीला घेणे ही बाब वेगळी आहे. माझा प्रश्न असा आहे की, मृत पावलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना मुलांना ताबडतोब नोकरीवर घेण्यात येणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम मेत्रे : सभापती महोदय, मृत झालेल्या अधिकारी आणि कर्मचा-यांची मुलांनी नोकरीची मागणी केल्यास त्यांना नोकरी देण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, या प्रकरणात आतापर्यन्त किती नक्षलवाद्यांना पकडण्यात आले आहे ?

श्री. सिध्दाराम मेत्रे : आतापर्यन्त एकालाही अटक करण्यात आलेली नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 22.2.05 रोजी ही घटना घडली आहे. या ठिकाणी सात पोलीस अधिकारी व कर्मचारी मयत झाले आहेत. हा प्रकार घडल्यानंतर माननीय मंत्रिमहोदयांनी त्या ठिकाणी भेट दिलेली आहे काय ? गृहमंत्री त्या ठिकाणी जाऊन आले असल्यास त्यांनी या बाबत कोणत्या सूचना दिलेल्या आहेत ?

श्री. सिध्दाराम मेत्रे : सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर मी त्या ठिकाणी गेलो नव्हतो. परंतु माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील त्या ठिकाणी जाऊन आले आहेत.

श्री. दिवाकर रावते : माननीय राज्यमंत्री माननीय गृहमंत्र्यांच्या वतीनेच उत्तर देत आहेत. त्यामुळे त्यांनी मंत्री म्हणून उत्तर दिले पाहिजे.

श्री. सिध्दाराम मेत्रे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील त्या ठिकाणी जाऊन आले आहेत. मृत झालेल्या अधिकारी आणि कर्मचा-यांच्या कुटुंबियांना मदत देण्यात येईल.

-- (यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गोरेगांव (मुंबई) येथील चित्रपट नगरातील

झालेल्या जैरव्यवहार प्रज रजी

(३) * १८९८ श्री. विलास अवचट , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनंत तरे , श्री. अरविंद सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. जगन्नाथ शेवाळे , डॉ. वसंत पवार : दि-ांज १५ डिसेंबर,२००४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या नवव्या यादितील प्रश्न क्रमांक ४१००५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (मुंबई) येथील चित्रपट नगरीतील झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी सुरु असलेली पोलिस चौकशी पूर्ज झाली आहे काय,

(२) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता: (१) -ाही.

(२) व (३) तपास चालू असून तो अंतिम टप्प्यात आहे.

C २..../-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

* 1898 .....

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, गोरेगाव येथील चित्रपट नगरीमध्ये झालेल्या गैर व्यवहार प्रकरणी प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाला जवळ जवळ एक वर्ष झाला तरी शासनाने स्टीरिओटाईप उत्तर दिले आहे. शासनाने या चित्रपट नगरीसाठी भूखंड उपलब्ध करुन दिला आहे, निधी दिला आहे, व सर्वतोपरी सहाय्य केले आहे. तरीही त्या ठिकाणी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार चालू आहे. शासन याची गांभीर्याने दखल घेत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, आपण ही चौकशी केव्हां सुरु केली, ती चौकशी पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे? कोणत्या प्रकारच्या गैरव्यवहाराची चौकशी सुरु आहे, त्यामध्ये कोण कोण सामील आहेत?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या चित्रपट नगरीमध्ये जो गैर व्यवहार झाला त्याकरिता महामंडळाची बैठक घेण्यात आली. आणि दि.12.11.2002 रोजी महामंडळाने तीन सदस्यांची एक समिती नेमली. त्या समितीचा अहवाल एप्रिल 2003 मध्ये आला. त्यावेळी व्यवस्थापकीय संचालक श्री. संगीतराव यांनी हे प्रकरण मुंबई पोलीसांच्या आर्थिक गुन्हे विभागाकडे चौकशीसाठी पाठविले. त्यांच्या चौकशीमध्ये काही निष्पन्न न झाल्यामुळे मार्च 2004 मध्ये हे प्रकरण अँटी करप्शन ब्युरोकडे शासनाने पुढील तपासाकरिता सोपविले आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, गेल्या वर्षी 16.3.2004 रोजी याच सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी शासनाने जे उत्तर दिले होते तेच उत्तर आज दिले आहे. या प्रकरणाची चौकशी एक वर्ष झाले तरी अजून पूर्ण झाली नाही . तेव्हा ही चौकशी किती कालावधीत पूर्ण करण्यात येईल, आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : हे आर्थिक व्यवहाराचे गुंतागुंतीचे प्रकरण असल्यामुळे ते अँटी करप्शन ब्युरोकडे सोपविले आहे. या पुढील तीन महिन्यात त्याची चौकशी पूर्ण केली जाईल. आणि चौकशी अहवालामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

सभापती : मंत्रिमहोदय, गेल्या वर्षी असाच प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी दिलेले उत्तर आणि आज दिलेले उत्तर यामध्ये फरक दिसत नाही. त्या दृष्टीने गृह विभागाने पुढील तीन महिन्यात या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून ही चौकशी पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव चव्हाण : या चित्रपट नगरीमध्ये किती पैश्याचा गैर व्यवहार झाला याबाबतचा खुलासा करण्यात येईल काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : 12 कोटी 63 लाख, 20 हजार 768 रुपयांचा गैरव्यवहार असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले आहे.

श्री. अनंत तरे : हे प्रकरण अँटी करप्शन ब्युरोकडे तपासाकरिता सोपविले आहे. त्यांनी किती लोकांना दोषी धरले आहे, व आतापर्यंत त्यांच्यावर काय कारवाई केली आहे?

सभापती : मंत्रिमहोदय, 12 कोटींच्या गैर व्यवहाराचे हे प्रकरण आहे. या प्रकरणाची वर्षभर चौकशी चालू आहे. आणि या चौकशीमध्ये आतापर्यंत किती आरोपींचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले आहे काय? अशाप्रकारचा माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : गोरेगाव चित्रपट नगरीतील गैर व्यवहारामध्ये त्या चित्रपट नगरीचा अकाऊंटट, एम.डी. आणि दुसरी एक सोहेल नावाची व्यक्ती अशा तिघांचा सहभाग त्यामध्ये असावा असे सत्कृतदर्शनी वाटते.

डॉ. नीलम गोऱ्हे : या गैर व्यवहाराची चौकशी चालू आहे असे उत्तर वारंवार आम्हाला मिळत आहे. मुळात एका बाजूला चित्रपट नगरीतील गैर व्यवहार चालू आहे...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1898 . . . .

डॉ.नीलम गो-हे . . . .

गेल्या वर्ष-दीड वर्षामध्ये गृह विभागाने तपासणी केली असेल तर, या चित्रपट नगरीच्या घोटाळया-मध्ये संबंधित असलेल्या अनेक आरोपींबरोबर शासनातील काही अधिकारी आणि काही मंत्री महोदय सुध्दा सातत्याने छायाचित्रामध्ये आणि व्हीडिओ मध्ये पाहुणे म्हणून एकमेकांबरोबर वावरत असल्याचे वाहिन्यांवर दिसते. म्हणजे एका अर्थाने गुन्हेगारीला राजाश्रय मिळाल्याचा पुरावाच आपल्याला या सर्व चॅनेल्स्वर गेल्या वर्षभरामध्ये सापडेल. तेव्हा या आरोपींबरोबर जे-जे लोक गेल्या वर्षभरामध्ये दिसलेले आहेत, त्या अधिका-यांना आणि शासनाच्या प्रतिनिधींना, अर्थातच मंत्र्यांना देखील या चौकशीमध्ये विचारणा करणार आहात का ? या आरोपींबरोबर दिसण्यामध्ये त्यांच्यावर बंदी घातली पाहिजे. नाहीतर एका बाजूला आम्हाला नाटक असल्यासारखी अशी उत्तरे देतात आणि दुसरीकडे वर्तमानपत्रात मंत्री महोदयांचे त्यांच्याबरोबर मोठमोठे फोटो छापून येतात. म्हणजे लोकांना तुम्ही बावळट समजता का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, हे प्रकरण फार गुंतागुंतीचे आहे. यामध्ये जे-जे संबंधित आहेत आणि ज्यांना चौकशीसाठी बोलवावे असे ए.सी.पी.ला वाटेल, त्यांची निश्चितपणे चौकशी करता येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खरे म्हणजे माझा प्रश्न वेगळा होता. पण सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई बोलल्यामुळे या प्रश्नाचे गांभीर्य अधिक लक्षात आले. कारण या महाराष्ट्रात पुन्हा ठकांबरोबर मंत्री असतात अशा प्रकारचा प्रचार करीत आमचे मागचे गृहमंत्री निवडणुकीमध्ये फिरत होते. म्हणून माझा असा स्पेसीफीक प्रश्न आहे. याठिकाणी पहिल्या प्रश्नामध्ये म्हटलेले आहे की, "गोरेगाव(मुंबई) येथील चित्रपट नगरीतील झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी सुरु असलेली पोलीस चौकशी पूर्ण झाली आहे काय ? तर त्याला "नाही" असे उत्तर दिले आहे. तेव्हा आपण कशाकशाची चौकशी करीत आहात आणि ते कोणकोणते घोटाळे झालेले आहेत? हे कृपया सांगू शकाल का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सुरवातीपासून फिल्मसिटी कडून "हम एक है" या कार्यक्रमासाठी जे-जे कार्यक्रम घ्यावयाचे होते, तर त्यांनी कोणाकोणाबरोबर करार केला आहे ? त्यात किती रक्कम दिली ? त्याची चौकशी सुरु आहे. इंटरनल डिलर्स्बरोबर करार करत

. . . .डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1898 . . . .

श्री.सिध्दाराम म्हेत्रे . . . .

असताना नियमांचे पालन केले की नाही आणि करारापोटी त्यांना किती पैसे देण्यात आले ? याची चौकशी सुरु आहे. नील मुद्राबरोबर कोणत्या प्रकारचा करार केला आणि किती पैसे दिले ? याची चौकशी सुरु आहे. "सोनी" चॅनेलकडून किती पैसे घेतले आणि त्या पैशाची व्हिलेवाट कशी लावली याची चौकशी सुरु आहे. गारमेट पेपर मिल्स्बरोबर त्यांनी कोणता करार केला आणि त्यांना किती पैसे दिले ? याची चौकशी सुरु आहे. व्हिडीओ ओशन ग्रुपला जाहिरातीसाठी किती पैसे देण्यात आले आणि ते कसे-कसे दिले ? तसेच मंडळाची परवानगी घेऊन दिले की नाही याची चौकशी सुरु आहे. या सर्व प्रकरणांची चौकशी करण्यासाठी वेळ लागणार आहे.

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

अमरावती शहरातील डॉ.भाऊसाहेब देशमुज यांच्या पुतळयासमोरील
पंचवटी चौज्ात उड्डाज पुलाचे बांधज्ाम

(5) * 1915 प्रा. बी. टी. देशमुज , श्री. कम्ह. यू. डायजव्हाजे , श्री. वसंतराव जोटरे , श्री. -ा-ासाहेब बोरस्ते , प्रा. शरद पाटील : दि-ांज 16 डिसेंबर,2004 रोजी सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आलेल्या अतारांज्ित प्रश्-ोत्तराच्या चौदाव्या यादीतील प्रश्-ा क्रमांज 41762 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात स-मा-न-ीय सार्वजन्िज बांधज्ाम (सार्वजन्िज उपक्रम) मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज्रतील ज्ाय :-

(1) अमरावती शहरामध्ये डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुज यांच्या पुतळयासमोरील पंचवटी चौज्ात उड्डाज पुलाच्या ज्ामाचे ज्ार्यारंभ आदेश (वर्ज ऑर्डर) मेसर्स जॅम-ा इंडिया या ज्ंप-ीला माहे ऑज्स्ट, 2004 मध्ये देज्यात आलेले आहे हे जरे आहे ज्ाय,

(2) असल्यास, ज्ार्यपूर्तीसाठी ज्ंत्राटदाराला ज्िती मुदत देज्यात आलेली आहे ?

(3) सदरहू प्रज्ल्पाच्या बांधज्ामाची सद्यक्स्थती ज्ाय आहेत ?

श्री.रविशेट पाटील श्री.अन्िल देशमुज यांच्याकरिता : (1) होय.

(2) 24 मह-ि

(3) 6 पिअर्सच्या 18 पाईल व 4 पाईल जॅप्स पूर्ज झालेल्या आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या उड्डाण पुलाचे काम सुरु झाले आहे. पण पाणीपुरवठा योजनेच्या लाईनमुळे तेथे पाईल घेण्यामध्ये काही अडचणी आल्या आहेत ही गोष्ट खरी आहे का ? जर अडचणी आल्या असतील तर त्या दूर झाल्या आहेत का ? कारण मी असे ऐकले आहे की, ही अडचण आली होती आणि त्यावर काही लाख रुपये खर्च होणार होता. पण तांत्रिकदृष्टया त्यातून मार्ग काढण्यात आला. त्यामुळे माझा पुन्हा पॉईंटेड प्रश्न असा आहे की, आपण जे पिअर्स घेतो, त्याकरता पाईल घेतो. पण तेथे पाणी पुरवठा योजनेच्या लाईनमुळे अडचण आली होती का ? जर अडचण आली असेल तर त्यावर काही मार्ग निघाला आहे का ?

श्री.रविशेट पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, यामध्ये काही अडचणी आल्या होत्या आणि त्या अडचणी दूर झाल्या आहेत. पंचवटी येथील उड्डाण पुलाच्या 20 पिअर्सच्या ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पाईप लाईन आडवी

. . . .डी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेट पाटील . . . .

आल्यामुळे थोडा उशीर झाला. पण आता ती अडचण दूर झाली असून कामाला गती आली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही अडचण दूर झाली असल्याने आता त्याबाबतीत मी पुढील प्रश्न विचारत नाही. पण या कामाच्या बाबतीत 24 महिन्याचे नियोजन केले आहे. तेव्हा 24 महिन्यामध्ये काटेकोरपणे हे काम पूर्ण होईल, याबाबतचे आदेश दिले जातील का?

श्री.रविशेट पाटील : सभापती महोदय, निश्चितपणे दिले जातील.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 2620

(मा. सदस्य अनुपस्थित)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांचे नाव पुढील तिन्ही प्रश्नांमध्ये आहे. मी त्यांना बाहेर लॉबीमध्ये पाहिलेले आहे. मला हे कळत नाही की, प्रश्न उपस्थित करतात आणि त्यासाठी सभागृहात उपस्थित का रहात नाहीत ? आपण त्यांना समज द्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती : याबाबतीमध्ये विरोधी पक्ष नेते, संसदीय कामकाज मंत्री,गटनेते यांना मी माझ्या दालनात सोमवारी बोलवेन आणि अशापध्दतीने प्रश्न उपस्थित करणारे सदस्य गैरहजर राहिले तर काय करता येईल, काय करणे आवश्यक आहे....

श्री.दिवाकर रावते : एका अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित करण्यास त्यांना बंदी घातली पाहिजे.

सभापती : याबाबत काय करणे आवश्यक आहे,याबाबत आपणा सगळ्यांशी चर्चा करुन त्याबाबतीत निर्णय घेण्यात येईल.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

मुंब्रा (जि.ठाणे) येथील देसाई गावांत पाडयात आलेली गावठी दारु

(7) * 1988 श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. यशवंतराव गडाख , श्री. धनाजी साठे , श्री. सुधाकर घारपुरे : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंब्रा (जि.ठाणे) येथील देसाई गावांत दिनांक 27.12.04 रोजी वा त्या सुमारास सुमारे 20 लाख रुपयांची गावठी दारु पाडयात आली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार हातभट्टीचा व्यवसाय करणा-या व्यक्तीविरुध्द कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांचेकरिता : (1) होय.

(2), (3) व (4) दिनांक 27.12.2004 रोजी देसाईगाव व त्याच्या जवळपासच्या पाडयामध्ये मुंब्रा पोलीस स्टेशन व क्राईम ब्रँचच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरित्या छापे टाकून रु.7,00,823/- ची साधने व गावठी हातभट्टी दारु जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यामध्ये 16 आरोपींना अटक करण्यात आली असून 2 आरोपी फरारी आहेत. फरारी आरोपींचा कसोशीने शोध चालू असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्री.सिध्दाराम म्हत्रे : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. उत्तराच्या (2), (3), (4) मध्ये पुढीलप्रमाणे वाचावे "दिनांक 27 डिसेंबर 2004 रोजी वा त्या सुमारास देसाई गाव व त्यांच्या आसपासच्या पाड्यामध्ये मुंब्रा पोलीस स्टेशन व क्राईम ब्रॅचच्या अधिका-यांनी संयुक्तरित्या छापे टाकून एकूण सुमारे 14 लाख इतक्या किंमतीची साधने व गावठी हातभट्टी दरु जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यामध्ये 30 आरोपींना अटक करण्यात आली असून 4 आरोपी फरार आहेत. सदर फरार आरोपींचा कसोशिने शोध चालू असून गुन्ह्याचा तपास चालू आहे." सुधारित उत्तरासह छापल्याप्रमाणे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सदर गुन्ह्यामध्ये 30 आरोपींना अटक करण्यात आली आहे. माझा या निमित्ताने पहिला प्रश्न आहे की,जे आरोपी अटक करण्यात आलेले आहेत ते अजूनही अटकेत आहेत की, त्यांना जामिनावर सोडण्यात आले ? जे फरार आरोपी आहेत, त्यांची नावे काय आहेत आणि चार महिने उलटून गेले तरी पोलीसांना ते अजून का सापडले नाहीत ? त्या संदर्भात पोलिसांनी कोणती कारवाई केलेली आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1988 (पुढे चालू....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणातील चार आरोपी फरार आहेत. श्री.कृष्णा म्हात्रे, दुसरे श्री.विष्णु गोविंद म्हात्रे, तिसरे श्री.अरुण भास्कर म्हात्रे आणि चौथे श्री.दशरथ विष्णु म्हात्रे, हे सर्व आरोपी फरार आहेत. अगोदरचे 16 आरोपी पकडले होते, त्या सगळ्यांना जामिनावर सोडलेले आहे.

श्री.अनंत तरे : गावठी दारु पकडण्यासाठी दोन महिन्यात जोरात धाडी पडल्या, त्यावेळी गावठी दारु बंद केली. माझा प्रश्न असा आहे की, धाडी टाकल्यानंतर त्या ठिकाणच्या दारुच्या हातभट्टया कायमच्या बंद केलेल्या आहेत काय ? दुसरे धाडी टाकल्यानंतर त्या हातभट्टया काही दिवस बंद केल्या. परंतु आजच्या तारखेला पुन्हा त्या सुरु झालेल्या आहेत. तेव्हा धाडी टाकण्याची मोहीम पुन्हा सुरु करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : धाडी टाकल्यानंतर हातभट्टया बंद झाल्यानंतर पुन्हा चालू झाल्या तर पुन्हा धाडी टाकण्यात येतील. घाडी टाकण्याची मोहीम ही पुढे चालूच रहाणारी आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, दिनांक 27-12-1.2004 रोजी देसाई गाव व त्याच्या आसपासच्या पाड्यामध्ये मुंब्रा पोलीस स्टेशन व क्राईम ब्रँचच्या अधिका-यांनी संयुक्तरित्या छापे टाकून ...इतक्या रुपयाची दारु जप्त केली." माझा प्रश्न असा आहे की, ज्या पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये या सगळ्या भट्टया येतात. त्या पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्यांवर आपण कोणत्या प्रकारची कारवाई केली ? केली नसल्यास, ती अजूनपर्यन्त का करण्यात आली नाही, ही मूलत: जबाबदारी कोणाची आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलिसांनी सगळा तपास करुन त्या ठिकाणची दारु पकडलेली आहे. तो दलदलीचा भाग आहे. त्या ठिकाणी जाता येत नाही. तरी देखील पोलिसांनी छापा टाकून पकडलेले आहे. त्यामुळे त्यांच्यावर कशी कारवाई करणार ?

श्री.मधुकर सरपोतदार : ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीच्या कार्यक्षेत्रामध्ये अशा भट्ट्या येतात, त्या ठिकाणी त्या सातत्याने चालू असतात. याची माहिती जर पोलीस स्टेशनला नसेल तर पोलीस स्टेशनमध्ये खबरे कशासाठी असतात ? खबरे केवळ पगार घेण्यासाठी असतात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक,व उप निरीक्षक यांना निलंबित केलेले आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1988...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या शासनाचे एक मंत्री गावठी दारुच्या व्यवसायाला अधिकृत परवानगी देणार असे जाहीर करतात, तर अशा परवानग्या देण्याचे शासनाचे धोरण आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,"नाही."

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाचे असे धारेण नसतांना कॅबिनेट दर्जाच्या एक मंत्रिमहोदयांनी हे जाहीर केलेले आहे.त्याचे प्रचंड पडसाद उमटले. अनेक वर्तमानपत्रांनी त्यावर अग्रलेख लिहिले.त्या मंत्र्याच्यांविरुध्द कारवाई करण्याच्या संदर्भात आपण काही सुचविणार आहात काय?

सभापती : श्री. दिवाकर रावते यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचा या प्रश्नाशी काही संबंध असावा असे मला वाटत नाही. या प्रश्नाची आपण अन्य मार्गाने सहज माहिती उपलब्ध करु शकाल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अपारंपारिज इंध-ा (सीए-ाजी/एलपीजी) वर चालजा-या

रिजा/टॅक्सी यांचे भाडे सूत्र ठरविज्याबाबत

(8) * 4323 डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. जजनाथ शेवाळे , श्री. वसंतराव चव्हाज , श्री. राजेंद्र जै□, प्रा. जोजेंद्र ज वाडे , श्री. सदाशिवराव पोळ , श्रीमती मंदा म्हात्रे : स-मा-ा-ीय परिवह-ा मंत्री पुढील जोष्टींचा ज्ुलासा ज रतील ज ाय :-

(1) पेट्रोल व्यतिरिक्त सीए-ाजी/एलपीजी या अपारंपारिज इंध-ावर चालजाऱ्या रिजा /टॅक्सीच्या संज्येत मोठया प्रमाजात वाढ झाल्या-े व तुल-ात्मज विचार ज रता पेट्रोलपेजा या इंध-ाचा दर ज मी असल्या-े टॅक्सी भाडे सूत्र ठरविज्यासाठी शास-ा-े दि-ांज 15.2.2005 रोजीच्या शास-ा ि-र्जया-वये परिवह-ा आयुक्त यांच्या अध्यजतेजाली टॅक्सी ट्रेड समिती ज्ठीत ज ेली आहे हे ज रे आहे ज ाय,

(2) असल्यास, उक्त समिती-े ज ोजता ि-र्जय घेतला आहे,

(3) अद्याप ि-र्जय घेतला -ासल्यास, विलंबाची ज ारजे ज ाय आहेत ?

श्री.धर्मरावबाबा अत्राम श्री.सुरुपसिंज -ाईज यांच्या करिता: (1) होय.

(2) व (3) टॅक्सी ट्रेड समिती 3 महि-यात अहवाल सादर ज रजार असल्यामुळे प्रश्-ा उद्भवत -ाही.

श्री. वसंतराव पवार :सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, समिती नेमलेली आहे. समिती नेमून किती दिवस झाले, याचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा.

श्री. धर्मरावबाब अत्राम : सभापती महोदय, दिनांक 9.7.1996 रोजी सात लोकांची समिती तयार झालेली आहे.

श्री. वसंतराव पावर : सभापती महोदय, 1996 मध्ये ही समिती तयार केली असे मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले आहे पण या समितीचा अहवाल अद्याप सादर झाला नाही, त्याच्या विलंबाची कारणे काय?

श्री. धर्मरावबाबा अत्राम :सभापती महोदय, पहिल्या समितीने सूत्र व भाडेदर हे ठरविण्याकरिता अभ्यासगट नेमावा अशा प्रकारचा अहवाल दिला होता. त्याप्रमाणे दिनांक 15 फेब्रुवारी,2005 ला एक नवीन समिती स्थापन केली आहे. या दुस-या समितीचा अहवाल आणखी अप्राप्त आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत :अपारंपारिक इंजीन बसविण्याचे आदेश सुप्रिम कोर्टाने दिले व त्याप्रमाणे सी.एन.जी. मध्ये परावर्तीत करण्याचे सांगितले होते त्यावेळे पासून हा प्रश्न प्रलंबित आहे.त्या वेळी असे म्हटले होते की, ट्रान्स्फर ऑफ इंजिन करण्याकरिता साधारणपणे टॅक्सी चालकांना 30 हजार रुपये शासनातर्फे अनुदान देण्यात येईल. एल.पी.जी. किट किंवा सी.एन.जी. किट बसविण्यासाठी पैसे देण्यात येतील. ते पैसे आज पर्यंत प्रलंबित आहेत, हे मंत्रिमहोदयांना माहीत आहे काय? त्यासाठी मंत्रिमहोदय काही करणार आहेत काय? दुसरा प्रश्न असा की, टॅक्सी ट्रेड समितीमध्ये कोणा कोणाचा अंतर्भाव आहे.

श्री. धर्मरावबाबा अत्राम :या समितीमध्ये 10 सदस्यांचा समावेश केलेला आहे. परिवहन आयुक्त या समितीचे अध्यक्ष आहेत. सहपोलीस आयुक्त सदस्य आहेत. अध्यक्ष प्रादेशिक परिवहन प्राधिकरण सदस्य आहेत. अतिरिक्त परिवहन आयुक्त सदस्य आहेत. प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई हे सदस्य आहेत. जनरल सेक्रेटरी बॉम्बे टॅक्सी मेन्स युनियन हे सदस्य आहेत. प्रेसिडेन्ट बॉम्बे टॅक्सी मेन्स असोसिएशन हे सदस्य आहेत. प्रतिनिधी मुंबई ग्राहक पंचायत मुंबई, सदस्य आहेत. प्रतिनिधी कंझुमर गार्डन सोसायटी, हे सदस्य आहेत. हसाय्यक परिवहन आयुक्त, धोरण विषयक हे सदस्य आहेत. अशा प्रकारची समिती तयार केलेली आहे. लोनबद्दलचा दुसरा प्रश्न विचारण्यात आला ती माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

डॉ. दीपक सावंत :सभापतीम महोदय, या टॅक्सी ट्रेड समितीमध्ये शिवसेना युनियनचा समावेश नाही.

(उत्तर आले नाही)

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये टॅक्सी आणि रिक्षांना सी.एन.जी.वापरण्याची परवानगी दिलेली आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील इतर भागातील रिक्षा आणि टॅक्सी चालाकांना सी.एन.जी. वापरण्यास परवानगी शासन देणार आहे काय?

श्री. धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, इतर भागामध्ये आवश्यकता वाटल्यास आणि तशी मागणी आल्यानंतर ती परवानगी देण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, शिवसेनेची सर्वात मोठी युनियन असताना या ट्रेड समितीमध्ये त्यांचा अंतर्भाव नाही. आपण शिवसेनेच्या टॅक्सी चालक मालक सेनेचा अंतर्भाव या ट्रेड समितीमध्ये करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आता आपण समिती तयार केलेली आहे. आता त्यामध्ये हे वाढविता येणार नाही.

डॉ. दीपक सावंत : अंतर्भाव का करता येणार नाही ? मी त्या युनियनचा अध्यक्ष या नात्याने सांगतो. शिवसेनेच्या युनियनला यामध्ये जाणीवपूर्वक डावलले गेलेले आहे असा माझा आरोप आहे. आपण यामध्ये आणखी एक नाव समाविष्ट करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : यामध्ये एक असोसिएशन आणि एका युनियनचे प्रतिनिधी असे दोन प्रतिनिधी घेतलेले आहेत. त्यामुळे अधिक आपल्याला घेता येणार नाहीत.

श्री. नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदय, सीएनजी आणि एलपीजी गॅस कीटवर चालणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सीचे भाडेसूत्र ठरविण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. त्या ठिकाणी एक अडचण अशी येते की, खाजगी टॅक्सीला आणि कारला अशा प्रकारची परवानगी मिळालेली आहे आणि विशेषत: ग्रामीण भागामध्ये गॅस पंपचा शॉर्टेज आहे. गॅस पंप सुरु करण्याच्या बाबतीत राज्य सरकार पुढाकार घेणार आहे काय ? कारण ग्राहकांची फार कुचंबणा होते आणि दिवसभर नंबर लागत नाही. म्हणून अशा प्रकारची काही योजना राज्य शासनाकडे आहे काय ?

श्री. सुरुपसिंग नाईक : सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत या सगळया सूचनांचाच विचार करण्यासाठी ही समिती नेमलेली आहे. ज्या ज्या अडचणी येतील त्यांच्या पुढे येणाऱ्या अडचणी आणि सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सूचना तसेच आणखी काही ज्या सूचना येतील त्या सगळया सूचनांचा विचार करण्यासाठीच ही समिती गठीत केलेली आहे. तीन महिन्यांच्या आत हा अहवाल अपेक्षित आहे. त्यानंतर आणखी काही राहिले तर इन्क्लुड करता येईल. परंतु त्या कमिटीचा अहवाल येऊ द्यावा. त्यानंतर अशा ज्या सूचना असतील त्याचा विचार ही समिती करील.

श्री. अरविंद सावंत : माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देतांना सांगितले की, ही समिती गठीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे सातत्याने विचारत आहेत. ही काही इंडस्ट्री नव्हे की ज्या ठिकाणी मान्यता प्राप्त संघटना व्होटींगमधून ठरते. अशा प्रकारचा हा प्रकार नाही. त्यामुळे जेवढे काही युनियन प्रतिनिधी आहेत त्या सगळयांना त्या ठिकाणी घ्यावयास पाहिजे. आमचाच प्रतिनिधी घ्या अशातील भाग नाही. उलट अशातून एक वेगळा विचार बाहेर जातो. सरकार म्हणून जो पक्षपातीपणा दिसतो तो या सरकारच्या दृष्टीने चांगला नाही. म्हणून माझी शासनाकडे मागणी आहे की, त्या ठिकाणी टॅक्सी चालक-मालक यांच्या जेवढया रजिस्टर्ड युनियन्स आहेत त्या सगळयांच्या प्रतिनिधींना बोलवा. यामध्ये आपणच एखाद्याला राजमान्यता देता असा त्याचा अर्थ होतो. ती राजमान्यता देणे योग्य ठरणार नाही. म्हणून जेवढया टॅक्सीच्या संदर्भातील ट्रान्सपोर्ट युनियन्स आहेत त्यांचा एक एक प्रतिनिधी या समितीवर घेणार काय ?

श्री. सुरुपसिंग नाईक : ही मुंबईतील एक मोठी युनियन आहे. त्यांचा प्रतिनिधी घेतलेला आहे. यामध्ये खूप युनियन्स आहेत त्यामुळे बैठकही होणार नाही. म्हणून शासनाने विचारपूर्वक हे प्रतिनिधी घेतलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : या सदनाचे सन्माननीय सदस्य त्या युनियनचे अध्यक्ष आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. खरे म्हणजे अशा प्रकारची धोरणे राबवित असताना ज्या समित्या असतात त्या सर्वसामावेशक असतात. ती इंटकची आहे की शिवसेनेची आहे की बीजेपीची आहे हा प्रश्न महत्वाचा नसतो. वतुस्थिती अशी आहे की, या क्षेत्रात काम करणाऱ्या ज्या युनियन्स आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांची स्ट्राँग युनियन आहे. सगळयात जास्त लोक त्यांच्याबरोबर आहेत. उद्या जर सरकारने निर्णय घेतला आणि त्यांच्या युनियनने तुम्हाला सहकार्य करावयाचे नाही असे ठरविले तर तुम्ही कोणतेही एम्प्लीमेंटेशन करु शकणार नाही. ज्यावेळी धोरणे ठरवितो त्यावेळी लोकशाहीमध्ये असे संकेत आहेत, असा प्रघात आहे की, त्या ठिकाणी जी मेजॉरिटीची युनियन असेल त्याही युनियनचा विचार घेतला पाहिजे. ही पध्दत आहे. त्या ठिकाणी आपण पक्षीय राजकारण आणू नका अशी माझी विनंती आहे. या क्षेत्रामध्ये आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार त्या युनियनचे संस्थापक होते आणि आज सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत त्या युनियनचे अध्यक्ष आहेत. मी एका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

ता. प्र. क्र. 4323 .... श्री. नितीन गडकरी .....

वेगळया पक्षाचा आहे. मी सुध्दा युनियन लीडर आहे. आता आमची नवीन युनियन काढणार आहोत. ज्यांची मेजॉरिटी आहे, त्यामध्ये मग उद्या इंटकची असू शकते, कम्युनिस्टांच्या लालबावटयाची असू शकते, ज्यावेळी धोरणात्मक विचार करावयाचा असतो त्यावेळी ज्या रेकग्नाईज युनियन्स असतात त्यांचा विचार केला पाहिजे असे संकेत आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4323.... श्री.नितीन गडकरी....

त्यामुळे मा.सदस्य डॉ.दीपक सावंत हे ज्या युनियनचे अध्यक्ष आहेत ते शिवसेनेचे आहेत म्हणून त्यांच्याबरोबर चर्चा व विचारविनिमय करावयाचा नाही आणि ज्यांना मान्यता नाही अशा लोकांकडून, कार्यकर्त्यांकडून प्राथमिक सदस्यत्वाच फॉर्म भरुन घ्यावयाचे, हे कदाचित राजकीयदृष्टया शक्य होईल. परंतु उद्या तुम्ही निर्णय घेणार आहात तो निर्णय ज्यांनी स्वीकारला पाहिजे त्यांनी तो स्वीकारावयाचाच नाही म्हटले तर शासनाचे धोरण पुढे जाणार नाही. हे लोकशाहीच्या संकेताप्रमाणे बरोबर नाही. या क्षेत्रामध्ये सगळयात जास्त सदस्य संख्या असलेली मा.सदस्य डॉ.दीपक सावंत यांची ही मान्यताप्राप्त युनियन आहे त्यामुळे आपण त्यांच्या प्रतिनिधीला ध्यावे वा ते सांगतील त्या प्रतिनिधीला धोरण ठरविताना बोलविले पाहिजे. हा लोकशाहीचा संकेत आहे, त्याचे पालन कोणताही सुसंस्कृत राजकीय पक्ष करीत असतो. राज्य कोणाचेही असो आपण ते केले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

श्री.सुरुपसिंग नाईक : मा.विरोधी पक्ष नेत्यांनी जी सूचना केली आहे त्याप्रमाणे ते म्हणतील त्या प्रतिनिधीला घेण्यासाठी शासन तयार आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सावर्दे-वडाचीवाडी (ता.राधानगरी,जि.कोल्हापूर) या गावांना जोडणा-या नदीवरील पुलाच्या कामाची त्वरीत करावयाची पूर्तता

(९) * २०९९ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील सावर्दे-वडाची वाडी या गावांना जोडणा-या दूधगंगा नदीवरील अपूर्ण राहिलेल्या पुलाच्या कामाची पूर्तता त्वरीत करणेबाबतचे निवेदन कोल्हापूर जिल्हा जनता दलाच्या वतीने दिनांक २५.१.२००४ रोजी अधि.अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांना दिलेले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.रविशेठ पाटील, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता : (१) व (२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झालेचे दिसून येत नाही. तथापि, वड्याचीवाडी या गावाजवळ बाकी नदीवर साकव वजा पूल बांधण्याचे काम प्रगतीत असून मे,२००५ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही असे म्हटलेले आहे. परंतु दिनांक 25 जानेवारी, 2004 रोजी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांना या कामासंबंधीचे निवेदन दिलेले आहे. सावर्दे-वडाचीवाडी, (ता.राधानगरी) या गावांचा या पुलाअभावी इतर भागांशी संपर्क रहात नाही. एखाद्या आजारी माणसाला रुग्णालयात घेऊन जायचे म्हटले तरी त्याला नेता येत नाही. अशाप्रकारच्या अनेक अडचणी तेथील गावक-यांना येत आहेत. म्हणून हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे अशी मागणी त्या निवेदनाद्वारे केलेली होती. सदर साकव वजा पूल बांधण्याचे काम मे,2005 अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे असे म्हटलेले आहे. वास्तविक या पुलाचे काम गेल्या 2-3 वर्षापासून रखडलेले आहे, सध्याही हे काम बंद आहे. कंत्राटदार हे काम सोडून गेलेला आहे. त्यामुळे मे, 2005 पर्यंत हे काम पूर्ण कसे होईल याचा मा.मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा तसेच पावसाळयापूर्वी हया पुलाचे बांधकाम पूर्ण करु शकाल काय याचे उत्तर देण्यात यावे.

श्री.रविशेठ पाटील : सदरच्या साकव वजा पुलाच्या कामासाठी डीपीडीसीकडून निधी उपलब्ध होतो. डीपीडीसीकडून एखाद्या वेळेला निधी उपलब्ध झाला नाही तर काम अपूर्ण राहते. परंतु सदरहू काम 31 मे, 2005 पर्यंत पूर्ण होईल अशी आमची अपेक्षा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2099....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सदर ठेकेदाराला कामाची मुदत किती दिली होती आणि मुदतीत काम न केल्यामुळे त्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकले जाईल काय आणि या ठेकेदाराला या कामापोटी किती रक्कम अदा केलेली आहे ?

श्री.रविशेठ पाटील : दिनांक 31 मे, 2005 पर्यंत हे काम पूर्ण करावे असे ठेकेदाराला सांगितले होते. परंतु मा.सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विचारल्याप्रमाणे या कामावर 4,36,228 रुपये खर्च झाले असून 5 लाख 60 हजार रुपयांच्या निधीची उपलब्धता पाहिजे. ते उपलब्ध झाल्यानंतर हे काम पूर्ण होण्यासाठी दिले जातील. मे, 2005 पर्यंत हा साकव व रस्ता वाहतुकीसाठी खुला होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : ठेकेदाराने मुदतीमध्ये काम केलेले नाही. एखादे काम ठेकेदाराला द्यावयाचे असल्यास त्याच्याबरोबर करार केला जातो, त्यामध्ये मुदत दिली जाते. त्या मुदतीत काम पूर्ण केले नाही तर त्याच्याविरुध्द कारवाई केली जाते. त्याप्रमाणे शासन कारवाई करील काय ?

श्री.रविशेठ पाटील : हया कामासाठी 31.5.2005 पर्यंत मुदत दिलेली आहे आणि ही मुदत अद्याप संपलेली नाही.

प्रा.शरद पाटील : या कामावर आतापर्यंत 4 लाख रुपये खर्च झालेले आहेत आणि 5 लाख 60 हजार रुपयांची आवश्यकता आहे असे आताच सांगितले आहे. त्यामुळे हे काम 31 मे , 2005 अखेर पूर्ण होईल काय ?

श्री.रविशेठ पाटील : हे काम 31 मे, 2005 अखेर निश्चित पूर्ण होईल.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मूल्यमापन अभ्यास समितीबाबत

(१०) * ४०२९ श्री. प्रमोद नवलकर , श्री. अनंत तरे , श्री. दिवाकर रावते , डॉ. दिपक सावंत , श्री. अरविंद सावंत : सन्माननीय वित्त मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचा खर्च मर्यादित ठेवून उत्पन्न वाढीसाठी शासनाच्या सर्व विभागाच्या कार्याचे आणि योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी अभ्याससमिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे जरे ज ाय,

(२) असल्यास, सदर मूल्यमापन समितीपुढे समितीने कोणकोणत्या गोष्टींचा विचार करावा याबाबत शासनाने काही मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत काय, असल्यास, थोडक्यात ती कोणती आहेत,

(३) असल्यास, मूल्यमापन समितीमध्ये एकूण किती सदस्य आहेत,

(४) असल्यास, मूल्यमापन समितीला आपला अहवाल देण्यास किती मुदत देण्यात आली आहे ?

डॉ. सुनील देशमुख, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता : (१) नाही, तथापि शासनाने अर्थसंकल्पित केलेल्या योजनांवरील खर्चाचा उद्देश व उद्दिष्टनिहाय मूल्यमापन करणे सुकर व्हावे यासाठी योजनांचा अभ्यास करुन भौतिक लक्ष व परिणाम यांची मानके निश्चित करण्यासाठी विभागनिहाय कार्यगट स्थापन करण्यात आले आहेत. योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी अभ्यास समिती नेमलेली नाही.

(२) लाजू -ाही.

(३) लाजू -ाही.

(४) लाजू -ाही.

श्री. प्रमोद नवलकर : पहिल्या प्रश्नाला नाही असे उत्तर दिलेले आहे. का नाही ?

डॉ. सुनील देशमुख : शासनाच्या सर्व विभागाच्या कार्याचे आणि योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी अभ्याससमिती नमेलेली आहे काय ? असा प्रश्न विचारलेला आहे. त्याचे उत्तर "नाही" असे आहे. याचे कारण असे की, या कामाची व्याप्ती मोठी आहे. एक समिती नेमून त्या समितीने सा-या डिपार्टमेंटमध्ये जाऊन माहिती घेण्यापेक्षा 10 कार्यगट नेमून विभागनिहाय माहिती घेण्यास सांगितलेले आहे. यामुळे ही माहिती लवकर प्राप्त होईल. म्हणून एक समिती नेमण्यापेक्षा 10 कार्यगट नेमलेले आहेत.

श्री. प्रमोद नवलकर : समिती आणि कार्यगट यामध्ये काय फरक आहे ?

डॉ. सुनील देशमुख : एक समिती नेमली असती तर त्या समितीला सर्व विभागामध्ये जाऊन माहिती घ्यावी लागली असती. त्याऐवजी 10 कार्यगट नेमलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 4029 पुढे सुरु...)

श्री. नितीन गडकरी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभापती महोदय, विधिमंडळामध्ये जेव्हा मा.सदस्य प्रश्न विचारतात त्यावेळी त्या प्रश्नाचे उत्तर तांत्रिकदृष्ट्या कसे टाळायचे याचे हा एक उत्कृष्ट नमुना आहे. आता माननीय सदस्यांनी समिती आणि कार्यगट यामध्ये काय फरक आहे? असा प्रश्न विचारला. खरे म्हणजे, यामध्ये काहीही फरक नाही. शेवटी समिती आपला अहवाल तयार करणार आणि 10 कार्यगट देखील आपला अहवाल तयार करणार. दोन्ही यंत्रणांचे काम एकच आहे. एका समिती ऐवजी 10 कार्यगट नेमलेले आहेत. मा.सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर त्या प्रश्नाला "नाही" असे उत्तर देण्याचे काय कारण होते ? मला वाटते मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला असे उत्तर द्यरावयास पाहिजे होते की, शासनाने अशा प्रकारची समिती स्थापन केलेली नाही. परंतु कार्यगट स्थापन केलेले आहेत आणि त्यांच्याकडून आपल्याला माहिती मिळेल. आम्हाला या सभागृहामध्ये काहीही माहिती दिली जात नाही. पहिल्या प्रश्नाला "नाही" असे उत्तर आल्यानंतर पुढील 2,3 आणि 4 या प्रश्नाला "लागू नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. हे बरोबर नाही. अशा प्रकारे उत्तर देणे हा विधिमंडळातील प्रघात नाही. विधिमंडळाकडे जेव्हा अशा प्रकारचे उत्तर येते त्यावेळी सभापती महोदय, आपल्या विभागाकडून देखील ते तपासले जावे. आता कार्यगट आणि समिती या दोन शब्दांचे इंग्रजी मिनिंग काढून स्पिरिट शोधून काढले तर हे दोन्ही शब्द जवळ जवळ सारखेच आहेत. तांत्रिकदृष्ट्या बोलायचे झाले तर मंत्रीमहोदय याबाबतीत ऑर्ग्युमेंट करु शकतात. तेव्हा हे कार्यगट अशा प्रकारची माहिती घेत असताना मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला "नाही" अशा प्रकारे उत्तर देणे योग्य नाही. मा. सदस्यांनी विचारलेली माहिती देता येणे शक्य नसेल तर निदान प्रश्नाचे उत्तर तरी नीट द्यावे. शासनाच्या या कामामध्ये मदत करावी असा मा. सदस्यांचा उद्देश आहे आणि म्हणून हा प्रश्न विचारलेला आहे. मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला योग्य उत्तर दिलेले नाही म्हणून हे उत्तर मंत्री महोदयांनी दुरुस्त केले पाहिजे. सभापती महोदय, माझी आपणाला विनंती आहे की, जेव्हा अशा प्रकारची उत्तरे येतात तेव्हा ती उत्तरे स्वीकारली जाऊ नयेत. त्याबाबतीत सूचना द्यायला पाहिजेत. माझ्या हरकतीच्या मुद्याला आपण संरक्षण द्यावे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.4029 पुढे सुरु...)

श्री. प्रमोद नवलकर: "कार्यगट" असा शब्द वापरुन प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळले आहे. माझ या 2,3 आणि 4 प्रश्नांना "लागू नाही" अशी उत्तरे देण्यात आलेली आहेत. माझ्या दुस-या प्रश्नामध्ये काही मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत काय ? असा प्रश्न विचारलेला आहे. जर कार्यगट नेमलेला असेल तर त्याला देखील मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली असणारच. तेव्हा माझ्या संपूर्ण प्रश्नाचे उत्तर देण्याचे टाळलेले आहे म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा.

डॉ. सुनील देशमुख : मूल्यमापन समिती नेमली आहे काय असा मा.सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे आणि त्याला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. मूल्यमापन समिती नाही तर कार्यगट नेमलेले आहे. त्यांचा अंतिरिम अहवाल राज्य शासनाकडे आलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : कार्यगट काय काम करणार आहे ?

डॉ. सुनील देशमुख : डिपार्टमेंटवाईज निकष काय राहतील हे कार्यगट ठरविणार आहे...

...नंतर श्री.गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4029..

डॉ.सुनील देशमुख..

माझे एक मिनीट ऐकून घ्या. परफॉर्मन्स मॉनेटरिंग आणि इम्पॅक्ट या दोन गोष्टीची मानके ठरविण्याच्या बाबतीत ते कार्यगट निर्माण केलेले आहेत. त्याचा डिपार्टमेंटवाईज अभ्यास करुन त्या विभागांचा परफॉर्मन्स काय आहे ? त्याचा इम्पॅक्ट काय आहे ? या अर्थसंकल्पात अमूक अमूक एवढा पैसा दिलेला आहे तो पैसा त्यांनी खर्च केला काय ? त्यांनी ते टारगेट पूर्ण केले आहे काय ? समजा पाटबंधारे विभागास पैसे दिले गेले असतील तर त्यांनी कालवे केले आहेत काय ? किती कि.मी.चे कालवे केले? अशा सगळया गोष्टींचा इम्पँक्ट ..

श्री.प्रमोद नवलकर : म्हणजे त्यांना मार्गदर्शक तत्वे आहेत. मग कार्य कटास ते लागू नाहीत असे कसे सांगता ? आत्ताच तुम्ही माहिती देताना कार्य गटाला लागू असलेली मार्गदर्शक तत्वे या ठिकाणी सांगितली. याबाबतीत नक्की काय आहे ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय,...

श्री. प्रमोद नवलकर : एका मंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर अर्धे उत्तर दुस-या मंत्र्यांनी देण्याची पध्दत आपल्याकडे नाही. परीक्षेस देखील तशी परवानगी दिली जात नाही.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर तसेच सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी दुसरा प्रश्न विचारल्यानंतर मी उत्तर देण्यास उभा राहिलो आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारलेला आहे त्याचे मी स्पष्टीकरण देऊ इच्छितो. या ठिकाणी सन्माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अतिशय व्यवस्थितपणे व चांगली उत्तरे दिलेली आहेत. मला त्यांच्या उत्तरात व्यत्यय आणावयाचा नाही. प्रत्येक विभागाचे निकष काय असावेत, प्रत्येक विभागाची मार्गदर्शक तत्वे वेगळी असू शकतात. प्रत्येक विभागाचा प्रतिनिधी तसेच वित्त विभागाचा प्रतिनिधी असा तीन चार प्रतिनिधीचे छोटे कार्यगट स्थापन करुन त्या विभागातील कोणकोणत्या कार्यक्रमाबाबत कशी मार्गदर्शक तत्वे ठेवली पाहिजे, त्यांचा परफॉर्मन्स असेस करण्यासाठी कोणती मानके निश्चित केली पाहिजे यासंबंधीचे असेसमेंट केले या गटाच्या माध्यमातून केले जाणार आहे. हे मोठे काम आहे. राज्यात होणा-या खर्चाचा परफॉर्मन्स, त्याचा समाजात इम्पँक्ट किती आहे यासंबंधीचे मुल्यमापन शास्त्रोक्त पध्दतीने करावे लागेल म्हणून हे कार्यगट स्थापन झालेले आहेत. कोणत्या परिणामाची दखल घेतली गेली पाहिजे, कोणते परिणाम

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4029..

श्री.जयंत पाटील..

या पैशांमुळे राज्यात होत आहेत, समाजात कोणते परिणाम या पैशामुळे होत आहेत, या अनुषंगाने चांगल्या प्रकारची माहिती मिळावी म्हणून कार्यगट स्थापन करण्याचा विचार पुढे आलेला आहे.व त्याप्रमाणे प्रत्येक विभागाला वेगवेगळी मानके निश्चित करण्यासाठी हे कार्यगट स्थापन केले आहेत. प्रत्येक विभागाची वेगवेगळी मार्गदर्शक तत्वे असू शकतात. कुपोषणाचा विषय असेल तर त्याबाबतीत मार्गदर्शक तत्वे काय असली पाहिजे, सर्व सामान्य विभागात मार्गदर्शक तत्वे काय असली पाहिजे,सगळया विभागातील वेगवेगळया विषयांच्या बाबतीत संपूर्ण सविस्तर माहिती सदर कार्यगट घेणार आहे. प्रत्येक विभागाच्या हेडवरील खर्च किती येतो, खर्च केलेल्या पैशांचा समाजावर कोणता परिणाम होतो, या सगळया गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळी मानके, वेगवेगळी मार्गदर्शक तत्वे लागू होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक विभागाची तसेच त्यांच्या योजनांसबंधीची मानके ठरविण्यासाठी हे कार्यगट काम करीत आहे. सहा महिन्यात हे काम पूर्ण होईल अशी आशा आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री. नवलकर यांनी हा इश्यू या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. विभागाने या प्रश्नात सकारात्मक भूमिका घेतलेली आहे असे साधारणत: दिसून येत नाही. आपण जो मुद्दा उपस्थित केला होता त्यास सन्माननीय अर्थमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. त्यामुळे त्याबाबतीत मी भाष्य करीत नाही. विधिमंडळास शासनाकडून उत्तरे येतात ती तपासली गेली पाहिजे असा मुद्दा उपस्थित केला गेला. आपण विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ही शासनाकडून विधिमंडळास प्राप्त होत असतात. ती उत्तरे योग्य आहेत काय एवढेच काम आम्ही करीत असतो. उत्तरे देण्याचे अधिकार शासनास आहे. एवढेच मी स्पष्टीकरण या ठिकाणी करु इच्छितो.

डॉ. अशोक मोडक : मला माननीय मंत्री महोदयाचे लक्ष 2002 च्या बजेटकडे वेधावयाचे आहे. ही चर्चा फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी आणि बजेट मॅनेजमेंटच्या संदर्भातील आहे. मला दु:ख या गोष्टीचे वाटते की, पूर्वी माधवराव गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली होती. त्या समितीच्या कामकाजाकडे लक्ष दिले गेले नाही...

यानंतर श्री. कानडे...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 12:50

ता.प्र.क्र. 4029 पुढे सुरु ...

डॉ. अशोक मोडक ...

डॉ. माधव गोडबोले समितीच्या अहवालाचा याठिकाणी उल्लेख करण्यात आला. डॉ.गोडबोले यांनी स्वत: अहवालाच्या अंमलबजावणीबाबत चिंता व्यक्त केली आहे. तसेच सभागृहातील सदस्यांच्या मनात सुध्दा चिंता उत्पन्न झालेली आहे. मंत्रीमहोदयांनी अंशत:उत्तर दिलेले आहे. सहा महिन्यांची डेड लाईन दिलेली आहे. उपासनी समिती असो किंवा गोडबोले समिती असो अशा ज्या वेगवेगळया समित्या नेमल्या जातात त्या समित्यांच्या कामकाजाकडे आणि त्याच्या मूल्यमापनाकडे लक्ष दिले जात नाही. मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना या समित्या नेमण्यामागचे स्पिरीट लक्षात घेऊन जर उत्तर दिले असते तर बरे झाले असते. सहा महिन्यात अभ्यासगट नेमले जातील. समाजामध्ये याबाबतीत विश्वास उत्पन्न होण्याच्या दृष्टीने आणि पारदर्शकता उत्पन्न होण्याच्या दृष्टीने यासंबंधात पुन्हा सभागृहाला माहिती पुरविली जाईल काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मा.सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. एकूण सिस्टीमबद्दल आणि खात्याबाबत लक्ष वेधले आहे. मा.सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी सांगितले की, अहवालाच्या अंमलबजावणीबाबत चिंता व्यक्त केली आहे. गोडबोले समिती नेमताना प्रशासकीय सुधारणा व्हावी व्यवस्थापन अधिक स्पष्ट आणि काटेकोरपणे व्हावे,खर्चामध्ये बचत व्हावी तसेच पारदर्शकता यावी असा उद्देश होता. अहवालाकडे दुर्लक्ष केले जाते अशी भावना व्यक्त करण्यात आली.गोडबोले साहेबांनाही आता असे वाटू लागले आहे. सभापती महोदय, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की, अहवाल आल्यानंतर एक सदस्यीय समिती होती त्या समितीने ब-याच सूचना केलेल्या आहेत. मोठया सूचना होत्या. जवळजवळ 93-98 सूचना होत्या. त्यांची यादी खूप मोठी आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी गोडबोले समितीच्या अहवालाच्या अंमलबजावणी करण्यासाठी काही बैठका घेतल्या आणि त्यातील ब-याचशा सूचनांची अंमलबजावणी सुरु आहे आणि अंमलबजावणी केलेली आहे. अहवाल आल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केले असे झालेले नाही. बहुतेक सर्व निर्णयांच्या बाबतीत विचार करुन या अहवालातील सूचनांची जास्तीत जास्त अंमलबजावणी कशी करता येईल यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: बैठका घेतल्या होत्या. समिती स्थापन करावयाची आणि महाराष्ट्र सरकारच्या कामकाजाच्या बाबतीत प्रशासकीय त्रृटी,कार्यक्षमता,परफॉर्मन्स ठरविणे हा उद्देश होता. त्यांनी जे निकष दिले किंवा सूचना

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

केल्या त्यांची अंमलबजावणी काही स्वरुपात झालेली आहे. मा.सदस्यांनी ज्याचा उल्लेख केला असे कार्यगट सहा महिन्यात केल्यानंतर त्या कार्यगटाचे निकष काय आहेत ते निकष सभागृहाला सांगण्याचा प्रयत्न करु. सिस्टीम इंप्रुव्ह करणे,राज्य सरकारमध्ये काम करणा-या आमच्यापासून शेवटच्या कर्मचा-यापर्यंत सर्वांचाच परफॉर्मन्स कंट्रोल करणे आणि त्याला मॉनिटरींग करणे हा उद्देश आहे. वित्त खात्याने हाही प्रयत्न करावयाचा ठरविले आहे की, परफॉर्मन्स ऑफ दी बजेट आणि एक्सपँडीचर आणि त्याचा इंपॅक्ट यांचा ताळमेळ असला पाहिजे. अर्थसंकल्पात ज्या तरतूदी केलेल्या आहेत त्या दर तीन महिन्यांनी रिलीज होतात किंवा नाहीत आणि रिलीज झालेल्या तरतुदी विभागामार्फत वेळेवर खर्च होतात किंवा नाही,पहिल्या तिमाहीत खर्च झाला नसेल तर दुस-या तिमाहीत तो खर्च करण्याची संधी देणे मागचे न खर्च केलेले पैसे पुढील तिमाहीत खर्च करण्यासाठी परवानगी देणे अगदी शेवटच्या तिमाहीत त्या विभागाने त्या हेडवर जर पैसेच खर्च केले नसतील तर 31 मार्चला आपल्या लक्षात येत नाही की कोणी किती पैसे वापरले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4029.. श्री.जयंत पाटील..

तेव्हा यामध्ये सुधारणा करुन दे हॅव फेल्ड टू स्पेन्ड मनी ऑन धिस पर्टिक्युलर हेड असा निष्कर्ष एक महिना अगोदर निघणे आणि असे केल्याबद्दल त्या विभागाला जाब विचारणे या सगळयाच गोष्टी आम्हाला अभिप्रेत आहेत. म्हणून या कार्यगटाचे काम लवकर पूर्ण होईल यासाठी वित्त विभाग प्रयत्न करील.

श्री.मधुकर सरपोतदार :सभापती महोदय,सन्माननीय अर्थ मंत्रिमहोदयांनी खुलासा केलेला आहे.त्यामुळे अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग दिसला आाहे. परंतु या प्रश्नाला सुरुवातीला जे उत्तर देण्यात आलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. सन्माननीय सदस्यांनी चांगल्या उद्देशाने प्रश्न विचारलेला आहे. त्या प्रश्नाचे उत्तरसुध्दा त्याच पध्दतीने दिले गेले पाहिजे अशी अपेक्षा असते. सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी सुरुवातीलाच विचारले की," नाही तर का नाही ?" या प्रश्नाला जे उत्तरे देण्यात आली आहेत ती " नाही " अशी देण्यात आलेली आहेत त्यावरुन निगेटीव्ह अप्रोच दिसून येत आहे.निगेटीव्ह उत्तरेच जास्त देण्यात आलेली आहेत. वास्तविक शासनाने पॉझिटीव्ह उत्तरे द्यावयास पाहिजेत. जर कार्यगट नेमण्यात आलेला असेल तर आपण सांगावयास पाहिजे होते की, यासाठी कार्यगट नेमण्यात आलेला आहे आणि त्यांच्यासमोर जर काही डायरेक्टीव्ह दिल्या असतील तर त्याही बाबतीत खुलासा करावयास पाहिजे.परंतु उत्तरे देतांना "लागू नाही, लागू नाही" अशी उत्तरे देण्यात आलेली आहेत तेव्हा हे " लागू "कोण आहेत ? अर्थसंकल्प आणि त्यातील तरतूदी यांना न्याय मिळावा हीच प्रश्नकर्त्या सदस्यांची अपेक्षा असते.याबाबतीत मी आपल्याला एक उदाहरण देतो. केन्द्र सरकारने मागच्या बजेटमध्ये 10 कोटी रुपये शिवनेरीच्या सुशोभिकरणासाठी दिले होते परंतु ते पैसे खर्च झाले आहेत किंवा नाहीत सुशोभिकरण झाले किंवा नाही याचा उल्लेख या वर्षीच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही.असे जर एखादे हेड राहून गेले तर त्याला न्याय मिळावा या उद्देशाने सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे.या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आलेले आहे ते नकारात्मक आहे तेव्हा आमची एकच अशी अपेक्षा आहे की,सकारात्मक किंवा वस्तुस्थितीदर्शक उत्तर दिले गेले पाहिजे. तेव्हा सन्माननीय सदस्याची जर अशी अपेक्षा असेल तर ती चुकीची आहे काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सन्माननीय सदस्यांनी मांडलेले विचार योग्य असून या पुढे त्यासबंधी काळजी घेण्यात येईल. तसेच येथून पुढे सकारात्मक उत्तरे देण्याचा पुरेपूर प्रयत्न करण्यात येईल. अशी मी आपल्याला खात्री देतो.

श्री.दिलीप देशमुख : वित्त विभागाने कार्य गट नेमण्याचा निर्णय घेतलेला आहे तो अत्यंत स्तूत्य आहे. त्यामुळे सरकारचा जो काही खर्च होत असतो त्याचे मूल्यमापन होईल. मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, जे कार्य गट नेमलेले आहेत त्यांची संख्या किती आहे? आणि कोण कोणत्या विभागासाठी ते लागू होणार आहेत ?

डॉ.सुनील देशमुख : एकंदर दहा कार्यगट नेमलेले आहेत.या दहा कार्यगटाना सर्व विभाग अलॉट करण्यात आलेले आहे.

श्री.दिलीप देशमुख : एखादा विभाग यातून राहतो काय ?

डॉ.सुनील देशमुख : कोणताही विभाग राहत नाही.महाराष्ट्र शासनाचे सर्व विभाग या कार्यगटांना वाटून दिलेले आहेत.

श्री.दिलीप देशमुख : हे कार्यगट मंत्रालयात बसूनच अभ्यास करणार आहेत की फिल्डवर जाऊन अभ्यास करणार आहेत ?

डॉ.सुनील देशमुख : प्रसंग पडला तर बाहेर जाण्याचीसुध्दा त्यांची तयारी आहे.

श्री.दिलीप देशमुख : अशा प्रसंगाची माननीय मंत्रीमहोदय वाट पाहणार आहेत काय ?

श्री.जयंत पाटील : मानके व मार्गदर्शक तत्वे ठरविण्यासाठी फिल्डवर जाण्याची आवश्यकता नसावी अशी आमची अपेक्षा आहे त्यातूनही गरज पडली तर सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे एखाद्या कार्यगटाने बाहेर जाण्यास हरकत नाही.परंतु संबंधित अधिका-यांना व कर्मचा-यांना बोलावून मानके ठरविण्याचे काम केले जाणार आहे.

श्री.नितीन गडकरी (बसून) :या संदर्भात माजी वित्त राज्यमंत्र्यांचा सल्ला घेण्यात यावा

श्री.जयंत पाटील : त्यासाठी माजी वित्त राज्यमंत्र्यांचा सल्ला घेऊ .त्याच बरोबर सभागृहातील माननीय सदस्यांचा अनुभव वापरण्याचा आपण प्रयत्न करु. या सिस्टीममध्ये इम्प्रुव्हमेन्ट करणे व अकाऊन्टीबिलीटी वाढविणे हा या मागचा उद्देश आहे. त्याचबरोबर लेखी उत्तर देत असतांना काही तांत्रिक चूक झालेली असली तरी शासनाचा उद्देश इम्प्रुव्हमेन्टचा आहे हे सदस्यांनी लक्षात घ्यावे.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाजे व भिवंडीशहरातील अवैध रिजा वाहतुज्जीबाबत

* 2183 **श्री. अ[illegible] तरे, श्री. अ[illegible] परब, श्री. अ[illegible] तरे, डॉ. दीपज सावंत, श्री. दिवाज र रावते** : स-मा-न-नीय परिवह-न मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) माहे फेब्रुवारी 2005 मध्ये वा त्यासुमारास ठाजे व भिवंडी शहरातील अवैध रिजा वाहतूज्जीच्या मोहिमेअंतर्ज्त तपासज्यात आलेल्या सुमारे 500 रिजांपैज्जी अ-नेज रिजा चालज ांचे परवा-ने रद्द ज रज्यात आले असू-न अद्यापही सदर ठिज ाजी अवैध रिजा वाहतूज चालू आहे, हे जरे आहे ज ाय,
(2) असल्यास, उक्त प्रज रजी शास-ना-ने चौज शी जेली आहे ज ाय,
(3) असल्यास, चौज शीत ज ाय आढळू-न आले व तद्-नुसार संबंधित दोषी रिजा चालज ांविरुध्द जोजती ज ारवाई जेली वा ज रज्यात येत आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री.सुरुपसिंज -ाईज यांचेकरिता : (1),(2) व (3) प्रादेशिज परिवह-न अधिज ारी,ठाजे यां-नी एप्रिल,2004 ते फेब्रुवारी,2005 या ज ालावधीत अ-नधिज़ृतपजे चालजा-या रिजा चालज व परवा-ना धारज ावर विशेष तपासजी मोहिमेअंतर्ज्त ज ारवाई जेली आहे. या ज ारवाईमध्ये एज़ूज 9,015 वाह-ने तपासली असू-न त्यातील 4,435 वाह-ने दोषी आढळलेली आहेत. यातील 525 वाह-ने अटज ावू-न ठवेलेली आहे. 924 परवा-ने आजि 604 अ-नुज्ञप्ती ि-लंबित ज रज्यात आल्या आहेत, तसेच तडजोड शुल्ज ापोटी रु.18,06,550/- इतजी रक्ज म वसूल ज रज्यात आली आहे.

श्री. अनंत तरे : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी जनतेकडून मागणी झालेली आहे आणि दैनिक लोकमत मध्ये देखील ही बातमी आली होती. त्यानतर पोलिसांनी अशा प्रकारची कारवाई केली आहे. जवळपास 9015 वाहने या कारवाईमध्ये तपासण्यात आली आणि त्यातील 4,435 वाहने म्हणजे 50 टक्केपेक्षाही जास्त वाहने दोषी आढळली आहेत. म्हणजे यांचेवर अगोदरच कारवाई होण्याची गरज होती. अध्यक्ष महाराज, भिवंडी, ठाणे, कल्याण, डोंबिवली आदी सर्वच भागांमध्ये अशा प्रकारे अवैध रिक्षा चालविल्या जात आहेत, कोणाकडे रिक्षा चालविण्यासाठी बॅच नाही, तर कोणाकडे लायसेन्स नाही. आता मंत्री महोदयांनी येथे सांगितले आहे की, 4435 वाहने दोषी आढळली आहेत, तर त्यात काय दोष आढळले आहेत ? तसेच तडजोड शुल्क देखील वसूल करण्यात आले आहे तर ही तडजोड म्हणजे नेमके काय आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी ज्या अवैध रिक्षा चालविल्या जात आहेत त्या आता बंद करण्यात आल्या आहेत. आणि ज्या अवैधा रिक्षा चालू होत्या त्यांचेकडून त्याबद्दल दंड आकारून वसुली करण्यात आली आहे व येत आहे आणि तडजोड म्हणजे काही चूक राहून जाते, दंड असतो त्यामध्ये कमी जास्त लावला जातो तर त्यात तडजोड करून अशा प्रकरणांचा निपटारा करावा लागतो. त्याप्रमाणे थकित रकमांची वसूली केलेली आहे. .... एम 2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2183 ...

श्री. अनिल परब : अध्यक्ष महाराज, जे रिक्षावाले अनधिकृतपणे रिक्षा चालवितात त्यांचेवर गुन्हा दाखल केला जातो. त्यामध्ये जी दंड आकारणी होते त्यामध्ये तडजोड केली जाते असे आता सांगण्यात आले आहे तर तडजोड करण्याची कायदेशीर तरतूद आहे काय आणि कायद्यामध्ये ते मान्य आहे का ? तसेच जी तपासणी या संदर्भात आपण केली त्यामध्ये बांगला देशी नागरिक आपल्याला सापडले आहेत का ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : अध्यक्ष महाराज, या तपासणीमध्ये कोणी बांगलादेशी नागरिक सापडले आहेत किंवा काय याची माहिती आता माझ्याकडे नाही. मी ती पटलावर ठेवीन. दुसरे असे की, जे अवैध रिक्षा चालवितात त्यांचे कडून दंड वसूली केली जाते तसेच त्यांचा परवाना निलंबित सुद्धा आपण करतो. तर त्या दृष्टीने आपण कारवाई करतो.

सभापती : प्रश्नवेला संपली.

..... एम 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत ....

श्री, नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, आपल्या परवानगीने मला या ठिकाणी एक औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे. याद्वारे मी या ठिकाणी एक अतिशय महत्त्वाच्या विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. अध्यक्ष महाराज, हे सभागृह लोकशाहीच्या आणि भारतीय घटनेच्या नियमाप्रमाणे चालते आहे पण त्या नियमांची पायमल्ली होत आहे असे मला वाटते. आपण कायदेमंडळ आहोत आणि भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आपण येथे काम करतो. तेव्हा ही जी पायमल्ली होत आहे ती आपल्यासमोर मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे, तत्पूर्वी आपण मला या ठिकाणी बसून बोलण्याची परवानगी द्यावी. अध्यक्ष महाराज, भारतीय घटनेच्या कलम 371(2) प्रमाणे माननीय राज्यपाल महोदयांनी ज्या डायरेक्शन्स दिलेल्या होत्या त्या केवळ दुसरी डायरेक्शन दिल्यानंतरच बदलू शकतात. आम्ही या ठिकाणी ज्या कागदपत्रांची, विशेषत: माननीय राज्यपालांनी दिलेले निर्देश बदलून दिल्याचे जे मंत्री महोदयांनी येथे सांगितले होते त्या पत्राची प्रत आम्हाला मिळावी म्हणून मागणी केली होती. आम्हाला वाटले होते की, माननीय राज्यपालांनी त्याबाबतच्या डायरेक्शन दिल्या असतील त्याबाबतचे ते पत्र असेल. परंतु ते पत्र म्हणजे नियोजन सचिव श्री.डी.के.शंकरन् यांनी माननीय राज्यपाल महोदयांना या संदर्भात जे पत्र लिहिले होते त्याबाबत माननीय राज्यपालांनी दिलेले उत्तर होते. अध्यक्ष महाराज, या संबंधातील वैधानिक स्थिती राज्याच्या ॲडव्होकेट जनरल यांनी या सभागृहासमोर येऊन सांगितली आहे. त्यानुसार या विषयामध्ये मी आपले लक्ष वेधू इच्छितो. अध्यक्ष महाराज, भारतीय घटनेतील कलम 371(2) खाली जी वैधानिक विकास मंडळे तयार झाली आहेत त्या विकास मंडळांच्या द्वारे माननीय राज्यपालांना काही अधिकार प्राप्त झाले. या संबंधातील जे घटनेतील कलम आहे ते कृपया आपण नजरेखालून घालावे असे मला वाटते. या कलमामध्ये असे म्हटले आहे की, ...

(यानंतर श्री.जागडे ...एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"371(2) Notwithstanding anything in this Constitution, the President may by order made with respect to the State of Maharashtra or Gujarat, provide for any special responsibility of the Governor for --

(a) The establishment of separate development boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra, or as the case may be etc. etc.,"

"बी" क्लास असा आहे की, " The equitable allocation of funds for development expenditure over the said areas, subject to the requirements of the State as a whole; and; (c) an equitable arrangement providing adequate facilities for technical education and vocational training, and adequate opportunities for employment in service under the control of the State Government, in respect of all the said areas, subject to the requirements of the State as a whole."

माननीय राज्यपाल महोदयांनी पाटबंधारे विभागाबाबत डायरेक्शन्स दिल्या आहेत. त्यांचे पत्र रेकॉर्ड झाले आहे. त्यांनी आठ सेक्टर बाबत डायरेक्शन्स दिल्या आहेत. ते सुध्दा रेकॉर्डवर आहे. मी या ठिकाणी सर्व आठ सेक्टरबद्दल न बोलता फक्त पाटबंधारे खात्याबाबत बोलणार आहे. माननीय राज्यपालांनी जे निर्देश दिले त्यांचे पालन झाले पाहिजे. हे सत्तारुढ आमदार आणि मंत्र्यांनाही पटेल. 15 डिसेंबर 2001 रोजी प्रथम माननीय राज्यपालांनी निर्देश दिले. तीन सिंहाचा ठप्पा असलेले आणि सत्यमेव जयते लिहिलेले पत्र शासनाला मिळाले. डायरेक्शन्स, ॲप्रुव्हल आणि ऑर्डर यामध्ये फरक आहे. डायरेक्शन म्हणजे निर्देश. आणि निर्देश हे बंधनकारक असतात. आता ह्या डायरेक्शन्स बदलावयाच्या असतील तर त्या दुस-या डायरेक्शन्सनी बदलता येतील. श्री.शंकरन् यांनी माननीय राज्यपालांना जे पत्र लिहिले आहे, ती मी सभागृहाला वाचून दाखवित आहे. मा.राज्यपालांनी पहिल्या डायरेक्शन्स कोणत्या आहेत ? Directives by the Governor of Maharashtra under Rule 7 of the Development Boards for Vidharba, Marathwada and rest of Maharashtra Order,1994 regarding the region-wise distribution of outlays, the quantum of backlog, time frame for its removal and region-wise and sector-wise allocation for the removal of backlog in the irrigation sector in the Annual Plan 2002-2003." 2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

माननीय राज्यपाल महोदयांनी पहिल्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, " The State of Maharashtra (Special Responsibility of Governor for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra) Order,1994 made by the President of India has assigned the Governor of Maharashtra special responsibility for matters specified in sub-clause (b) and (c) of Clause (2) of Article 371 of the Constitution in respect of the areas of Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra. On 30th April, 1994, the Governor of Maharashtra issued the "Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra Order,1994 (hereinafter referred to as the Order) constituting separate Development Boards for the said regions."

अशा प्रकारची तीन स्वतंत्र वैधानिक मंडळे मा. राज्यपालांच्या आदेशानुसार स्थापन झाली. आवश्यकता वाटल्यास मागासलेल्या भागासाठी निर्देश देण्याचे अधिकार माननीय राज्यपालांना आहेत. सभापती महोदय, यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, " According to Rule 7 of the said Order, the Governor of Maharashtra has the special responsibility....

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

of ensuring equitable allocation of funds of for development expenditure over the areas of Development Boards, subject to the requirements of the State as a whole and;

According to Rule 8 of the said Order, the allocation of funds or outlays made by the Governor shall be reflected in the Annual Financial Statement....." आता हे जे ॲन्युअल फायनान्शिअल स्टेटमेंट आहे हे बजेट आहे की काय आहे याची चर्चा सभागृहामध्ये झाली आहे. त्यांनी असे लिहिले आहे की, "According to Rule 8 of the said Order, the allocation of funds or outlays made by the Governor shall be reflected in the Annual Financial Statement. to be placed before the State Legislature and the development activities with regard to the outlays as aforesaid, shall be carried out by the State Government and the funds so allocated shall be non-divertible from the area of one Board to that of another Board.या प्रकारे माननीय राज्यपालांनी निदेश दिल्याप्रमाणे जो फंड द्यावयाचा असेल त्याबाबत माननीय राज्यपालांनी तीन निकष ठरविले आहेत. त्याप्रमाणे त्याचे अलोकेशन केले होते, ते पैसे आपल्याला एका बोर्डाकडून दुसऱ्या बोर्डाकडे डायव्हर्ट करता येणार नाहीत. The important provisions in the Nagpur Agreement is reflection in Article 371(2) One of the important features of the Nagpur Agreement was that subject to the requirements of single Government, the allocation of funds for expenditure over the different units (Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra) will be in proportion to their population, but in view of the undeveloped conditions of Marathwada, special attention will be given to promote all sided development of that area." सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी म्हटल्यानंतर फॅक्ट फायईडींग कमिटीने अहवाल दिला.

o-2.....

श्री. नितीन गडकरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"To address the problem of region disparity in development, the Government, long before the constitution of the Boards in 1994, had appointed a Committee of experts' viz., the Fact Finding Committee under the Chairmanship of renowned economist Dr.V.M. Dandekar to undertake an objective and in-depth study of the problem of regional imbalance."

या फॅक्ट फाईडींग कमिटीने काय म्हटले आहे? इंटिग्रेटेड बॅकलॉग कमिटीने काय म्हटले आहे? त्या नंतर त्यांनी कोणते आदेश दिले आहे? हे सर्व वाचल्यानंतर माननीय राज्यपालांनी आणखी एक डायरेक्शन्स दिल्या आहेत, ते सर्व मी वाचत नाही. त्या सर्व डायरेक्शन्समध्ये त्यांनी इंन्क्रिजिंग इम्बॅलन्सचा उल्लेख केला आहे. त्या पलिकडे त्यांनी म्हटले आहे की,"it is in para 5.1. It reads as under: The Governor is directed that this backlog should be liquidated in a period of four years, starting from the year 2002-2003." माननीय राज्यपालांनी डायरेक्शन्समध्ये म्हटले आहे की, हा बॅकलॉग पुढील चार वर्षात भरुन काढावा. याचा अर्थ असा की, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे हा बॅकलॉग भरुन काढण्याची सरकारची जबाबदारी आहे. परंतु मला खेद वाटतो की, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशांचे या सरकारने धज्जे उडविले, त्यांना केराची टोपली दाखविली. त्यामध्ये त्यांनी हुशारी केली. महाराष्ट्रातील नव्हे तर देशामधील हा फार मोठा डायरेक्शन्स फ्रॉड आहे. हे शब्द वापरतांना मला फार वेदना होत आहेत. प्रश्न असा आहे की, The directions are amended by directions only. एकीकडे तीन सहया असलेले पत्र घेऊन माननीय राज्यपालांच्या ऑर्डर्स आपण दुरुस्त करता. ज्या डायरेक्शन्स दिल्या आहेत त्या आपण दुरुस्त कश्या करता? माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख सरांच्या म्हणण्याप्रमाणे "सप्रेम नमस्कार विनंती विशेष" तसे हे चार ओळीच्या पत्राने आपण दुरुस्त करता.? पहिला मुद्दा असा की, या ज्या डायरेक्शन दिलेल्या आहेत त्यांना आपण वाटाण्याच्या अक्षता कशा लावल्या त्याची वस्तुस्थिती सांगतो. ॲन्युअल ओव्हरऑल प्लॅन बाबत ऑर्डरमध्ये म्हटले आहे. Sir, it further reads as under: Overall Allocation of the Annual Plan. " On the background mentioned above and to ensure that

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

no further backlog is created while the existing backlog is being liquidated, the Governor has directed that the Annual Plan Outlays in the Annual Plan 2002-2003 should be made in the following manner."

1. Irrigation Sector: The distinction between backlog and non-backlog allocations should be removed in the irrigation Sector and the Divisible outlays in the overall allocation in the Irrigation Sector as a whole, which includes both Budgetable and Non-budgetable outlay,should be distributed amongst the areas of the three Development Boards on the basis of the following weightages:

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

(1) Backlog : 35%
(As on 1st April 2002)
(2) Population : 40%
(Excluding Greater Mumbai).
(3) Net sown area 25%

माननीय अर्थमंत्रीसाहेब, माननीय राज्यपाल काय म्हणतात, ते ऐका.

श्री.जयंत पाटील(खाली बसून) : मी ऐकत आहे.

Shri Nitin Gadkari: Mr. Chairman, Sir, it is further stated as follows: " Further, if the State Government raises the Non-budgetable resources in the Irrigation Sector from the market, these should be raised for the State as a whole and distributed amongst the areas of the Three Development Boards equitably as mentioned above."सभापती महोदय, काहीही केले नाही. हे 2001 साली झाले. मग पुन्हा 2003 मध्ये पुन्हा डायरेक्शन्स् आल्या. 12 मार्च 2003 च्या डायरेक्शन्स् मध्ये माननीय राज्यपालांनी असे म्हटलेले आहे की," An amout of Rs.2750.84 crore would be the minimum allocation in the irrigation sector for the next 3 years beginning from 2003-2004." प्लॅन छोटा करुन घेतला. पण प्लॅनमध्ये 11 हजार कोटी रुपये आहेत. पहिले माननीय राज्यपालांच्या निदेशाच्या अमाऊंटचे पहिल्यांदा ॲलोकेशन करुन मग आपला जो काही चिल्लरवाडा करावयाचा होता, तो करावयाचा होता. तो राहीला बाजूला. मी तुमच्या हुशारीला दाद देतो. युतीच्या काळात मी मंत्री असताना आम्ही 13 हजार कोटी रुपयांचा प्लॅन केला होता. जेव्हा तुमच्या लक्षात आले की, प्लॅन जास्त केल्यावर बी.टी.देशमुख, नितीन गडकरी मुद्दा लावतात. चला, प्लॅनच्या एवढे पैसे ठेवा. देता येत नाही. मग काय करावयाचे ? विद्वान अर्थमंत्री महोदयांनी विद्वतेने नवीन मार्ग काढला आणि त्यांनी प्लॅनच छोटा केला. राज्य पुढे चालले आहे, राज्याला स्थैर्य प्राप्त झालेले आहे. राज्य प्रगती करीत आहे आणि पाच वर्षापूर्वी जो प्लॅन होता, तो प्लॅन त्यांनी आणला, त्याच्या खाली आले. म्हणजे वर जावयाच्या ऐवजी खाली पाय-या उतरले. का उतरले ? याचे कारण हातचलाखी करावयाची होती. 11 हजार कोटी रुपयांचा प्लॅन केला. सभापती महोदय, माननीय राज्यपाल सांगत आहेत.

. . . .पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

मग ते माननीय गव्हर्नरसाहेबांसमोर गेले आणि म्हणाले की, साहेब, मी काय करु ? आपले आदेश पाळावयास सरकार तयार आहे. पण सरकारची आर्थिक स्थिती चांगली नाही आणि मी प्लॅनच 11 हजार कोटी रुपयांचा केलेला आहे आणि माझ्याजवळ 1900 कोटी रुपये इरिगेशनचे आहेत. त्यातले नाबाडचे इतके आहेत, केंद्र सरकारचे इतके आहेत आणि 700-800 कोटी रुपयांचे माझे इरिगेशनचे बजेट आहे. प्रगतीशील, समृध्द, संपन्न महाराष्ट्राचे इरिगेशनचे बजेट किती ? तर 800 ते 900 कोटी रुपयांचे. माननीय श्री.खडसे मंत्री असताना आमचे 2400 कोटी रुपयांचे बजेट होते. बॉण्डस्चे वेगळे पैसे. या अर्थमंत्री महोदयांनी ते पाहिले, बजेटचा प्लॅन खाली केला आणि 19 मार्चला बजेट केले. हे सगळे गेले, संपले. पुढे गेले. माननीय राज्यपालांच्या कोणत्याही आदेशाचे पालन करीत नाहीत. पुन्हा 23 फेब्रुवारी 2004 ला निघाले की, I am directed to enclose the directives of the Government of Maharashtra."पुन्हा तशाच डायरेक्टीव्हज् आल्या. त्यांनी पुन्हा या डायरेक्शनमध्ये लिहीले की, "Para 2.5, The total allocation in Irrigation Sector in the Annual Plan 2004-2005: In the Annual Plan 2004-2005 the Governor has directed that Rs.3342.76 crore be provided in Irrigation Sector out of which Rs.890.82d crore is to make up the shortfall in expenditure in the Annual Plan 2002-2003." दरवेळेला माननीय राज्यपालांनी सांगितले की, मागच्या वेळेला तुम्ही दिलेले नाहीत, आता एवढा शॉर्ट फॉल आहे. हे ॲड करा आणि shortfall in expenditure is there and it has been shown in Annexure I. It is further stated that:"...There has been an excess expenditure in Rest of Maharashtra to the extent of Rs.299.06 crore. The Governor has directed that Rs.299.06 crore be deducted from the allocation on the basis of weighted average i.e.Rs.698.75 crore and the net out lay of Rs.399.69 crore be allocated to Rest of Maharashtra region in the Irrigation Sector." सभापती महोदय, हे मी म्हणत नाही तर माननीय राज्यपालसाहेब म्हणत आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुन्हा त्यास वाटाण्याच्या अक्षता लावल्या, पुन्हा त्यास केराची टोपली दाखविली. पुन्हा 25 फेब्रुवारी 2005 उजाडला, पुन्हा ऑर्डर आल्या. त्यामध्ये म्हटलेले आहे की, These Directives are in continuation of the earlier Directives issued on 15th December 2001, 12th March 2003 and 23rd February, 2004. पुन्हा नव्याने ऑर्डर दिल्या. " The region-wise allocation of outlay in the Irrigation Sector as per the Governor's Directives of 15th December,2001,12th March,2003 and 23rd February,2004 was made in 2002-2003,2003-2004 and 2004-2005. Since information on region-wise expenditure for the year 2004-2005 is not available at this stage, the Governor has directed that the region-wise shortfall/excess in expenditure in the Irrigation Sector in 2004-2005 will therefore be made good in course of the year 2005-2006 by providing additional outlay to Vidarbha, Marathwada in the Supplementary Budget." पुढचे जुलै महिन्याचे सप्लीमेंटरी बजेट येणार आहे, त्याकरिता या डायरेक्शन देऊन ठेवलेल्या आहेत. याहीवेळच्या बजेटला डायरेक्शन देऊन ठेवलेल्या आहेत. परंतु आपण काहीही करत नाही. सगळयाला केराच्या टोपल्या दाखविलेल्या आहेत. Para 3.4 further states that : " Total allocation in the Irrigation Sector in the Annual Plan 2005-2006 : Therefore the Governor has directed that Rs.4685.46 crore outlay be allocated in the irrigation sector in the Annual Plan 2005-2006 the region-wise distribution of which should be as given below." विदर्भ मराठवाड्याच्याबाबतीत येथे सगळे सांगितलेले आहे.

सभापती महोदय, साधा प्रश्न आहे. जो 11000 कोटी रुपयाचा प्लॅन होता. पहिल्यांदा 4685.46 कोटी रुपयाचा एक्स्पेंडीचर दाखवायचा होता, ते घटनात्मकरित्या आपल्यावर बंधनकारक होते. 11000 कोटी रुपये द्यायचे आणि मग नंतर बाकीचे बजेट आखायचे होते. मग कोणाचे पुतळे उभे करा, बगिचे उभे करा, गार्डन उभी करा, काय करायचे असेल ते करा. काय लावायचे आहे ते लावा, तो आपला अधिकार आहे. पण याबाबतीमध्ये एवढ्या पैशाचे अलोकशन करणे या कॉन्स्टीट्युनल डायरेक्टशन होत्या, त्या बंधनकारक होत्या. 11 हजार कोटी रुपयाचा प्लॅन होता. परंतु त्या नियमाचे आपण पालन केले नाही. आपला प्लॅन 2,500 कोटीचा असता तर आपले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्ग्युमेंट पटले असते. मला माहिती आहे की, ते कमिटेड एक्स्पेंडीचरही असू शकतो.. पण आपला प्लॅन जर 11000 कोटीचा होता, त्या प्लॅनमध्ये त्याप्रमाणे इरिगेशनसाठी तरतूद का केली नाही. अर्थमंत्री महोदय, आपल्याला ते नक्की माहीत होते, त्यासाठी जर तरतूद केली असती तर विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उत्तर महाराष्ट्राला पैशाचे अलोकेशन झाले असते त्यांना ते पैसे मिळाले असते. पण स्वाभाविकपणे आपल्याला ते मान्य नव्हते. आपली पैसे द्यायची इच्छा नव्हती. म्हणून यामध्ये हुशारी करुन 11000 कोटीचा प्लॅन केला आणि प्रत्यक्षात 1900 कोटी रुपयाचे इरिगेशनचे बजेट तयार केले. आणखी एक प्रश्न होता, त्याबाबतीतील कायदेशीर पोझिशन आपल्याला सभागृहासमोर सांगू इच्छितो. सभापती महोदय, आपण नागपूरच्या अधिवेशनामध्ये होता. यापूर्वी या परिस्थितीवर आम्ही ॲडव्होकेट जनरलचे ओपिनियन मागविले होते. ॲडव्होकेट जनरल श्री. जी.इ. वहानवटी यांचा जो रिप्लाय आहे तो मी आज सभागृहासमोर ठेवतो आहे, तो सभापती महोदय आपण वाचून घ्यावा.TIhis letter is written to Shri Jayant Patil, Minister of Finance, Mumbai. ते असे म्हणतात की, " Dear Shri Patil, with reference to your letter, I have gone through the relevant part of the proceedings in the Honourable House, which you give us in last Saturday and accordingly. I find that the main issues on which I am asked to give my opinion is, whether the directives of the Hon'ble Governor dated 15/12/01 and the directives of 12/3/03 passed under The Development Boards for Vidarbha, Marathwada and the Rest of Maharashtra Order, 1994 are mandatory or directory and whether there is any flexibility accorded to the State Government to make changes in the allocation of funds as laid down in the said Order. "

या नंतर कु. थोरात....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

I have restricted myself to only considering the issues of Constitutional law involved and I am not expressing any opinion on the fact viz. whether the Government has or has not complied with the said directives and the extent of such compliance. I may also mention that the Constitutional validity of Article 371(2) is the subject matter of Writ Petitions pending in the High Court and I am restricting myself only to the interpretation of the Constitutional provisions as they stand today."अध्यक्ष महाराज, चॅलेंज झाले आहे पण कोर्टाने स्टे दिलेला नाही. ॲडव्होकेट जनरलनीं सांगितले की, As for as the Constitution is concerned, the provision is straight.डायरेक्शन्स आहेत. आणि त्या मँन्डेटरी आहेत. हे त्यांचे ओपिनियन आहे. त्या ओपिनियनमध्ये ते शेवटी असे म्हणतात की,"in my opinion there is no doubt that the directives giv;en ;by the Hon'ble Governor are mandatory. I say this for thefollowing reasons.

(a) Article 371 begins with a non abs ante clause. The words, "notwithstanding anything contained" म्हणजे "notwithstanding anything contained in the Constitution," आता पर्यंत याच्यात काहीही लिहिले असेल, कोणताही अर्थ असेल तरी ते सगळे बाजूला करा. म्हणजे सगळे सोडून नव्याने कान्स्टीटयुशनमध्ये ही प्रोव्हिजन आहे. या सिग्निफिकंन्ट आहेत. "It marks a departure from the scheme of the Constitution which makes all financial matters the province of the Legislature." Lastly, it is stated that "As regards the degree of flexibility that the State Government may exercise in such allocation, the only variation that may be made will have to adhere to the parameters in Rule 8(a) of the Order which provides that the re-appropriation of funds may be made in conformity with the budgetary rules and procedure on the development activities undertaken within the area of the Board."अध्यक्ष महाराज, मी तुम्हाला एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पत्र वाचून दाखवितो. हे पत्र ऑनरेबल सेक्रेटरी श्री. शंकरन यांचे आहे. श्री. शंकरन यांनी रिलॅक्सेशनकरिता राज्यपालांना एक पत्र पाठविलेले आहे. त्याच्या आधी चार प्लॅनिंग सेक्रेटरींनी पत्र पाठविलले आहे. प्लॅनिंग सेक्रेटरी श्री. शंकरन साहेबांनी दिनांक 20 मार्च, 2005 रोजी जे पत्र लिहिलेले आहे, त्या पत्रात शेवटी त्यांनी असे म्हटलेले आहे की, तुमचा प्लॅन कमी आहे, 11 हजार कोटी रुपयाचा आहे, अडचणी आहेत, दुष्काळ पडला आहे, लॉ ॲन्ड ऑर्डरची परिस्थिती आहे. अशा प्रकारे जे काही श्री. जयंत पाटील साहेबानी त्यांना ब्रिफिंग केले असेल त्याप्रमाणे त्यांनी आपल्या सगळया अडचणी लिहून ते पत्र पाठवलेले आहे. त्यामध्ये पुष्कळ लिहिलेले आहे. पश्चिम महाराष्ट्रात दंगे होतील, हे होईल, ते होईल.तुम्हाला जे वाटेल ते लिहिलेले आहे.(अडथळा) हे सगळे त्या पत्रात आहे. मी तुम्हाला श्री. शंकरन साहेबांचे पत्र वाचून दाखवू कायं?

श्री. जयंत पाटील (बसून) : मी श्री. शंकरन साहेबांना ब्रिफिंग केलेले नाही.

श्री. नितीन गडकरी : शेवटी सेक्रेटरी श्री. शंकरन कोण आहेत? You are the main person. You are the incharge. आम्ही ऑलमोस्ट तुम्हाला बोलतो. श्री. शंकनचे आम्हाला काय करायचे आहे? आज शंकरन आहेत उद्या आणखी कुणी महादेवन येतील, यांच्या आधी श्री. जगदीश गुप्ता हे होते.

सभापती :श्री. नितीन गडकरी आपल्याला आणखी किती वेळ लागणा आहे?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी दहा मिनिटात माझा मुद्दा संपवतो. सभापती महोदय, श्री. शंकरन यांच्या पत्रात असे म्हटले आहे की,"In the light of foregoing paras, it is requested that the Hon'ble Governor may kindly review the directives and issue fresh directives at the earliest."

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

श्री. शंकरन साहेबांनी त्यामध्ये बदल करण्यासाठी माननीय राज्यपाल महोदयांना अशी विनंती केली की, आपण डायरेक्टीव्हज बदला. काल जे रेकॉर्ड सादर झाले आणि आम्ही वारंवार ते 4.00 वाजण्याच्या आधी देण्याचा आग्रह धरत होतो त्यातील हा भाग आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "In the light of foregoing paras it is requested that the Hon'ble Governor may kindly review the directives and issue fresh directives at the earliest. This letter is issued with the approval of the Government of Maharashtra."

माननीय मंत्रिमहोदय श्री. जयंत पाटील साहेब, आपल्या परवानगीने आपले सचिव श्री. शंकरन साहेबांनी हे पत्र लिहून विचारले की, डायरेक्टीव्हजला चेंज करणाऱ्या डायरेक्टीव्हज तुम्ही इश्यू करा किंवा फ्रेश डायरेक्टीव्हज इश्यू करा. सरकारने विनंती केली की, या परिस्थितीमध्ये आम्ही पैसे देऊ करु शकत नाही त्यामुळे आपण फ्रेश डायरेक्टीव्हज इश्यू करा किंवा डायरेक्टीव्हज दुरुस्त करा. अशी विनंती महाराष्ट्र सरकारने त्यांना केली. त्यानंतर गव्हर्नर साहेबांच्याकडून उपसचिव श्रीमती अश्विनी भिडे यांनी शासनाला ते पत्र लिहिले आहे. दिनांक 20 मार्च, 2005 चे हे पत्र आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "I am directed to inform you that in the light of the restriction on the Annual Plan size for 2005-2006 and circunmstances explained in the letter cited at reference No.2 theGovernor is pleased to accord his approval to the proposal submitted by your letter cited at reference No.1." त्यांनी हे पत्र शासनाला दिले. हे पत्र म्हणजे डायरेक्शन्स आहेत काय ? हे पत्र म्हणजे डायरेक्शन्सला दुरुस्त करणाऱ्या फ्रेश डायरेक्शन्स आहेत काय ? हे पत्र म्हणजे दुरुस्त केलेल्या डायरेक्शन्स आहेत काय ? As far as Constitution is concerned, directions are amended by directions only. आता आणखी एक घटनात्मक मुद्दा आहे. त्या मुद्दयावर अजून चर्चा व्हावयास पाहिजे की, एकदा माननीय राज्यपालांनी काढलेल्या ज्या डायरेक्शन्स आहेत त्या डायरेक्शन्स दुरुस्त करण्याचा किंवा एक्झम्प्ट करण्याचा माननीय राज्यपाल महोदयांना वैधानिक अधिकार आहे काय ? आता माझा मूळ प्रश्न आहे. आज या रेकॉर्डवर काय आहे ? This is a letter in simple and straight language. म्हणजे सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

श्री. नितीन गडकरी .....

प्रा. बी. टी. देशमुख नेहमी म्हणतात त्याप्रमाणे सप्रेम नमस्कार विनंती विशेष, आपले पत्र मिळाले, तुमच्या मजकुराला माननीय मंत्रिमहोदयांनी मंजुरी दिलेली आहे, कळावे लोभ असावा ही विनंती, आपली अश्विनी भिडे, माननीय राज्यपालांच्या उप सचिव. डायरेक्शन्स कशा इश्यू करतात हे मला आपल्याला पुन्हा सांगावे लागेल. यामध्ये राजमुद्रेचे चिन्ह आहे आणि त्याखाली असे लिहिले आहे की, Directives by the Governor of Maharashtra under Rule 7 of the Develpment Boards for Vidarbha, Maharashtra and Rest of Maharashtra Order, 1994, regarding regionwise distribution of the Annual Plan outlays, the quantum of back log, time frame for its removal and regionwise and sector wise allocation for the removal of backlog in the Annual Plan 2002/2003. पुन्हा सगळे जे कायदे आहेत, नियम आहेत त्याप्रमाणे प्राप्त झालेले जे अधिकार आहेत त्या अधिकाराप्रमाणे मी या या वर्षी या या डायरेक्शन्स दिलेल्या आहेत. डिक्शनरीमध्ये डायरेक्शन्सचा अर्थ निर्देश असा आहे. महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरलनी ओपिनियन दिले की, ते मँडेटरी आहे. आपण त्यांना ओपिनियन मागितले होते. आपल्या पत्रावर त्यांनी ओपिनियन दिलेले आहे की, These are mandatory. What is the meaning of mandatory? The meaning of mandatory is that is binding on the government. There is no appeal. त्यामध्ये बदल होऊ शकत नाही. कारण त्याचा अधिकार नाही. तो अधिकार ऑर्डर काढणाऱ्याला आहे की नाही हा घटनात्मक प्रश्न आहे. मी माननीय राज्यपालांचा आदर राखून सांगू इच्छितो. मला भारतीय घटनेप्रमाणे सांगावयाचे आहे. मी भारतीय घटना पूर्ण वाचली आहे. कलम 371(2) आणि त्याप्रमाणे माननीय राज्यपालांनी केलेले रुल्स वाचले. त्यामध्ये कोठेही माननीय राज्यपाल महोदयांना डायरेक्शन्स दुरुस्त करण्याचा किंवा पुन्हा नव्याने दुरुस्त करुन देण्याचा, त्याला दुरुस्त करण्याचा किंवा त्यामध्ये ॲड करण्याचा अधिकार आहे अशा प्रकारची प्रोव्हीजन नाही. ॲडव्होकेट जनरलने सांगितले होते की, ते मँडेटरी आहे. मग या सप्रेम नमस्कार विनंती विशेषच्या पत्रावर चार वर्षे हा जो बदल झाला, या चार वर्षामध्ये आदेश पाळले नाहीत, हे कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे ? सभापती महोदय, याबाबतीत मला आपल्याकडून संरक्षण पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

या चार वर्षात पाटबंधारे सेक्टरच्या बाबतीमध्ये राज्यपालांनी ज्या डायरेक्शन्स दिलेल्या होत्या त्याचे पालन या सरकारने केलेले नाही आणि ते बंधनकारक होते असे ॲडव्होकेट जनरलने सांगितलेले आहे. त्याबाबतीमध्ये डायरेक्शन्स अमेंडेड ओन्ली बाय डायरेक्शन्स किंवा फ्रेश डायरेक्शन्स. आता तेही करता येते की नाही हा सुध्दा वैधानिक मुद्दा आहे. मंत्रिमहोदय, आता आपण एक काम करावे. आज राज्यपालसाहेबांकडे जावा. त्यांना विनंती करा आणि गेल्या 4 वर्षांच्या डायरेक्शन्स, डायरेक्शन्सने सुधारुन आणा. माझा आक्षेप आहे. आम्ही सगळेजण राज्यपालांना विनंती करु की, साहेब, आपण आम्हाला एकदा न्याय दिलेला आहे, हे शब्द, हे शस्त्र तुम्हाला, फेकण्याचा अधिकार आहे, पण ते परत घेण्याचा किंवा दुरुस्त करण्याचा तुम्हाला घटनेप्रमाणे अधिकार नाही. मी हे त्यांचा आदर ठेवून सांगत आहे. मा.राज्यपालांनी मा.राष्ट्रपती महोदयांना पत्र लिहिले, हा विषय आपला नाही. राज्यपाल महोदयांची कृती हा या सभागृहाच्या चर्चेचा विषय होऊ शकत नाही आणि म्हणून मला राज्यपालांना कोणत्याही वादामध्ये ओढावयाचे नाही. परंतु राज्यपालांच्या ऐवजी माझा सरकारला प्रश्न आहे की, 11 हजार कोटीचा प्लॅन असताना पाटबंधारेसाठी 4300 वा 4400 कोटीची तरतूद करावयास पाहिजे होती आणि ती करणे बंधनकारक होती असे ॲडव्होकेट जनरलने तुम्हाला पत्र लिहून सांगितले होते. ते सभागृहाच्या रेकॉर्डवर आले होते. मा.राज्यपालांनी त्यांच्या डायरेक्शन्स कोठेही दुरुस्त केल्या नव्हत्या. आणि तुम्ही स्वत: तुमच्या परवानगीने गेलेल्या पत्रावर श्री.शंकरनसाहेबांनी केलेली विनंती काय होती ? तुम्ही विनंती केली होती की, डायरेक्शन्स दुरुस्त करुन द्या किंवा फ्रेश डायरेक्शन्स द्या. तुम्हाला फ्रेश डायरेक्शन्स मिळाल्या नव्हत्या. डायरेक्शन्स दुरुस्त झाल्या नव्हत्या. तुम्हाला सप्रेम नमस्कार विनंती विशेष अशा स्वरुपात पत्र मिळाले. त्याच्या आधारावर 4 वर्षे बजेटमध्ये हातचलाखी केली. तुम्ही विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उत्तर महाराष्ट्रावर अन्याय केला आहे. त्याबाबत उत्तर द्यावे. याबाबत तुम्ही घटनेचे उल्लंघन केले आहे. घटनेच्या विसंगत वागलेले आहे. घटनेचा भंग करणारे तुमचे वर्तन झालेले आहे. मंत्रिमहोदय, तुम्ही राज्यपालांसमोर शपथ घेतली आहे त्याची तुम्हाला आठवण

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करुन देऊ का ? भारतीय घटनेला स्मरुन मी, जयंत राजारामबापू पाटील अशी शपथ घेतो की, मी, घटनेला बांधिल राहून घटनेचे, वचनांचे पालन करीन. केले का ? (अडथळा) त्यावेळी भगवद्गीतेवर हात असेल, त्यावेळी कशावर हात होता हे मला माहीत नाही. परमेश्वरावराला स्मरुन शपथ घेतली आहे, कारण शपथेचे दोन भाग असतात. मा.नवलकरसाहेब आपणही शपथ घेतली होती. त्यावेळी काहीजण गीतेवर हात ठेवून शपथ घेतात तर काहीजण परमेश्वराला स्मरुन शपथ घेतात.

सभापती : मा.विरोधी पक्ष नेते मी आपल्याला 35 मिनिटांचा वेळ दिलेला आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, 35 दिवस चालू द्या. याचे कारण असे की, घटना, लोकशाही, नियम, लेजिस्लेचर, कायदेमंडळ या सगळयांच्या धज्जीया उडविल्या आहेत. सगळयांचा अपमान झालेला आहे. शपथ घेणारे आमचे अर्थमंत्री आणि शपथ घेतल्यानंतर 4 वर्षात या अर्थमंत्र्यांनी घटनेच्या धज्जीया उडविल्या आहेत. सभापती महोदय, मला यासंबंधी 3 प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत की, राज्यपाल महोदयांनी डायरेक्शन्स दिल्या होत्या त्या शासनावर बंधनकारक आहेत हे ॲडव्होकेट जनरल यांचे मत बरोबर आहे काय ? तुम्ही विशेष परिस्थितीत विनंती केल्यानंतर श्री.शंकरन यांच्या पत्राप्रमाणे आपण डायरेक्शन्सला फ्रेश डायरेक्शन्स द्या किंवा दुरुस्त करुन द्या अशी मागणी केली त्यानुसार डायरेक्शन्स इश्यू न होता केवळ पत्र इश्यू झाले हे खरे आहे काय ? ते पत्र होते, डायरेक्शन्स नव्हत्या तर तुम्ही या वर्षी त्या पत्राचा आधार घेऊन वागले आहात. ते वागणे तुम्ही घटनेला स्मरुन शपथ घेतली आहे त्या शपथेप्रमाणे योग्य आहे का ? घटनाबाहय वर्तन केल्यामुळे राज्यसरकार बरखास्त होऊ शकते, तुमचे मंत्रीपद जाऊ शकते याची तुम्हाला कल्पना आहे काय ? गेल्या 4 वर्षामध्ये डायरेक्शन्स दुरुस्त केल्या आहेत असे तुम्ही आम्हाला सांगितले, रेकॉर्ड लपवून ठेवला. त्या डायरेक्शन्स, डायरेक्शन्सने दुरुस्त झाल्या नाही. फ्रेश डायरेक्शन्स दिल्या गेल्या नाही. केवळ पत्राचा आधार घेऊन या 4 वर्षात तुम्ही घटनेप्रमाणे बंधनकारक असताना तुम्ही हातचलाखी केलेली आहे ते घटनेच्यादृष्टीने योग्य आहे काय ? म्हणून आमची आपल्याकडे मागणी आहे. हे सभागृह कायदेमंडळाचे आहे, या सभागृहात या विषयाची चर्चा झाली पाहिजे, कायद्यांची चर्चा झाली पाहिजे, घटनेची चर्चा झाली पाहिजे आणि यापेक्षा

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

कोणतेही मोठे कामकाज, महत्वाचे कामकाज असू शकत नाही. These are the basic features of the Constitution. यावरील चर्चेला सर्वोच्च प्राधान्य आहे. कारण या लोकशाहीचा, लेजिस्लेचर प्रोसिजरचा आत्मा भारतीय घटना आहे आणि त्या घटनेच्या इंटरप्रिटिशनवर ते घटनाबाहय वर्तन झाले आहे त्याची येथे चर्चा होत आहे आणि मी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांवर मला हे सरकार देऊ शकत नाही.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

हे आरोपीच्या पिंज-यात आहेत. यांनी जी शपथ घेतली त्याप्रमाणे हे वागलेले नाहीत. म्हणून मी आपणाकडे संरक्षण मागत आहे. या सभागृहामध्ये वेळोवेळीचे दाखले आहेत. ज्या ज्या वेळी सभागृहामध्ये वैधानिक अशा प्रकारचा संभ्रम निर्माण होतो अशा वेळी, या सभागृहाला जे अधिकार आहेत त्यानुसार मी उपस्थित केलेल्या वैधानिक मुद्यांवर, महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल यांना ताबडतोबीने सभागृहामध्ये पाचारण करावे. त्यांनी येथे येऊन या सर्व सभागृहाला मार्गदर्शन करावे. मी मांडलेले वैधानिक मुद्दे बरोबर आहेत की चुकीचे आहेत हे आम्हाला समजू द्या. घटनेनुसार दिलेले निर्देश बंधनकारक आहेत की नाहीत हे कळू द्या. घटनेची शपथ घेऊन देखील मॅन्डेटरी असणा-या घटनेचे पालन झाले नाही. हे योग्य आहे की अयोग्य आहे हे कळू द्या. या विषयासंबंधी महाराष्ट्रामध्ये फार मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे. चारही वर्षाचे बजेट हे पूर्णपणे अन्कॉन्स्टीटयूशनल आहे. ब्रीच ऑफ कॉन्स्टीट्यूशन आहे. म्हणून सभागृहापुढील सर्व कामकाज रोखून ठेवून या विषयावर चर्चा झाली पाहिजे. हे सभागृह आत्मा आहे, लोकशाहीचा आत्मा आहे, भारतीय घटनेचा आत्मा आहे. व्हायलेशन कसे झाले ते मी सिध्द केलेले आहे. माझ्याकडे डॉक्युमेंट आहे. राज्य शासनाच्या प्लॅनिंग सेक्रेटरींनी जे मागितले ते यांना मिळालेले नाही. जे मिळाले ते केवळ पत्र आहे. या पार्श्वभूमीवर माझी आपल्याला विनंती आहे की, महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल यांना या सभागृहामध्ये पाचारण करा. आमचे मुद्दे आपण रेफर करा. आपण आमचे पालक आहात. आपण कोणत्याही पक्षाचे नाही. हे सार्वभौम सभागृह आहे. आपण आम्हाला बस म्हटले की, आम्ही बसतो आणि उठ म्हटले की उठतो. आम्ही सर्व सभागृहाचा सन्मान ठेवतो. सभापती महोदय, आपण या सभागृहाच्या सर्वोच्च स्थानी आहात. आपण देखील सभापती पदाची शपथ घेतलेली आहे. आपण देखील आम्हाला घटनेने अभय दिलेले आहे. आपण उदार आहात, न्यायनिष्ठ आहात आणि म्हणून आम्हाला विश्वास आहे की, आम्हाला तुमच्याकडून न्याय मिळणार आहे. आपण कोणत्याही गोष्टीचा विचार न करता दूध का दूध, पानी का पानी केल्या शिवाय राहाणार नाही. लोकशाहीच्या दृष्टीने, भारतीय घटनेच्या दृष्टीने तुम्ही आम्हाला न्याय दिल्या शिवाय राहाणार नाही. आपल्या सद्सदविवेकबुध्दीवर या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचा विश्वास आहे. म्हणून आपणास आमच्या सर्व मा.सदस्यांच्यावतीने मी विनंती करतो की, हे मुद्दे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

क्लिष्ट आहेत, घटनात्मक आहेत, याबाबातीत कदाचित आम्ही चुकलो असू आणि ॲडव्होकेट जनरल यांनी तसे सांगितले तर आम्ही आमचे म्हणणे मागे घेऊ. परंतु हा प्रश्न घटनात्मक आहे या आधारावर आपण ॲडव्होकेट जनरल यांना या सभागृहामध्ये बोलवा. आवश्यकता असेल तर या सार्वभौम सभागृहाचे कामकाज थांबवा आणि या विषयावर पहिल्यांदा चर्चा घ्या आणि आम्हाला न्याय द्या. भारतीय घटनेच्या दृष्टीने आणि लोकशाहीच्या तत्वानुसार हे सभागृह चालणार नसेल तर सगळया गोष्टीला काही अर्थ राहाणार नाही. म्हणून घटनेचे, लोकशाहीचे आणि या सभागृहाचे पावित्र्य राखण्याच्या दृष्टीने, सभागृहाचा सन्मान कायम ठेवण्याच्या दृष्टीने आपण आम्हाला वैधानिक संरक्षण द्यावे. याबाबतीत महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल यांना पाचारण करा आणि या विषयावर विस्तृतपणे चर्चा करा. यामधील दूध का दूध आणि पानी का पानी हे पुन्हा एकदा सिध्द झाले पाहिजे अशी माझी आपणाला विनंती आहे. मधल्या काळात मंत्री महोदय श्री. जयंत पाटील यांना संधी आहे की, त्यांना मा.राज्यपालांकडे जाऊन ऑर्डर्स दुरुस्त करुन घेता येतील. तसे ते करु शकले तर मला त्याबाबतीत काही बोलायचे नाही. परंतु सध्या कायद्याची स्थिती अशी आहे की , He is in the wrong box. ते यासंदर्भात युक्तिवाद करु शकत नाहीत. डायरेक्शनला डायरेक्शन किंवा फ्रेश डायरेक्शन त्यांच्याकडे नाहीत. असतील तर ते त्यांनी द्यावेत. त्यांना फक्त सप्रेम नमस्कार, वि.वि. एवढेच पत्र दिलेले आहे. यामुळे ब्रीच ऑफ कॉन्स्टिट्युशन झालेला आहे. म्हणून याबाबतीत आपण आम्हाला संरक्षण द्यावे, ॲडव्होकेट जनरल यांना या ठिकाणी बोलवावे अशी विनंती करुन मी माझा हरकतीचा मुद्दा संपवितो.

--

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, काल जे कागदपत्र या सभागृहाला सादर झाले आणि त्यानंतर महाराष्ट्राच्या इतिहासामधील अतिशय महत्वपूर्ण घटनेवर आपण चर्चा करण्यास परवानगी दिली त्या बद्दल मी आपले मनापासून अभिनंदन करतो. महाराष्ट्राच्या वित्त मंत्र्यांना मी महाराष्ट्राच्या बिगर अनुशेष भागाकडून धन्यवाद देतो. हे धन्यवाद देतो याचे कारण असे की, अर्थसंकल्पावरील चर्चा संपेपर्यन्त हे कागदपत्र सभागृहासमोर येऊ नयेत यामध्ये त्यांनी यश मिळविलेले आहे. महाराष्ट्राच्या अनुशेष भागाकडून त्याबद्दल तीव्र नाराजी आहे. 30 एप्रिल 2005 ही तारीख 29 दिवसांवर आलेली आहे हे लक्षात घेऊन मी पाच-सात मिनिटांमध्ये माझे विचार मांडणार आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या इतिहासाच्या फार मोठया टप्प्यावर आपण आहोत मी याची आपल्याला जाणीव करुन देऊ इच्छितो. तो टप्पा काय आहे ? टप्पा असा आहे की, महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतरच्या वीस वर्षात महाराष्ट्राच्या निरनिराळया भागाला आपल्याला विषम वागणूक मिळते आहे हे लक्षात आले नाही. 1960 ते 1980 या कालावधीतील 20 वर्षे निघून गेली.1981,1982, 1983,1984 अशी भराभर वर्षे लोकांच्या नजरेला दिसावयास लागली.एका बाजूला डोंगर होत आहे आणि दुस-या बाजूला खड्डे होत आहेत. हा असमतोल मोठया प्रमाणात वाढतो आहे. हे दिसावयास लागले आहे. सभापती महोदय, त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांचे शब्द मला आठवतात. महाराष्ट्राच्या कोणत्याही भागात व्देशाची भावना होता कामा नये. ताबडतोब दांडेकर समिती निर्माण करण्यात आली. एक वर्षाच्या आत या समितीचा रिपोर्ट घेतला आणि तो रिपोर्ट शासनाने एका महिन्यात शासनाने सभागृहात रिपोर्ट सादर केला. माननीय राष्ट्रपतींना विनंती करणारा दोन्ही सभागृहाने 27 जुलै,1984 रोजी एकमताने ठराव केला. हा असमतोल टोकाचा झालेला आहे.तेव्हा तुमचे अधिकार वापरा. सभापती महोदय दोन्ही सभागृहाचे एकमताचे ठराव आहेत. 1984 मध्ये ठराव झाल्यानंतर त्यासंबंधीचे आदेश 9 मार्च 1994 ला पारीत झाले. आणि महाराष्ट्राच्या राज्यपालांना अधिकार दिले गेले. सभापती महोदय, काय आदेश दिले गेले ? माननीय राष्ट्रपतींची ऑर्डर आहेत. 9 मार्च, 1994 च्या ऑर्डरमध्ये स्पष्टपणाने म्हटले आहे की, मला असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी आता तुम्हाला हे अधिकार देतो की, या तीन बाबतीमध्ये असलेला असंतोष दूर करण्याच्या कारवाईला सुरुवात करा. राज्यपालांनी कायदा केला. आणि त्या कायद्यामध्ये लिगल इन्स्ट्रुमेंट डिफाईन केलेले आहेत. निदेश आहेत आणि नियम आहेत. नियम आहेत ते त्यांच्या कामकाजासाठी आहेत. आणि 1994 नंतर या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांनी त्यांच्याकडे मागणी केल्यानंतर 15 डिसेंबर, 2001 रोजी निर्देश दिले. हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. 15 डिसेंबर, 2001 ला त्यांनी डायरेक्टिव्हज् काढले आणि ते एका भागा विषयीचे काढले. जल सिंचना विषयीचे काढले आणि त्या डायरेक्टिव्हज्मध्ये त्यांनी स्पष्ट असे म्हटले आहे की, देशाच्या घटनेने राष्ट्रपतीला जे अधिकार दिलेले आहेत ते त्यांनी मला दिलेले आहेत. आणि त्यामुळे याबाबतीमध्ये मी हे आदेश पारीत करीत आहे. त्यांनी आदेश पारीत केले. फॉर्म्यूला दिला. आणि नंतरचा महाराष्ट्राचा इतिहास या कॉन्स्टीटयूशनल मेकॅनिझमच्या टोटल व्हायोलशनचा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख..

आहे. हे व्हायोलेशन सुध्दा केवढे ताकदपूर्ण आहे. महाराष्ट्रातल्या बिगर अनुशेष भागांनी आणि हा भाग फार छोटा आहे. अनुशेषग्रस्त भागाला गेली चार वर्षे या ठिकाणी जी वागणूक दिलेली आहे. ती केवढी लाजीरवाणी आणि ऐतिहासीक गोष्ट आहे. Documents are not presented in the House without demanding it. आपण खालच्या आणि वरच्या सभागृहात पाहिले. दोन्ही सभागृहांनी आम्हाला न्याय दिला. सभापतींनी आम्हाला न्याय दिला. म्हणून या कागदपत्रांचे दर्शन तरी झाले. नाही तर ओळखा पाहूची गोष्ट आली असती. ओळखा पाहू काय डायरेक्शन्स दिलेल्या आहेत ? म्हणजे आम्ही प्रतिनिधी म्हणून गावोगावी जाऊन सांगितले असते. ओळखा पाहू राज्यपालांच्या डायरेक्शन्स काय आहेत ? पहिल्या वर्षी या सभागृहात या डायरेक्शन्स ठेवल्या नाहीत. सभापती महोदय, सभागृहातील वातावरण गेली तीन चार दिवस तापलेले असताना त्यानंतर आपण आदेश दिल्यानंतर काल तरी ही नॉन रिलेटेड डाक्यूमेंट सभागृहासमोर ठेवली गेली. हे कॉन्स्टीटयूशनल ऑर्डरशी रिलेटेड नाही. तरी सुध्दा शासनाला धन्यवाद दिले पाहिजेत. मी माझे भाषण फार तपशीलाने करीत नाही. त्यास दोन कारणे आहेत. ते मुद्दे मी वारंवार मांडले ही एक गोष्ट आणि माझ्या मनामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत दुर्देवी घटनेचे स्वप्न पडत आहेत. ते स्वप्न हे 30 एप्रिल या तारखेचे आहे. 30 एप्रिलला या कॉन्स्टीटयूशनल ऑर्डर एक्टेंड झाल्या नाहीत तर 1 मे रोजी महाराष्ट्रात नवा इतिहास सुरु होईल. 9 मार्च 94 ची कॉन्स्टीटयूशनल ऑर्डर आहे ही फक्त पाच वर्षासाठी आहे. याच्यामध्ये असे म्हटले आहे की, या ऑर्डरला मुदतवाढ मिळू शकते. आणि त्याप्रमाणे या ऑर्डरला पाच वर्षाची मुदतवाढ मिळाली. 1994 ची ऑर्डर 1999 पर्यन्त राहीली. आणि 1999 ची ऑर्डर 2004 पर्यन्त राहीली. 2004 नंतर जी मुदतवाढ मिळाली ती एका वर्षासाठी मिळाली आहे.

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 13:50

श्री. बी.टी.देशमुख ...

एक वर्षाच्या मुदतवाढीनंतर म्हणजे 30 एप्रिल 2005 ला ही मुदत संपणार आहे. सुदैवाने मुदतवाढ मिळाली तर पैशाचे हिशोब आणि तारखा याला काही अर्थ राहील. अन्यथा महाराष्ट्रामध्ये 1 मे 2005 पासून नवा इतिहास सुरु होईल आणि या नव्या इतिहासामध्ये काही विभाग हे लाथेखाली तुडविले जातील अशा प्रकारची स्पष्ट प्रतिमा या राज्यातील जनतेसमोर उभी राहील आणि या परिस्थितीला कोणी नाकारु शकणार नाही.डायरेक्शन पाहिल्या तर हे लक्षात येईल. सभापती महोदय, विरोधी पक्षनेत्यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा याठिकाणी मांडला. तेवढयापुरते मी बोलणार आहे. कारण शेवटी हा पेशंट इतका घायाळ झालेले आहे की त्याला दुरुस्त करावयाचे म्हटले तर काय काय करणार हा प्रश्न आहे.आम्ही तरी काय काय करणार. चारही बाजूंनी तो घायाळ आहे. एक औषध आहे त्याने पेशंट दुरुस्त होईल असे नाही निदान या सभागृहाने ती कामगिरी केली होती हे कळू द्या.. सभापती महोदय, माझे म्हणणे मी थोडक्यात मांडून विषय संपविणार आहे. या देशामध्ये राज्ये नियमाने चालतात.नियम एका प्रकारचे नाहीत. प्रत्येक नियमाचे स्टेटस् वेगवेगळे आहे.कर्ता कोण आहे,पॉवर्स काय आहेत,ज्युरीडिक्शन काय आहे याच्यावरुन ते ठरते. Constitusion is the highest law of the land. देशाचा सर्वोच्च कायदा आहे. महाराष्ट्र सरकारने एक जीआर काढला आणि घटनेत बदल केला चालले काय ? एखाद्या भाग्यवान मंत्र्यांने जीआर काढला आणि सांगितले की, घटनेतील कलम 371(2) वगळून टाका असे सांगितले तर चालेल काय त्याला तसे करता येणार नाही. या राज्यातील काही कायदे त्यात काही कमी असेल किंवा चूक असेल आपणच कायदे करतो.आम्ही तिकडे जाऊन सांगू शकतो काय की आम्हीच कायदे केले आहेत थोडेसे जमवून घ्या. मुख्यमंत्री किंवा सभापती किंवा उपमुख्यमंत्री म्हणू शकत नाहीत की कायदा दुरुस्त करा.आम्हांला एक बिल मिळाले त्यात चूक आहे पण ती दुरुस्त करण्यासाठी प्रोसिजर आहे. Law can be amended by further amending the act. The directions of the Governor can be amended, according to my opinon, by further directions. महाराष्ट्र शासनाच्या नावाने एक पत्र पाठविलेले आहे त्याच्यामध्ये ही गोष्ट मी अनेक दिवसापासून बोलत आहे.स.न.वि.वि याठिकाणी घेऊन येता हे बरोबर नाही. सचिवांनी अतिशय उत्तम शब्द पत्रामध्ये वापरले आहेत. अंदाजपत्रकावरील चर्चा संपल्यानंतर काल

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बी.टी.देशमुख ...

हे पत्र आमच्यासमोर आले. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"In the light of foregoing paras it is requested that the Hon'ble Governor may kindly review the directives and issue fresh directives at the earliest....त्यांना त्यांच्या डायरेक्टीव्हज् अमेंड करता येतात किंवा नाहीत याविषयी मी बोलत नाही. तो वेगळा विषय आहे.Whether he can amend his own derections हा वेगळा प्रश्न आहे. साधा प्रश्न आहे की सरकारने त्यांना रिक्वेस्ट केली की डायरेक्टीव्हज् रिव्हयू करा आणि अमेंड करा. हे एका ओळीचे पत्र आहे. राज्यपालांच्या कार्यालयाने छान पत्र पाठविले.त्यांनी ज्या डायरेक्शन्स् काढल्या आहेत त्या सर्व डायरेक्शनची सुरुवात अशी आहे की, या या कायद्याप्रमाणे दिलेल्या अधिकाराचा वापर करुन हया . या पत्रामध्ये तसे दिसत नाही..एक गोष्ट मला आपल्या लक्षात आणून द्यावयाची आहे की, formal direction issued under the constitutional powers या अशा स.न.वि.वि. पत्राने झाल्या असे गृहीत धरता येते काय ? यामध्ये ॲडव्होकेट जनरलचे मत दिलेले नाही. माझे काय म्हणणे आहे ते त्यांनी जे मत दिले त्याच्यामध्ये दोन गोष्टी स्पष्ट सांगितल्या आहेत...

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

त्यांनी जे मत दिलेले आहे त्यात त्यांनी दोन गोष्टी स्पष्टपणे सागितलेल्या आहेत. त्यातील पहिली गोष्ट अशी आहे की, "directions are mandatory. Re-allocation and re-appropriation can be done within the resepctive development area. मराठवाडयाचे मराठवाडयात करता येईल ओपिनियन देत असतांना रिॲलोकेशनचा स्कोप त्यांनी डिफाईन केलेला आहे.इतकेच नव्हे तर कोर्टात केस असतांना त्यांनी ओपिनियन दिले आहे.या सभागृहाने अनुशेष भागाला दिलेली ही फार मोठी मदत आहे.पैसे मिळाले नाहीत हे ठीक आहे.पंरतु आमचे म्हणणे येथे ऐकून घेतले गेले याची नोंद महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये झाली आहे.आज या बाबतीत माझे एवढेच म्हणणे आहे की, त्या चेअरवरुन आपण किंवा या सभागृहातून आम्ही सर्वजण गेली चार वर्षे या दांडगाईला काही आळा घालू शकलो नाही. हे अपयश आहे आणि लोकशाहीतील हे फार मोठे अपयश आहे .तुम्ही चेअरवरुन आणि आम्ही या सभागृहामधून या विषयाला तोंड फोडण्याचा गेल्या चार वर्षापर्यन्त आपआपल्या परीने प्रयत्न केला होता. याची इतिहास नोंद घेईल.सभापती महोदय, न्यायालयामध्ये आम्हाला निर्णय मिळविण्यात यश आलेले नाही हे सुध्दा अनुशेषग्रस्त भागाचे मोठे दु:ख आहे.लोकमताचा रेटा या कामाच्या पाठीमागे जसा राहिला पाहिजे होता तसा तो राहिलेला नाही. हा सुध्दा त्यातील एक महत्वाचा भाग आहे. पंरतु या सभागृहामध्ये आम्ही आमच्या सर्व शक्तीनुसार प्रयत्न केला होता. माझी आपल्याला ठामपणाने एक विनंती आहे. जो काही निर्णय यावयाचा असेल तो येईल परंतु ॲडव्होकेट जनरल यांना या सभागृहामध्ये बोलावून मत देण्याचा अधिकार आहे. 1 ते चार पर्यन्त formal directions of the Governor आहेत. Whether this constitutes the amendment? आणि जर तसे नसेल तर सर्व चर्चा संपल्यानंतर सर्व डॉक्युमेन्टस सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले आहेत हे लीगल आहेत काय ? हा मुद्दा ॲडव्होकेट जनरल यांच्यासमोर ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.सभापती महोदय, प्रत्येक वेळेला डायरेक्टीव्हज, अनुपालन अहवाल हे सारे डॉक्युमेन्टस बजेट सोबत सादर झालेले नाहीत.हे डॉक्युमेन्टस उशिरा सादर करण्यात आलेले आहेत .नुसतेच उशिरा सादर करण्यात आलेले नाहीत तर ते अत्यंत दुर्देवी आहेत आणि अत्यंत विचित्र पध्दतीने ते सभागृहाला सादर झालेले आहेत. कोठे सादर झाले होते तर कोठे ते सादर

झालेले नव्हते.तेव्हा ही दुसरी बाब मी मुद्दाम सुचवलेली आहेत.देशाच्या इतिहासामध्ये असे कोठे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

होत असते काय ? ज्या कायद्याला धरुन आणि ज्या नियमाला धरुन अंदाजपत्रक तयार करावयाचे असते ते नियम ज्या सभागृहाने अंदाजपत्रक मंजूर करावयाचे असते त्या सभागृहाला सादर केले जात नाही. अशा प्रकारचा इतिहास असलेले महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे असा लौकिक कॉन्स्टिटयुशनल हिस्ट्रीमध्ये नोंदविला जाईल. म्हणून या बाबतीत माझे दोन मुद्दे आहेत Whether the directions are appropriately amended by the सप्रेम नमस्कार विनंती विशेष हा माझा पहिला मुद्दा असून माझा दुसरा मुद्दा असा आहे की, the documents related to the budget are highly important and constitutional. गेली चार वर्षे सतत कालच्या प्रकारासकट उशिरा सादर करण्यात आले होते. Whether this is a fair and legal practice? या दोन बाबतीत सभागृहाला आणि या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनुशेषग्रस्त भागाला न्याय द्यावा अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

श्री.दिवाकर रावते (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय,अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी अनुशेषावर बोलत असतांना हे सर्व मुद्दे मी मांडले होते .गेल्या चार वर्षात अनुशेष दूर केला गेला नसल्यामुळे या वर्षी तो अनुशेष दूर काढण्यासाठी माननीय राज्यपालांनी निर्देश दिले होते आणि ते मॅन्डेटरी आहेत तसेच ते निर्देश शेवटचे असून या पुढे जाता कामा नये असेही त्यांनी सागितले होते. हे निर्देश पाळले गेलेच पाहिजे अशा प्रकारचे बंधन घालण्यात आले होते. ते निर्देश मी आपल्याला नंतर वाचून दाखविणार आहे.हुशार अर्थमंत्र्यांनी उत्तर देत असतांना सर्व सन्माननीय सदस्यांची नावे घेतली होती आणि माझ्या नावाचा फक्त एवढाच उल्लेख केला की, या अर्थसंकल्पावरील चर्चेत श्री.रावते बोलले आहेत.परंतु माझ्या भाषणात अनुशेषाचा मी उल्लेख केला होता. त्याबाबत उत्तर का दिले नाही ? असे मी त्यांना विचारले होते. तेव्हा त्यांनी मला असे सागितले की," तुम्ही अनुशेषावर बोलला नाहीत. ". तेव्हा मी त्यांना असे सांगितले की ,"मी माझ्या भाषणात अनुशेषावर बोललो होतो तसेच माननीय राज्यपालांनी काय निर्देश दिले होते ते सुध्दा वाचून दाखविले होते. परंतु माननीय मंत्रिमहोदयांनी त्याबाबत काहीही खुलासा त्यांच्या उत्तराच्या भाषणात केलेला नाही. अनुशेष या विषयाला त्यांना हातही लावावयाचा नव्हता असे यावरुन वाटते. अर्थात हा त्यांचा प्रश्न आहे. मी त्याबाबत काही बोलणार नाही.माननीय वित्त राज्यमंत्री हे विदर्भातील आहेत. आतून त्यांना असे वाटते की, आपल्या भागावर अन्याय होत आहे.ते स्वाभिमानी असल्यामुळे ते कधी तरी चिडतील.त्यांना जर राग आला तर ते लाल दिव्याची गाडीसुध्दा सोडून देतील याबद्दल मला खात्री आहे. एवढे ते स्वाभिमानी आहेत. त्याचबरोबर ते देशमुख असून ते बाणेदारही आहेत. परंतु त्यांचे दुर्दैव असे आहे की, ते विदर्भातील असून आणि विदर्भातील इरिगेशनच्या बाबतीत सर्वात जास्त अनुशेष असूनसुध्दा हे पाप त्यांच्या हाताने करावयाला लावले जात आहे...

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

ही पश्चिम महाराष्ट्राची कर्तृत्त्वाची बाब आहे, त्याला दाद दिली पाहिजे. म्हणजे विदर्भातील माणसाच्या खांद्यावर बंदूक ठेवून विदर्भालाच मारले जात आहे. अध्यक्ष महाराज, सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.गडकरी यांनी येथे श्री.शंकरन् यांच्या पत्राचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, आमचा काहीही संबंध नाही. अध्यक्ष महाराज, मी त्या पत्रापुरतेच बोलणार आहे. कारण या संबंधातील घटनात्मक बाबी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि विरोधी पक्षनेत्यांनी येथे मांडलेल्या आहेत. शिवाय आमचे मित्र सन्माननीय श्री.गुरूनाथ कुळकर्णी हे वकील असल्याने आणि कोकणातील असल्याने तेही या बाबत मुत्सद्दीपणे काही मुद्दे मांडतीलच. अध्यक्ष महाराज, या सभागृहामध्ये स्वत: ॲडव्होकेट जनरल यांनी येऊन या संदर्भातील आपले मत मांडले होते. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "In my opinion there is no doubt that the directives given by the Hon'ble Governor are mandatory." अध्यक्ष महाराज, मँडेटरी काय आहे या संबंधात ॲडव्होकेट जनरलनी काय खुलासा केला तो मला येथे पुन्हा वाचावासा वाटतो म्हणून मी तो येथे वाचून दाखवितो. त्यांनी म्हटले आहे की, "Article 371 begins with a non abstante clause. The words, "nothwithstanding anything contained in the Constitution" are significant. It marks a departure from the scheme of the Constitution which makes all financial matters of the province of the Legislature." अध्यक्ष महाराज, या संबंधात आताच सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय राज्यपालांनी आपल्याल रिजनवाईज तरतूद करण्यास सांगितले आहे आणि एवढ्या पुरतीच अनुमती दिली आहे की, ज्या त्या रिजनचा पैसा तेथेच म्हणजे त्याच रिजनमध्ये तुम्ही वापरू शकता. एका रिजनचा फंड दुसऱ्या रिजनला देता येणार नाही, त्याच रिजनमध्ये मात्र इतरत्र वापरता येईल. अध्यक्ष महाराज, हे माननीय राज्यपालांचे मत माहिती असताना राज्याच्या मुख्य सचिवांनी जे पत्र लिहिले... मला त्यांच्या त्या पत्राचे कौतुक वाटते. ते पत्र लिहून त्यांनी आणखी आमच्या जखमेवर मीठ चोळले आहे. एक तर चार वर्षात आणखी पैसा तुम्ही दिलेला नाहीत. त्याबाबत राज्यपालांनी दिलेले आदेश देखील तुम्ही पाळले नाहीत म्हणून या वेळेस दिले नाहीत, असेच प्रत्येक वेळेस सांगत राहिलात. नंतर ते देत असताना उर्वरित महाराष्ट्राचा हिस्सा साडेचार कोटीचा असताना त्यांना दंड करता ... कारण त्यांनी दोन रिजनवर

...Y2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अन्याय केला म्हणून. तुम्ही दोन तीन वर्ष मागास भागाला पैसे न देण्याचे काम केले आहे तरीही मी आणखी 300 कोटी तेथे वळवितो ... म्हणून श्री.शंकरन यांनी जे पत्र लिहिले आहे त्यामध्ये एका परिच्छेदामध्ये त्यांनी म्हटले आहे की, हे पैसे दिले नाहीत आणि ते पैसे दिले नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे पगार वगैरे वगैरे होते म्हणून तो खर्च तेथे झालेला आहे. असे त्यांनी पहिल्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे आणि दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "During the past ;three y;ears the actual funds released in the irrgiation sector amongst the three Irrigation Development Corporations has resutled in aberrations due to above committed expenditure..." अध्यक्ष महाराज, 'aberrations' या शब्दाचे दोन अर्थ होतात. एक म्हणजे विसंगती आणि दुसरा अर्थ आहे विकृती. तेव्हा एका विकृतीतून ही विसंगती निर्माण करून मागास भागावर अन्याय करावा.... अहो, सगळ्या भागामध्येच कर्मचाऱ्यांचे पगार हे होतेच. "Similarly, due to raising of money by various Corporations in the year 2002-2003 as well as due to agitation leading to law and order situation in western Maharashtra and due to unprecedented drought situation in the rest of Maharashtra which led to taking up certain component of irrigation works to benefit drought affected areas from rest of Maharashtra and Marathwada."

(यानंतर श्री. जागडे ....झेड 1 ..

अशुद्धीरित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. दिवाकर रावते.....

ज्या भागात दुष्काळ होता, त्या भागातील लोकांना मदत करावयाची होती. म्हणून एका भागातील पैसा दुस-या भागासाठी वापरला होता. दुष्काळी भागातील आमच्या गरीब शेतक-यांना मदत मिळावी, म्हणून आम्ही काही बोललो नाही. परंतु आता आपण यावेळी मुद्दामहून घडवून आणले आहे. त्यामुळे आमच्या मराठवाड्यावर आणि विदर्भावर अन्याय केला आहे. आता माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशानुसार उर्वरित महाराष्ट्रासाठी 115 कोटी रुपयाची तरतूद करण्यात येणार आहे. खानदेश तसेच कोकणातील जनतेला, तेथील लोक प्रतिनिधींना असे वाटले की, या 110 कोटी रुपयांपैकी आपल्या वाट्याला काय येईल. मी माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे यांच्याकडे चहापानाला गेलो होतो. त्यावेळी राष्ट्रवादीचे कोकणातील एक मंत्री आणि राष्ट्रवादीचे नाशिकमधील एक मंत्री तेथेच उपस्थित होते. त्यांची अत्यंत दबक्या आवाजात चर्चा सुरु होती. त्यांना असे वाटत असेल की, 110 कोटी रुपयांपैकी आपल्या वाट्याला किती रक्कम येणार आहे ? परंतु आपल्याकरिता आपले हुशार अर्थमंत्री काहीतरी आणतील याची त्यांना माहिती नसावी. गेली चार वर्षे आमच्या अर्थमंत्र्यांनी क्लूप्ती केली आहे. मुख्य सचिव श्री. शंकरन यांचाच वापर त्यासाठी केला आहे. कारण श्री. शंकरन यांनी मा. राज्यपालांना असे पत्र का लिहावे ? त्यांनी आपल्या पत्रात असे लिहिले आहे की," The concept of creation of regional boards is to have equitable development of a region in the State and wtih the meagre allocation of Rs.115 crores this would not be achieved." वा रे वा. वैधानिक विकास महामंडळामुळेच तर आपल्याला बॅकलॉग समजला. त्यामुळेच तर सर्व माहिती मिळाली. आता या 115 कोटी रुपयात उर्वरित महाराष्ट्राचा विकास कसा होणार ? म्हणून त्यांनी ही विनंती केली आहे. त्यांनी पुढील परिच्छेदात असे म्हटले आहे की, "In the irrigation sector funds are received under External Aid and Central Loan Assistance forthe specific projects which covers all the regions. हे वाक्य महत्वाचे आहे. "Similarly, under NABARD loan assistance is given to the projects from all the regions and hence suitable provisions for these projects is required to be reflected in the Annual Plan." आता मागील तीन वर्षात त्यांना ही वाक्ये वापरता आली नसती काय ? आता मी सर्व डिटेल्समध्ये जात नाही. मा. राज्यपालांना श्री. शंकरन यांनी विनंती विशेष पत्रान्वये हे

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

कळविले आहे. त्यांनी दुस-या परिच्छेदामध्ये असे म्हंटले आहे की, "Looking to the provisions cited above viz. at Sr.No.(vii) & (ix) and contained in the Gazette dated 5th June 1998 it appears obligatory to earmark funds for AIBP and NABARD."

(यानंतर श्री. सरफरे...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

म्हणजे वर म्हटल्याप्रमाणे संपूर्ण स्टेट म्हणून जी प्रोव्हिजन आहे तिचे पुढे विश्लेषण केले आहे. "Similarly, for Krishna basin there is an Inter State Award and Inter State Agreement for Dudhganga Project benefiting Maharashtra and Karnataka and in Konkan Region for Tillari Project benefiting Maharathra and Goa. Considering the importance of these Inter State Agreements and Maharashta's commitment in implementation award of Krishna Water Tribunal and the works which are already undertaken in the Krishna, Tapi basins & Konkan Regional it is necessary to continue these projects and minimum Rs.500 crores funds are required to be provided for continuing works in rest of Maharashtra i.e. Tapi, Konkan & Krihna basins."

हा लेंडी प्रकल्प कर्नाटक व मराठवाडयाच्या संदर्भात नाही कां? त्या संदर्भात निधी दिला पाहिजे असे वाटत नाही कां? गेल्या 20 वर्षात एकही पैसा न आल्यामुळे त्या प्रकल्पाची प्रोजेक्ट कॉस्ट 250 कोटींनी वाढली आहे, हे पाप कुणावर आहे. फक्त कृष्णा व्हॅली इंटरस्टेट ॲग्रिमेंटची आठवण होते. मग विदर्भ आणि मराठवाडयाच्या इंटरस्टेट ॲग्रिमेंटच्या संदर्भात एक शब्दही लिहिला गेला नाही. आणि म्हणून हे सर्व मांडीत असतांना दु:ख होते की, ज्यांचे आई-बाप हुशार असतात त्यांनी यामधून स्वत: सटकण्यासाठी शेवटचे वाक्य टाकले आहे. हे जे पाप लिहिले आहे ते मंत्रिमहोदयांच्या सल्ल्याने, त्यांच्या सांगण्याने लिहिले नाही. महाराष्ट्रामध्ये घटनेच्या 371(2) कलमाप्रमाणे राज्यपालांनी निदेश दिले असतांना व ते मेंडेटरी असतांना, आणि तसे ॲडव्होकेट जनरलने ओपिनियन दिले असतांना मुख्य सचिवांनी असे सांगावयास हवे होते की, हे आदेश मेंडेटरी असल्यामुळे ते पाळण्याची माझी जबाबदारी आहे. परंतु अशा प्रकारे या निधीची हेराफेरी करण्यासाठी त्यांनी एक पत्र लिहिणे योग्य नाही. त्यांनी शेवटच्या ओळीमध्ये एक वाक्य लिहून मात्र स्वत:ची सुटका करुन घेतली. "In the light of foregoing paras it is requested that the Hon'ble Governor may kindly review the directives and issue fresh directives at the earliest."

..AA2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

अशाप्रकारे याठिकाणी तीन वाक्याचे पत्र देऊन ते या सभागृहामध्ये एक नवी छाप पाडायला लागले आहेत. सभापती महोदय, बॅकवर्ड एरियाच्या संदर्भात शासनाने चार वाजेपर्यंत माहिती दिली पाहिजे असे आपण निदेश दिले. परंतु दु:ख एकच होते की, अशा प्रकारचे प्रकार वारंवार केले जात आहेत. म्हणून प्रा. बी. टी. देशमुख म्हणाल्याप्रमाणे भीती एकच वाटते की, या वैधानिक विकास मंडळांची मुदत 30 एप्रिल रोजी संपल्यानंतर ती पुढे वाढविली जाईल की नाही? नाही तर कायमचा "जय महाराष्ट्र" म्हणण्याची पाळी येईल. आणि म्हणून ॲडव्होकेट जनरलना या रेफरन्सच्या संदर्भात सल्ला द्यावयाला येथे बोलवावे. आपण ज्याप्रमाणे मागास भागासाठी आपला बाणा दाखविला तो बाणा या ठिकाणीसुध्दा दाखवावा अशी विनंती करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे ॲडव्होकेट आहेत.त्यांना कायद्याचे सखोल ज्ञान आहे. ते याबाबतीत बोलू इच्छित आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (बसून बोलतात) : नाही, मला बोलायचे नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील (अर्थ मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी राज्यातील मागास भागातील पाटबंधारे विषयाबद्दलच्या बॅकलॉगबाबत गेली अनेक वर्षे निर्णयाचा, डायरेक्टीव्हज्चा आणि मिळणा-या ॲलोकेशनचा प्रवास कसा आहे आणि कसा झाला आहे याबद्दल समस्त माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुखसाहेबांनी दिली आहे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी दिलेली आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाला माननीय राज्यपालसाहेबांनी डायरेक्टीव्हज् दिल्या आणि एकूणच नेहमीप्रमाणे आपण चार-साडेचार हजार कोटी रुपये ऑफ बजेट बॉरोईंग करु, याने अभिप्रेत असणारे डायरेक्टीव्हज् राज्य शासनाला देण्यात आले. आपली जी योजना आहे, त्या योजनेत बजेटेबल आणि ऑफ बजेट, नॉन बजेटेबल अशी दोन क्षेत्र ही योजनेची असावयाची आणि योजना 12,13,14 हजार कोटी रुपयांची असावयाची. योजनेमध्ये जो बजेटेबल प्लॅन असावयाचा, त्या बजेटेबल प्लॅनमध्ये आपण ऑफ बजेट बॉरोईंग किती करणार हे दाखवून ऑफ बजेट बॉरोईंग हे विशेषत: पाटबंधारे या विषयासाठी आपण देत असू. आपण सुरुवातीला बाजारामध्ये कर्ज रोखे उभे करीत होतो, त्याला चांगला प्रतिसाद होता. कालांतराने हा प्रतिसाद कमी होऊ लागला आणि सभागृहानेही बाजारात कर्जरोख्यांना मिळणारा प्रतिसाद कमी होत आहेत, याबद्दल वेळोवेळी चिंता व्यक्त केली होती. दिलेले पैसे कागदावर रहावयाचे आणि आपण चार-चार, पाच-पाच हजार कोटी रुपये बाजारातून आणू असे सांगत होतो, पण बाजारात कर्जरोख्याला कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे 3 हजार कोटी, 4 हजार कोटी, 2500 कोटी असे वेगवेगळे आकडे घेऊन वेळोवेळी बाजारामध्ये गेलो. त्याची पूर्णत: पूर्तता आपल्याला गेल्या तीन वर्षामध्ये 100 टक्के फारशी करता आलेली नाही आणि त्याचा परिणाम हा सभागृहात या विशेष विषयाबद्दल टोकाची भावना व्यक्त करण्यात होत होता याची आम्हा सर्वांना जाणीव आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी राज्य शासनाला वेळोवेळी जे आदेश दिले, त्या आदेशाप्रमाणे पावले उचलत असताना आपला सगळा भर हा ऑफ बजेट बॉरोईंगवर होता. त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माननीय राज्यपालांच्या 4300 कोटीचे विश्लेषण करुन, कोणत्या विभागाला किती पैसे दिले पाहिजेत याचा डायरेक्शनमध्ये जो उल्लेख आहे, तो त्या बेसिसवर होता. आम्ही योजना आयोगाकडे गेलो, तेथे बरीच सर्वंकष चर्चा झाली.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी एकच विनंती करतो. 4685 कोटीच्या बाबतीत बाहेरचे आणून करा किंवा काही करा वगैरे असे कुठे लिहीलेले आहे का ? माझ्या माहिती प्रमाणे तसे लिहीलेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : मी असे कुठे म्हणत आहे.

श्री.नितीन गडकरी : तुम्ही म्हणालात.

श्री.जयंत पाटील : आपला सोर्स काय आहे ते मी सांगत आहे. मघापासून मी असे वाक्यच उच्चारलेले नाही. मी परिस्थिती सांगत आहे. आधी आपण बोलत असताना मी मुद्दामूनच डिस्टर्ब केले नाही, कारण हा महत्वाचा मुद्दा आहे आणि एखादा मुद्दा डेव्हल्प करताना शृंखला तुटली तर मग . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल यांचे मत घ्यावयाचे की घ्यावयाचे नाही एवढा विषय आहे. त्यावर आपण जर बोललात तर मग त्याच्यावर बोलावे लागेल ना. सभापती महोदय, आपण मला संधी दिली म्हणून सांगतो की, ते चार-पाच वर्षाच्या व्हॉएलेशनचे समर्थन करीत आहेत. ते पावले, झाले ना. 30 एप्रिल 2005 पर्यंतची जी फेज आहे, ती संपत आली आहे. ते काय तुम्ही आता 15 दिवसात काय भरुन देणार ? कोण भरुन देतो, कोणी भरुन देत नाही. मुदा अत्यंत मर्यादित आहे. हे जे पुण्य आपल्या हातातून घडलेले आहे, एक म्हणजे काल याठिकाणी कागदे देण्यात आली आणि आपण आदेश दिल्यानंतर. असेच तीन वर्षे झाले. ॲडव्होकेट जनरल यांनी असे सांगितले की, it is lawfully amended. मग आमचे संपले ना. आम्ही काहीच बोलत नाही. काय बोलावयाचे आहे ? हे दोन मुद्दे आहेत आणि त्यावर प्रकाश टाकण्याऐवजी गेल्या 3-4 वर्षाचे व्हॉएलेशन, आता आमच्यासमोर तुम्ही डायरेक्शन सांगत नाहीत आणि तुम्ही प्लॅनिंग कमिशनला डायरेक्शन सांगितल्या असतील का ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे चालू...

प्लॅनिंग कमिशनला तुम्ही डायरेक्शन सांगितल्याशिवाय त्यांच्या स्वप्नात येणार आहे काय ? अे.व्ही.बी.पी.चे प्रपोजल पाठवितांना आमच्यावर हे मॅन्डेटरी आहे, असे तुम्ही त्यामध्ये लिहिलेले आहे काय ? अे.व्ही.बी.पी. च्या काळामध्ये अप्पर वर्धाचे पैसे उधारीने, उसणवारीने दुसरीकडे नेले. माझे असे म्हणणे आहे की, हा विषय काढला तर उगाच वाद होईल. आपण जे केले ते आम्हाला पावले, त्याबाबत आम्ही काहीच बोललो नाही. आम्ही फक्त दोन मुद्दे मांडलेले आहेत, त्याबाबतीत सांगितले तर बरे होईल. पण मंत्री महोदय जर साऱ्या कृत्याचे समर्थन करत असतील तर स्वतंत्रपणे त्या विषयावर त्यांनी डिव्हाईस वापरावा, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. सभापती महोदय, आम्ही आपल्याकडून आज मर्यादित संरक्षण मागतो आहोत, की महाराष्ट्राच्या इतिहासाच्या या टप्प्यावर आज निदान उरलेल्या 15-20 दिवसात, पुढच्या महिन्याच्या दोन तारखेला कदाचित बोलताही येणार नाही. मराठवाडयातील गृहमंत्री असतांना कदाचित मला एका बाजूला खात्री वाटते, एका बाजूला खात्रीसुध्दा वाटत नाही. पण हा तर पुढचा भाग आहे. पुढच्या महिन्यात तर आम्हाला यावर बोलता येणार नाही. Whether the direction are appropriatly Amended by this letter?हा एक मुद्दा. दुसरे असे की, गेली सतत तीन-चार वर्षे हे बजेटरी मॅन्डेड डॉक्युमेंट अत्यंत विचित्र पध्दतीने सभागृहासमोर ठेवण्यात आले. Whether that the proper practice. दोन मुद्यांच्याबाबतीत त्यांनी आपले मत सांगावे, असे आमचे म्हणणे आहे. ते न सांगता ते कसे झाले, हे सगळे मंत्री महोदय सांगत आहेत, हे काही बरोबर नाही. म्हणून सभापती महोदय, मला आपण संरक्षण द्या.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी. देशमुख यांनी 1983 सालापासून बॅकलॉकबद्दल बरीच माहिती दिली. मी इतके मागे गेलो नव्हतो. मी गेल्या तीन वर्षात काय काय झाले, हे मी सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. मला माझा मुद्दा मांडण्यास आपण संधी देणार नसाल तर मी माझे दोन किंवा तीन वाक्यात उत्तर संपवितो. आपली जशी मर्जी असेल तसे मला सांगा. आपण म्हणाल तसे मी उत्तर देतो. आपल्याला माझ्याकडून 'होय' किंवा 'नाही' असे उत्तर पाहिजे असेल तर मी तसे उत्तर द्यायला तयार आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेब जेवढे मंत्री महोदयांना आवश्यक वाटेल तेवढे त्यांना बोलू द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.जयंत पाटील : माझी हात जोडून विनंती आहे की, मला माझा मुद्दा डेव्हलप करुन उत्तर देण्याची संमती दिली तर मी तसे उत्तर देतो. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेबांना जशी उत्तरे पाहिजे असतील, तशी देतो, तसे त्यांनी सांगावे. मी थोडक्यात एका ओळीमध्येदेखील उत्तर द्यायला तयार आहे. तसे सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री.नितीन गडकरी : सन्मानीय सदस्यांचा भावार्थ लक्षात घ्यावा.

श्री.जयंत पाटील : त्यांच्या भावार्थावर मी येतो. परंतु आपण मंत्र्याना बोलू द्यायचे नाही, ही पध्दत चुकीची होत आहे, असे मला वाटते.

श्री.नितीन गडकरी : मंत्री महोदय, आपले म्हणणे एक तास नाही तर दोन तास ऐंकायला आम्ही तयार आहोत, आपण पूर्णवेळ बोला. आमचा आक्षेप कोठे आहे, तेवढे आपण समजून घ्या. नाही तर आम्ही मूलभूत उपस्थित केलेले मुद्दे बाजूला रहातील, बाकीचे प्रवचन होईल तसे व्हायला नको.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब या विषयावर सभागृहामध्ये किमान सव्वा तास विचार मांडले गेले. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेबांनी मांडले, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी मांडले. त्याच पध्दतीने वित्तमंत्र्यांनी देखील त्यांचे या बाबतीतील जे विचार असतील ते मांडावेत आणि त्यानंतर निर्णयाच्या अनुषंगाने जी काही प्रक्रिया असेल, त्यावेळेला आपल्याकडून त्याबाबतीत सल्ला घेण्याच्यादृष्टीने विचारल जाईल. तोपर्यन्त आपण असे कसे म्हणायचे, की त्यांनी एवढेच करावे ? मला वाटते, वित्तमंत्र्यांनी आपले बोलणे पुढे सुरु ठेवावे] त्यामध्ये कोणी अडथळा आणणार नाही.

श्री.नितीन गडकरी : आपण बोला. आपला तो अधिकार आहे.

श्री.जयंत पाटील : मा.सभापती महोदयांनी मोठ्या मनाने उदार अंत:करणाने बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे. पण ज्यांनी प्रश्न उपस्थित केले, त्यांचा मूड जर थोडक्यात उत्तर घ्यायचा असेल तर तसे मी उत्तर देऊ शकतो. सभापती महोदय, माझा बोलण्याचा व्यवस्थित मूड होता, व्यवस्थितच सन्माननीय सदस्यांच्या मुद्यावर येणार होतो. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला कोणताही मुद्दा माझ्या भाषणात मला सोडायचा नाही. फक्त सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित करतांना जशी पार्श्वभूमी सांगितली, त्याप्रमाणे प्लॅनिंग कमिशनबरोबर चर्चा झाल्या. या संबंधातील भावना सभागृहामध्ये वेळोवेळी व्यक्त केलेली आहे की, पाटबंधारे या विषयातील अनुशेष वाढू नये, वर्कआऊट करुन काढलेल्या अनुशेषाप्रमाणे रक्कमा प्राप्त झाल्या पाहिजेत. (यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

सभापती महोदय, या आशयामुळेच राज्य सरकारच्यावतीने आम्ही प्लॅनिंग कमिशनच्या समारे गेल्या नंतर या महाराष्ट्रातील एकंदर 11 हजार कोटी रुपयाचा जो बॅकलॉग आहे, त्या रक्कमेला केंद्र सरकारने इन्टर्व्हेन्शन करावे. कच्छ, विदर्भ,तेलंगाणा हे जे प्रदेश आहेत त्याबाबत घटनेत तरतूद करुन या प्रदेशातील मागासलेपणा विषयी न्याय दिला पाहिजे आहे. अशा स्वरुपाचे संपूर्ण देशात तीनच भाग आहेत. म्हणून या तीन भागांना आपणही इन्टर्व्हेन्शन करुन आम्हाला विशेष ग्रॅन्ट द्यावी. कारण हा बॅकलॉगचा विषय 1983 सालापासून आता 2000 सालापर्यंत देखील चालू आहे. दांडेकर समितीच्या निष्कर्षानुसार जेवढे पेसे खर्च करावयाचे होते तेवढे पैसे खर्च करुन देखील आणखी बॅगलॉगचे अंतर राहिलेले आहे, हे इंडिकेटर बॅकलॉग समितीने आपल्याला दाखविलेले आहे. त्यामुळे राज्य सरकारचे आजच नाही तर गेली वीस, पंचवीस वर्षे जे प्रयत्न चालू आहेत. हे सर्व प्रयत्न करुन देखील बॅकलॉग पूर्ण करण्याचे अंतर वाढत आहे, हे आम्ही देखील त्यांच्या निदर्शनस आणून दिले. सन्माननीय राज्यपाल महोदयांनी राष्ट्रपतींना या विषयी जे पत्र लिहिले आहे, त्यातही सभापती महोदय, मला असे वाटते की, तोच आशय आहे. राज्य सरकार त्यांच्या वित्तीय परिस्थितीत जो प्रयत्न करीत आहे. त्या राज्य सरकारच्या प्रयत्नात ठराविक काळात हा बॅकलॉग दूर करण्याच्या प्रयत्नाला यश यावे ऑगमेंन्टेशन म्हणून ॲडिशनल अमाऊंन्ट यावी म्हणून केंद्र सरकारने या विशिष्ट प्रश्नाकडे त्यादृष्टीने पाहावे, अशी भूमिका केंद्र सरकारकडे वेळोवेळी वेगवेगळया स्तरावर मांडायला आमच्या सरकारने काही कालावधीत सुरुवात केली. प्लॅनिंग कमिशन समोर 9 सेक्टरच्या बॅकलॉग मधील 8 सेक्टरचा बॅकलॉग रिमुव्ह करण्यासाठी 1400 कोटी रुपयाची विशेष तरतूद करण्या विषयी चर्चा झाली. त्यावेळीही आम्ही त्यांना सांगितले की, 8 सेक्टरचा बॅकलॉग हा जर हाच आकडा कायम राहिला तर तो आम्ही कदाचित तीन वर्षात, चार वर्षात पूर्ण करु शकू. पण इरिगेशन हा सेक्टर एवढा मोठा आहे की, याचा बॅकलॉग काढावयाचा असेल,तर हातात घेतलेंल्या प्रकल्पांचे प्रमाण पाहिले तर आपल्याला अधिक रक्कम तुम्ही इन्टरव्हिन करुन द्यावी. त्यामुळे सभापती महोदय, या कल्पनेची प्लॅनिंग कमिशनमध्ये देखील फार चर्चा झाली. या वर्षी एकंदर पाटबंधारे या विभागाला जे पैसे दिलेले आहेत, ज्याचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केला. त्यात आपण स्प्लीट बघितले तर पाटबंधारे या विषयात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

रिपेमेंन्टसाठी आणि इंट्रेस्टवर जवळ जवळ 3100 कोटीच्या वर रक्कम खर्च करीत आहोत. टोटल इरिगेशनचे बजेट 5 हजार 89 कोटीला टच होत आहे. सभापती महोदय, सभागृहाच्या हे लक्षात येत असेल की, आपल्या प्रिन्सिपलचे रीपेमेंट आणि इंट्रेस्ट हा आकडा फुगत चाललेला आहे आणि आपल्या प्रोव्हिजन्स कमी व्हायला लागल्या आहेत. त्यामुळे बाजारातून जाऊन कर्जरोखे घेण्यासाठी आपला जो सातत्याने प्रयत्न होता त्याला मिळणारा अल्पसा प्रतिसाद हे सगळे गणित लक्षात घेऊन यावर्षीची योजना ही 11 हजार कोटीवर सीमित करणे हे आवश्यक होते. त्याप्रमाणे करतांना राज्य सरकारने या अर्थसंकल्पामध्ये 1,941 कोटी रुपयांची प्रोव्हिजन केलेली आहे. यामध्ये शिल्लक राहिलेली ए.आय.बी.पी. आणि अन्य नाबार्ड आणि प्रॉजेक्ट बेस तरतूद आहे. ती तरतूद वगळल्यानंतर उरलेल्या तरतुदीचे वाटप राज्यपालांनी दिलेल्या सूत्रानुसारच करण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

माननीय राज्यपालांना राज्य सरकारच्या संमतीने डॉ. शंकरन यांच्या माध्यमातून जो पत्रव्यवहार झालेला आहे त्या पत्रव्यवहारामध्ये वेगवेगळया बाबी त्यांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न झाला. आपले प्लॅन साईज लिमिटेड आहे हे त्यांना सांगण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे पाटबंधारे या विषयावर आपण आता किती ॲलोकेशन देऊ शकतो हे सांगितल्यावर हे जे डिस्ट्रीब्युशन केलेले आहे याला त्यांची मान्यता मिळविण्यासाठी त्याचा उल्लेखही त्या पत्रामध्ये आहे. सभापती महोदय, घटनेनुसार डायरेक्टीव्हज देण्यासंबंधीचा मूळ मुद्दा आहे. डायरेक्टीव्हज देत असताना त्यांनी सूत्र बदललेले नाही. त्यामुळे आम्ही पाठविलेल्या धोरणाला किंवा आम्ही शासनाकडून पाठविलेल्या पत्राला त्यांनी चार ओळींचे कंसेंट दिलेले आहे. हे कंसेंट देताना त्यांनी सांगितलेले आहे की, अशा प्रकारे हे डिस्ट्रीब्युशन करायला तुम्हाला आमची मान्यता आहे. काल जे आर्थिक वर्ष संपले त्यावेळीही डायरेक्टीव्हज होते. आपण कर्जरोखे काढण्यासाठी बाजारात गेलो होतो. या कर्जरोख्यांना प्रतिसाद मिळत नाही म्हटल्यावर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उभे राहून सांगितले की, तुम्ही आम्हाला देणार नाही हे माहीत आहे पण तुम्ही आम्हाला असे असे एक हजार कोटी रुपये द्या. त्यावेळी माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार यांनी सांगितले की, आम्ही ते पैसे उभे करुन आपण सांगता त्याप्रमाणे देऊ. त्याचे डिस्ट्रीब्युशन 500 कोटी, 200 कोटी, जे आपण सभागृहात सांगितले त्याप्रमाणे डिस्ट्रीब्युशन करण्याविषयी आपण इथे सभागृहात सांगितले त्यावेळी डायरेक्टीव्हजची चर्चा आपण केली नाही. कारण आपण डायरेक्टीव्हज प्रमाणे बाजारात काढलेल्या कर्जरोख्याला अल्प प्रतिसाद होता. त्यामुळे आपण सुमोटो जे आकडे सांगितले ते याबाजूने मान्य केले आणि त्या आकडयाप्रमाणे बाजारातून काल रात्री आपण पैसे उभे केले आणि त्या एक हजार कोटी रुपयांचे डिस्ट्रीब्युशन देखील तुम्ही सांगितलेल्या आकडयांप्रमाणे केले. त्यावेळी डायरेक्टीव्हचा संदर्भ आपण घेतला नाही. आपण चर्चा करुन ते ठरविले. तुम्ही म्हणजे आपली चर्चा झाली. माननीय राज्यपालांचे पत्र आले...

श्री. नितीन गडकरी : तुमच्या पापामध्ये मला कशाला सहभागी करता ? तुम्ही माझे नाव कशाला घेता ? तुम्ही काहीही करा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. जयंत पाटील : हे सर्व मेरीटवर चालले आहे. पापात कोण सहभागी आहे त्याचा उच्चार मी अजून केलेला नाही. आपण केलेले भाषण रेकॉर्डवर आहे. आपण म्हणाला होता की, श्री. जयंत पाटील, आपण आम्हाला पैसे देणार की नाही ते सांगा. हे तुमचे पैसे येणार नाहीत. हे सगळे ....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी असे कधीही बोललेलो नाही. मी असे भाषण कधीही केलेले नाही. त्यांनी रेकॉर्ड काढावा. मी जे म्हटलेले आहे ते काढून त्यांनी या ठिकाणी मांडावे. त्याचा संदर्भ देऊन सांगावे. मी क्षमा मागायला तयार आहे. तुम्ही काहीही पाप करा, तुम्ही पैसे देऊ नका, तुम्ही चार वर्षे व्हायोलेट करा, कायदा मानू नका, घटना मानू नका. तुमच्या पापामध्ये मला कशाला सहभागी करता ?

श्री. जयंत पाटील : I am not criticising on this point. We are partners in that.

श्री. नितीन गडकरी : Not at all. I do not want to share partnership with you. तुमच्या पापाचे तुम्हीच शिल्पकार आहात. मायबाप सरकार तुम्ही आहात. मी विरोधी पक्षातील सर्वसामान्य सदस्य आहे. माझ्या हातामध्ये काय आहे ? श्री. शंकरन हे माझ्या सल्ल्याने पत्र लिहितात काय ? मुख्य सचिव माझे ऐकणार आहेत काय ? "By the order of the Government." हे तुम्हीच लिहिलेले आहे. Who is Government ? I am not the Government. I am Leader of Opposition only. I have no rights. I have little privileges. मी फक्त तुम्हाला विचारु शकतो. तो माझा अधिकार नाही. तुम्ही माझे नाव कशाला घेता ?

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय जे म्हणतात त्यामधील अर्धे वाक्य बरोबर आहे आणि अर्धे वाक्य बरोबर नाही. डायरेक्टीशन्स वगैरे सोडून द्या असे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटलेले नव्हते. उलट त्यांनी असे म्हटले होते की, 1800 कोटी रुपये देता येत नाहीत तर किमान एक हजार कोटी तरी द्या. आम्ही सर्वांनी सुध्दा त्यावेळी असे म्हटले होते ही फॅक्ट आहे. सभापती महोदय, त्यावेळी सुध्दा आपण सभागृह तहकुब केले होते.

सभापती : नागपूरच्या अधिवेशनामध्ये चर्चा झाली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण सभागृहामध्ये म्हटले की, हे व्हायोलेशन होणे बरोबर नाही. आपण चेंबरमध्ये बसलो होतो. त्या ठिकाणी माननीय वित्तमंत्री होते आणि तिथे असे ठरले. त्याप्रमाणे 1800 कोटी नाही तर निदान एक हजार कोटी रुपये तरी द्यावेत असे म्हटले. हे त्यावेळी म्हटले गेले होते ही गोष्ट खरी आहे. पण डायरेक्शन्स वगैरे बाबत असे झाले हे म्हणणे बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ज्यावेळी मी हे बोललो होतो त्यावेळी सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांनी माझ्या बोलण्याला सभागृहात विरोध केला होता. मी त्यावेळी असे बोललो होतो की, अध्यक्ष महाराज, तुम्हाला एकदम 4 हजार कोटी रुपये देणे शक्य नसेल तरी या वर्षी हे अधिवेशन संपण्याच्या आधी म्हणजे त्यावेळचे डिसेंबरचे विदर्भातील अधिवेशन संपण्याच्या आधी कमीत कमी एक हजार कोटी रुपये विदर्भाला द्या.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

500 कोटी रुपये मराठवाडयाला द्या आणि 500 कोटी रुपये उत्तर महाराष्ट्राला द्या असा मी एक हिशेब मांडला होता. डिसेंबरमध्ये दिले जातील अशी घोषणा करावी. काही तरी द्यावे. जसे महाभारतामध्ये कौरवाने म्हटले होते की सुईच्या अग्रावर मावेल एवढीही आम्ही तुम्हाला देणार नाही अशी भूमिका मा.श्री.जयंत पाटील आपण घेऊ नका. हा डिसेंबर महिना संपेपर्यंत तेवढे तरी पैसे द्या असे म्हटले होते. डायरेक्शन्स, बॅकलॉग, एवढा निधी, इरिगेशनचे 900 कोटीचे बजेट करा असे मी तुम्हाला म्हटले होते का ? महाराष्ट्रामध्ये माझी मान शरमेने खाली गेलेली आहे. त्या मा.श्री.पवारसाहेबांना काय वाटेल ? कृषी खात्याचा जप करीत ते फिरतात एका देशामध्ये. त्या महाराष्ट्राचे कृषी खाते या पाण्यावर अवलंबून आहे. त्या पाण्याचे बजेट किती 900 रुपयांचे ?

सभापती : आपला मूळ विषय काय आहे ?

श्री.नितीन गडकरी : मूळ विषय असा आहे की, मी असे म्हटलेले नाही. मेहेरबानी करुन मला यामध्ये फसवू नका.

श्री.जयंत पाटील : ठीक आहे, तांत्रिक मुद्यामध्ये जाण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. आपण सगळयांनी मिळून सभागृहात त्याची चर्चा केली जाते आणि त्यावेळी भावना काय व्यक्त केल्या होता ? आज डिसेंबर महिना आहे या तारखेला (अडथळा) आपण त्यावेळी भावना व्यक्त केली की, डिसेंबरअखेर 1 हजार कोटी देणार काय, महिन्याच्या आत देणार का ? मी सभागृहाच्या अतिशय नम्रतापूर्वक निदर्शनास आणून देवू इच्छितो की, कालच रात्री 1 हजार कोटी रुपयांचे डिस्ट्रिब्यूशन आहे त्याप्रमाणे 500 कोटी विदर्भाला आपण सांगितले त्याप्रमाणे 200 कोटी रुपये असे काही तरी डिस्ट्रिब्यूशन केलेले आहे. त्यावेळी बाजारातील परिस्थिती काय आहे याचा अभ्यास करुन आपण कोणत्याही मार्गाने पैसे उभे केले पाहिजे आणि त्याप्रमाणे वितरित करा असे म्हटले होते. मला वाटते की, कागदावर लिहून आपण त्यादिवशी चिठ्ठी दिली होती की असे डिस्ट्रिब्यूशन करायलाही हरकत नाही, परंतु लवकर हे पैसे आले पाहिजेत. विदर्भाच्या प्रकल्पांना चालना देणे हाच मुलभूत उद्देश आहे. त्यात काही कोणी कोणावर कोटी करणे हा आपल्या चर्चेचा भागच नाही. मागासलेल्या भागाच्या संदर्भातील सभागृहाच्या भावना सर्व बाजुने सारख्या आहेत.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.जयंत पाटील....

मार्केट कंडिशन्सचे रिस्पॉन्स कसे आहेत हे मी तुम्हाला सांगत आहे. पर्यायाने त्याच्या मर्यादा या सर्व बाबींवर आल्या. म्हणून राज्यसरकारने यावेळी अशी भूमिका घेतली आहे की, आपण आपल्या बजेटरी प्रोव्हिजन्स वाढवू आणि आता बाहेरुन कर्ज घेण्याचा कार्यक्रम कमी करुन बजेटरी प्रोव्हिजन्स करुन व्याजाचा आऊटफ्लो कमी करुन आपल्याला जी ॲडिशनॅलिटी तयार होईल ती ॲडिशनॅलिटी अशा स्वरुपाच्या बॅकलॉगच्या संदर्भात आलेल्या सूत्रानुसार खर्च करण्याचा प्रयत्न करु. म्हणून गेल्या अनेक वर्षानंतर या राज्याचा जो बजेटेबल प्लॅन आहे, त्या बजेटेबल प्लॅनमध्ये 1994-95 या साली त्यावेळचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री.शरद पवारसाहेबांनी भाषणात सांगितले होते की, यावर्षाचा पाटबंधारेचा प्लॅन मोठा आहे. मला नक्की आकडा माहीत नाही पण 650 ते 700 कोटीचा उल्लेख त्यांनी केला होता. पण यावर्षी बजेटमधून 100 टक्के शुअरिटीने पैसे देण्याची व्यवस्था म्हणून 1900 कोटीची तरतूद केलेली आहे. त्या 1900 कोटीमध्ये 1 हजार कोटी एआयबीपी या विषयाचे आहेत. जो विषय एआयबीपीचा आहे त्यात विदर्भात जवळपास 400 कोटी रुपये, उर्वरित महाराष्ट्रासाठी 425 कोटी, मराठवाडयासाठी 175 कोटी रुपये वितरित अशी तरतूद आहे. एआयबीपीने बेसिक मुद्यावर पैसे येत असतात. 75 टक्के + या स्तरापर्यंत जे प्रकल्प गेले आहेत त्याचे कंसिडरेशन होते आणि मराठवाडयातीलही जास्तीत जास्त प्रकल्पा पाठविले तर एआयबीपीची तरतूद वाढेल. यावर्षी मला वाटते की, 535 कोटी रुपये दिले. केंद्र सरकारने एआयबीपीचे काल रात्री 200-300 कोटी रुपये दिले. काल जे आर्थिक वर्ष संपले त्यावेळी अभूतपूर्व म्हणता येईल, पहिले 15 कोटी, 20 कोटी, 30 कोटी, 50 कोटी, 60 कोटी, 80 कोटी, 100 कोटी, 120 कोटी, 130 कोटीपर्यंत रेंगाळलो होतो.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रासाठी नाही

(श्री. जयंत पाटील पुढे सुरु...)

यावर्षी हा आकडा 550 कोटी पर्यन्त गेलेला आहे. अेआयबीपीमधून हे पैसे मिळविण्यामध्ये आपण यशस्वी झालो आहोत. पाटबंधारे विभागाने देखील यासाठी प्रयत्न केले. सन्माननीय केन्द्रीय कृषीमंत्री श्री.शरद पवार साहेबांचा याठिकाणी उल्लेख करण्यात आला. त्यांनी देखील दिल्लीमध्ये अेआयबीपीमधून जास्तीत जास्त प्रकल्प घेतले जावेत यासाठी प्रयत्न केले. मा.सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, यावर्षी 1 हजार कोटीची तरतूद केलेली आहे. नाबार्डची फार किरकोळ रक्कम आहे. उर्वरित जी रक्कम डिस्ट्रीब्यूट केलेली आहे त्याबाबत मी आपल्याला माहिती सांगतो. मराठवाड्याला 31.93 टक्के रक्कम दिलेली आहे. विदर्भाला 62.39 टक्के रक्कम दिलेली आहे. उर्वरित महाराष्ट्राला 5.68 टक्के रक्कम दिलेली आहे. मराठवाड्याला जसे 206 कोटी मिळणार आहेत तसे विदर्भाला 404 कोटी आणि उर्वरित महाराष्ट्राला 36.80 कोटी मिळणार आहेत. कोकणाला 31.45 कोटी, तापी खोरे महामंडळासाठी 3.24 कोटी कृष्णा खोरे महामंडळासाठी 2.10 कोटी एवढी रक्कम प्राप्त होणार आहे. मी ही आकडेवारी का सांगितली, कारण वेगवेगळया भागांसाठी ती रक्कम सफिशियंट नाही. आपण अर्थसंकल्पामध्ये हा मार्ग घेतलेला आहे की, बाहेरुन ऑफ-बजेट बॉरोईंग कसेही लेफ्ट-राईट सेंटर करायचे पैसे आणायचे आणि प्रोजेक्ट करायचे. प्रोजेक्ट पूर्ण करण्याची स्वत:ची क्षमता हरवायला लागलो आहोत. व्याजाचा बोजा वाढायला लागला आहे. मला वाटते आपण 18-19 हजार कोटीचे प्रकल्प सुरु केलेले आहेत. जवळ जवळ 30-33 हजार कोटीच्या दरम्यान प्रकल्प हातात घेतलेले असून कोणतेही प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाहीत अशा परिस्थितीमध्ये आपण सध्या डिस्ट्रीब्यूशनचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. मी मा.सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना सांगू इच्छितो की, उदाहरणार्थ अमरावती विभागामध्ये 400 पैकी 200 कोटी दिल्यानंतर अमरावती विभागामध्ये त्याचे जिल्हानिहाय वाटप होते आणि त्या रकमेमध्ये जिल्ह्यातील कोणताही प्रकल्प पूर्ण होत नाही. पण अमरावती विभागात त्या महामंडळाने निर्णय घेतला की, हे 200 कोटी रु. अमरावती विभागात जाणार आहेत, तर त्यातून आम्ही किमान एवढे प्रोजेक्ट पूर्ण करु. त्यादृष्टीने विचार करण्याची गरज आहे. म्हणून ज्या भागामध्ये पैसे गेलेले आहेत त्या भागामधील प्रकल्प आपण पूर्ण केले नाही तर मग आपल्याला इॅकानॉमिक व्हायबिलिटी घालविण्याचे श्रेय मिळेल...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : डायरेक्शनच्या विरुध्द बोलले जात आहे.

श्री. जयंत पाटील : मी सूचना देत आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : डायरेक्शनच्या विरुध्द बोलणार असतील तर पुन्हा तोच विषय निर्माण होतो. जिल्हावार ॲलोकेशन का दिलेले नाही त्याचे समर्थन चालू झालेले आहे.

सभापती : मा.सदस्यांनी मा. मंत्री महोदयांचे स्पष्टीकरण प्रथम ऐकून घ्यावे.

श्री. जयंत पाटील : माझी सार्वभौम सभागृहाला विनंती आहे की, आपल्या वेगवेगळया रिजन मधील प्रकल्प आपण 18-19 हजार कोटी रुपये खर्च करुन देखील अर्धवट अवस्थेत आहेत. आपण राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे पैसे डिस्ट्रीब्यूट केलेले आहेत. त्यांच्याशी पत्रव्यवहार केलेला आहे. प्लॅनसाईज लिमिटेड आहे म्हणून येणा-या मर्यादा त्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी डिस्ट्रीब्यूशनला कन्सेन्ट दिलेली आहे. प्लॅन साईजवर मर्यादा आल्यानंतर आपण बाह्यसहाय्यित प्रकल्प घेतलेले आहेत. विशिष्ट केन्द्रीय योजना आहेत, आदिवासी उपयोजना आहेत, विशेष घटक योजना आहेत,

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

रोजगार हमी योजनेसाठी पैसे आहेत, आमदार निधी आहे, अनुशेष योजनांसाठी 1400 कोटी रुपये आहेत.वैधानिक मंडळ विशेष निधी आहे.डोंगरी विकास आहे, जवळ जवळ यामध्ये 8 हजार 642 कोटी रुपये आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : आम्ही जी माहिती विचारली त्याबाबतची माहिती आपण द्या.

श्री. जयंत पाटील : या ठिकाणी प्लॅनचा उल्लेख केला गेला म्हणून मी माहिती सांगतो आहे.

श्री. नितीन गडकरी (बसून): मागच्या वर्षी 19 हजार कोटीचा प्लॅन होता परंतु आपण 11 हजार रुपयांचाच प्लॅन केला..

श्री. जयंत पाटील : आपल्याला 19 हजार कोटी रुपयाच्या प्लॅनला मंजुरी मिळाली नाही. तो प्लॅन आपण 10 हजार 407 कोटी पर्यन्त आणला. सभापती महोदय, सन्माननीय नेते बसून बोलत असतील मी माझे बोलणे थांबवितो. माझे भाषण संपल्यानंतर आपण पुन्हा बोला. त्यास माझी काहीच हरकत नाही. आपल्याला बोलण्यास संधी आहे. माझे भाषण संपल्यानंतर तुम्ही पुन्हा मुद्दे उपस्थित करा मी त्यास उत्तरे देईन.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, कोर्टात वकील आपली वकिली करीत असतात. त्या वकिलीची केस जर हरत असेल तर तो वकील चिडचीड करीत असतो. वकील कोर्टात तसे करतात ते ठीक आहे. परंतु तुम्ही या ठिकाणी तसे करु नका. तुम्ही अगदी मोकळेपणाने बोला. तुमचे सर्व म्हणणे आम्ही ऐकून घेतो.

श्री. जयंत पाटील : ही गोष्ट दोन्ही बाजूला लागू होते. तुम्ही देखील चिडू नका. मी मुळीच चिडलेलो नाही.

श्री. नितीन गडकरी : तुम्ही बालभारतीच्या पुस्तकावर जरी बोललात तरी आम्ही ऐकून घेऊ.

श्री. जयंत पाटील : तुम्ही माझे म्हणणे शांतपणे ऐकून घ्या. मी चिडलेलो नाही. माझे पूर्ण विचार आपण ऐकून घ्या असे मी आपणास वारंवार सांगत आहे.

सभापती : कृपया तुम्ही आपापसात बोलू नका. मंत्री महोदय, आपण आपले म्हणणे थोडक्यात सांगावे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, पाटबंधारे विभागास पैसे आले, त्याच्या बाबतीत जे प्रश्न तयार झालेले आहेत त्या अनुषंगाने मी उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे. या ठिकाणी प्लॅनवर बोलले गेले म्हणून मी प्लॅनची माहिती देण्याचा प्रयत्न करीत आहे. जे जे विषय या ठिकाणी उपस्थित केले गेले त्या त्या विषयाला धरुन माहिती दिली नाही तर मी अन्याय केला अशीही तक्रार होऊ शकते. मी मघाशी वेगवेगळया रिजनची माहिती सांगितली ती माननीय राज्यपालांच्या निदेशाला धरुन आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे निर्देश पायदळी तुडविण्याचे कोणतेही काम आमच्याकडून केले गेलेले नाही. नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात 1 हजार कोटी रुपयाची मागणी केली होती. त्यावेळी 500 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यासंबंधीचा आपण निर्णय घेतला. त्यावेळी कोणत्याही प्रकारचे डायरेक्टीव्हज् नसताना आपण मार्केट परिस्थिती लक्षात घेऊन किमान एवढे तरी पैसे उभे करा आणि ते पैसे उपलब्ध करुन द्या अशा आशयाची चर्चा झाली. त्याप्रमाणे शासनाने पैसे देण्याची व्यवस्था केलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात त्यावेळचे सन्माननीय पाटबंधारे मंत्री श्री. अजित पवार असताना त्यांना मी अशा प्रकारची विनंती केली होती ही गोष्ट खरी आहे. विदर्भाकरिता 1 हजार कोटी, मराठवाडा विभागाकरिता कमित कमी 500 कोटी,कोकणाकरिता 300 कोटी आणि उत्तर महाराष्ट्राकरिता 300 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावेत अशी मागणी केली होती. अशी मागणी केल्या बरोबर सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख उभे राहिले आणि बोलले की, तुम्ही का व्हेरिएशन करता ? मी म्हटले की, पूर्ण रक्कम देत नाही. तर एवढी तरी तरतूद उपलब्ध करुन द्या. तांनी आता या मार्च महिन्यात 200 की 300 कोटी रुपये दिले. काल रात्री 500 कोटी रुपये दिले अशी चर्चा आहे.पंरतु वस्तुस्थिती काय आहे याची मला काही माहिती नाही. दर वेळेस सन्माननीय वित्त मंत्री माझा उल्लेख असा करतात की, श्री.गडकरी साहेबांच्या म्हणण्यानुसार दिले. त्यांच्या परवानगी दिले. चर्चा करुन दिले, मी कागदावर लिहीले, त्यांचे म्हणणे पूर्णपणे वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे. मी असे बोललेलो नाही. माझ्या बोलण्याप्रमाणे ते वागलेले नाहीत. म्हणून रेकॉर्डवर माझ्याबद्दलची चुकीची माहिती राहू नये. त्यांना जे काही करावयाचे आहे ते त्यांनी करावे. कायदेशीर करावे, गैर कायदेशीर करावे, शपथेवर काहीही म्हणावे, तुम्हाला जे बदलावयाचे असेल ते तुम्ही बदला, तुम्हाला बदल करण्याचा अधिकार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. परंतु तुमच्या बदलण्याच्या रंगात माझा रंग तुम्ही सामील करुन घेऊ नये. मी याचा पार्ट नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही तेवढे पैसे उपलब्ध करुन दिलेले नाही. मी जे नागपूरला म्हटले त्या प्रमाणे तुम्ही तसे केलेले नाही. तुम्ही 200-300 कोटी रुपये दिले ते माझ्या म्हणण्याप्रमाणे दिलेले नाहीत. मी हात जोडून विनंती करतो की, तुम्ही आमच्यावर अन्याय करण्यास एकटे स्वयंपूर्ण आहात. सामर्थ्यवान आहात.तुम्ही करीत रहा. पंरतु तो अन्याय गडकरीच्या सहकार्याने केला, चर्चा करुन केला, असे आपल्या पापामध्ये माझे नाव टाकू नका अशी मी मित्र म्हणून विनंती करतो.

श्री. जयंत पाटील : आपण कितीही विनंती केली तरी आपण एकत्रित हा निर्णय घेतला आहे हे सूर्य प्रकाशा एवढे स्वच्छ आहे. परिस्थिती आणि वस्तुस्थिती बदलत नाही..

श्री.नितीन गडकरी : या गोष्टीचा पुरवा द्या...

श्री. जयंत पाटील : तुम्ही रेकॉर्ड वाचा. सन्माननीय प्रा.बी.टी.देशमुख यांनी देखील सांगितले होते की..

श्री. नितीन गडकरी : आपण आमच्यावर आरोप करीत आहात..

श्री. जयंत पाटील :मी आरोप करीत नाही. आपल्याला माहिती सांगतो की, मी लागलीच तेथून मुंबईला आलो. मी परिस्थितीचे वर्णन करीत आहे. हे तुम्ही केले आणि आम्ही केले असे नाही.

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील..

जशी मी शपथ घेतली असा आपण ज्याचा उल्लेख केला तशी विरोधी पक्षनेत्यांना कोणती शपथ आहे हे पाहिले तर तशी शपथ नाही. नॉर्मल सदस्य म्हणून शपथ आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मला आपल्याकडून संरक्षण पाहिजे. सभापती महोदय, याबाबतीत अर्थमंत्र्यांनी जी तरतूद केली त्यानुसार नागपूर अधिवेशनामध्ये मी प्रत्यक्षात किती मागितली होती ?विदर्भ,मराठवाडा,उत्तर महाराष्ट्र आणि कोकणाला किती होती ? मागितलेल्या पैशाची मुदत किती होती ? पैसे काल दिले असे म्हणतात. आपण रेकॉर्ड तपासून घ्या माझ्या मागणीप्रमाणे पैसे दिलेले नसतील तर अर्थमंत्र्यांनी माझ्या नावावर जे वाक्य खपविले आहे आणि जे रेकॉर्डवर लिहिले आहे ते दुरुस्त करुन घ्या . माझ्या नावावर चुकीचे रेकॉर्ड सभागृहात राहू नये अशी आपल्याला विनंती आहे.

सभापती : मी यासंदर्भातील रेकॉर्ड तपासून पाहीन आणि जे योग्य असेल ते रेकॉर्डवर राहील आणि अयोग्य असेल ते तेथे राहणार नाही.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, विदर्भ,मराठवाडा,खानदेश आणि कोकण या भागांना निधीचे वाटप करण्याच्या संदर्भात राज्यपालांबरोबर जो पत्रव्यवहार झाला तो सभागृहासमोर ठेवलेला आहे. बॅकलॉग कोणी वाढविला या वादात आता जाण्याचा हा विषय नाही. मला आपल्या हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, राज्यपालांच्या निदेशाचे उल्लंघन केलेले नाही. राज्यपालांबरोबर झालेल्या पत्र्यव्यवहारात वेगवेगळया गोष्टी त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या असल्या तरी त्यांनी सांगितलेल्याच धोरणाने आणि फॉर्म्युल्याने आपण निधीचे वाटप केलेले आहे डायरेक्टीव्हजच्या फॉरमॅटमध्ये जे पहिले उत्तर होते त्याला रिस्पॉंड करणारे दुसरे उत्तर पाठविल्यावर त्याला कंसेंट देणारे तिसरे पत्र त्यांनी आमच्याकडे पाठविले. सभापती महोदय, राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार राज्यपालांच्या माहितीशिवाय किंवा राज्यपालांना अंधारात ठेवून त्यांच्या निदेशांना अंधारात ठेवून राज्य सरकारने कोणतीही कृती केलेली नाही हे मी नम्रपणे सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. दुष्काळी भागाच्या बरोबरीने महाराष्ट्रात आणखी जो भाग आहे त्याच्या प्रायॉरिटीज जास्त आहेत. विदर्भ आणि मराठवाडा विभागाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी राज्य शासन बांधिल आहे आणि ती धोरणे राज्य सरकार राबवील हा विश्वास आपल्यामार्फत मी सभागृहाला देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ही चर्चा जवळजवळ अडीच तास चालू आहे. सर्व गंभीर चर्चा आहे. महत्वाचा प्रश्न आहे. औचित्याच्या माध्यमातून ही चर्चा सुरु करण्यात आली. आजच्या कामकाजपत्रिकेवरील इतरही जे कामकाज आहे ते महत्वाचे आहे. माझा आपणांला अशी विनंती आहे की, औचित्याच्या माध्यमातून या विषयावर किती वेळ चर्चा करावयाची यासंबंधी आपण निदेश द्यावेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यासभागृहामध्ये वेळोवेळी अशा महत्वाच्या प्रश्नावर चर्चा झालेली आहे. गेले 16-17 वर्षे या मी सभागृहाचा सदस्य आहे. ज्यावेळेला सभागृहामध्ये घटनात्मक आणि वैधानिक तसेच कायदेशीर मुद्दे निघाले ते याच सभागृहात निघाले. मला याचा अभिमान आहे. खालच्या सभागृहाच्या सर्व सदस्यांचा पूर्ण सन्मान ठेवून मी सांगतो की या राज्याच्या हिताचे आणि महत्वाचे मुद्दे जेव्हा जेव्हा कायदेशीर असतील तत्वामध्ये बसणारे असतील त्यावेळी सगळे कामकाज बाजूला ठेवून अशा विषयांवर 2/3 तास चर्चा केलेली आहे. या सभागृहाची ही परंपरा आहे.मला तुमचे म्हणणे मान्य आहे. या सभागृहामध्ये आज इतरही महत्वाचे कामकाज आहे ते पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु मी मा.सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, आजचे कामकाज उद्या घेता येईल पण याठिकाणी घटनेची पायमल्ली होत असेल तर ती मात्र पुन्हा दुरुस्त करता येणार नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

ही पवित्रता आहे. ही सॅन्कटीटी आहे. हे लोकशाहीचे पवित्र मंदीर आहे. सभापती महोदय, केशवानंद भारती केसमध्ये सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिला होता की ,'You can not change the features of the Constitution .Whether Parliament is supreme or Supreme Court is supreme. या विषयाच्या संदर्भात संपूर्ण देशामध्ये आणि पार्लमेन्टमध्ये चर्चा झाली होती. "केशवानंद भारती" केसमध्ये सुप्रीम कोर्टाने काय निर्णय दिला होता हे आपणा सर्वाना माहिती आहेच. कॉन्स्टिटयुशनच्या बेसिक फिचर्सचे जे व्हायोलोशन झालेले आहे त्याचा मुद्दा आज या सभागृहामध्ये उपस्थित केला आहे. तेव्हा हे व्हायोलेशन झालेले आहे किंवा नाही ?

या बाबतीत आम्ही आपल्यासमोर तीन मुद्दे मांडलेले आहेत. या तीनही मुद्यांची उत्तरे आम्हाला मिळालेली नाहीत.माननीय राज्यपालांच्या ज्या काही डायरेक्शन्स होत्या त्या डायरेक्शन्स दुरुस्त करण्याकरिता ,नवीन डायरेक्शन्स देण्याकरिता किंवा दुरुस्त डायरेक्शन्स देण्याकरिता श्री.शंकरन साहेबांचे पत्र माननीय राज्यपालांना पाठविण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्याकडून जे चार वाक्यांचे पत्र त्यांच्याकडून आले ते पत्र म्हणजे डायरेक्शन्स आहेत काय ? हा माझा पहिला मुद्दा आहे त्याचबरोबर डायरेक्शन्स कॉन्स्टिटयुशनने कशा काढतात, कशा लिहितात हे पहाण्यासाठी मी आपल्याकडे पाठविले होते.डायरेक्शनचे प्रारुप कसे असते, त्याचे स्वरुप कसे असते हे पहाण्याकरता मी दिले होते.ते प्रारुप असे असते ... मी गर्व्हनर ऑफ महाराष्ट्र.. या, या कलमाप्रमाणे.. या या प्रमाणे... अशा अशा प्रकारचे निर्देश देतो वगैरे वगैरे .. दुसरी गोष्ट अशी की,या डायरेक्शन्स मॅन्डेटरी होत्या काय ? या बाबतीत माननीय अर्थमंत्र्यांनी ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेतले होते आणि त्यांनी लिखित मत दिले होते की, या डायरेक्शन्स मॅन्डेटरी आहेत. सभापती महोदय, याबाबतीत प्रश्न फक्त एवढाच आहे की,या वर्षीच्या बजेटमध्ये या चार वाक्याच्या पत्राने जे बजेट दुरुस्त करुन प्लॅन साईज 11 हजार कोटी रुपयांचा होता आणि त्यामध्ये एक हजार रुपये ठेवले आणि तेवढें पैसे वाटले आणि निर्देशाचे पालन करण्यात आले असे मंत्रीमहोदय म्हणाले होते.....

श्री.छगन भुजबळ (बसून) : आता हा विषय संपला आहे.

श्री.नितीन गडकरी : हा विषय आता संपलेला नाही .तर आता सुरु झालेला आहे.सभापती

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

सभापती महोदय, मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे मला श्री. छगन भुजबळ यांच्याकडून संरक्षण नको त्याचबरोबर माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांच्याकडूनही संरक्षण नको. या सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून आम्ही आपल्या समोर हे तीनही लीगल पाईन्टस मांडलेले आहेत...आपण ॲडव्होकेट जनरल यांना बोलावून या ठिकाणी त्यांना याबाबत स्पष्ट करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती :सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगतो की ,सभाहातील सर्व सन्माननीय सदस्यांना संरक्षण देणे हे सभापतींचे काम आहे .राज्याच्या हिताच्या दृष्टीने महत्वाच्या प्रश्नाच्या संबंधी जरी हा विषय असला तरी औचित्याच्या मुद्याच्या नावाखाली आपल्याला तो विषय पाच मिनिटात संपविता आला असता. परंतु आपण त्या विषयावर 3 तास चर्चा केली आहे .विदर्भ व मराठवाडा भागात जो काही अनुशेष आहे तो अनुशेष आजचा नाही तर गेल्या अनेक वर्षापासूनचा आहे . तेव्हा त्या संदर्भात आपल्या मनात जे दु:ख आहे ते दु:ख व्यक्त करण्यासाठी आपण तीन तास चर्चा केली आहे.या संदर्भात मी शेवटी जो काही निर्णय देणार आहे त्या अगोदर माननीय अर्थमंत्र्यांना जे काही सांगावयाचे असेल ते त्यांनी सांगावे.

श्री.जयंत पाटील : माझे म्हणणे मांडावयाचे संपले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी :सभापती महोदय,सन्मानीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी यांनी या ठिकाणी घटनेतील अनुच्छेद 371 (2) च्या अनुषंगाने माननीय राज्यपालांनी वेळोवेळी जे निर्देश दिलेले आहेत त्यासंबंधीची चर्चा उपस्थित केलेली आहे.याच विषयावर या सभागृहात या पूर्वी चारवेळा झालेली होती. त्यावेळी माननीय राज्यपालांनी जे निर्देश दिलेले होते ते निर्देश डिस्क्रीशनरी आहेत की मॅन्डेटरी आहेत याबाबतीत गंभीर चर्चा झाली होती.त्या अनुषंगाने माननीय वित्त मंत्र्यांनी ॲडव्होकेट जनरल यांचे मत मागितलेले होते आणि ते मत सुध्दा या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते अनुच्छेद .371 (2) अन्वये माननीय राज्यपालांनी जे काही निर्देश दिलेले होते ते डिस्क्रशनरी नेचरचे नसतांना आणि ते निर्देश मॅन्डेटरी आहेत असे मत देण्यात आले होते. ते मत सभागृहा समोर ठेवण्यात आले होते. सभापती महोदय, Today, I deferr the opinion of the Leader of Opposition. या ठिकाणी बजेटरी प्रोव्हीजन करीत असतांना माननीय राज्यपालांनी असे निर्देश दिले होते की 4 हजार 685 कोटी रुपयांची प्रोव्हजन 2005 इ

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2006 साली करावयास पाहिजे होती व अशा प्रकारचे आदेश माननीय राज्यपालांनी दिनांक 28 फेब्रुवारी 2005 रोजी दिले होते. परवाच्या दिवशी या ठिकाणी अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देत असतांना माननीय वित्त राज्यमंत्र्यांना असे विचारले गेले होते की,बजेटमध्ये जो बदल करण्यात आलेला आहे त्याबाबतीत माननीय राज्यपलांनी तुम्हाला काही निर्देश दिलेले आहेत काय ?त्यावेळी माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी असे सांगितले की,"या बाबतीत माननीय राज्यपाल महोदयांचे निर्देश आमच्याकडे आलेले आहेत.व त्या निर्देशाप्रमाणे आम्ही बजेटमध्ये प्रोव्हीजन केलली आहे." ही दोन्ही पत्रे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून मी मागवून घेतली होती आणि ती मी वाचली आहेत.श्री.डी.के.शंकरन हे प्लॅनिंग विभागाचे सचिव असून त्यांनी दोन पत्रे माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेली आहेत. 4 हजार 685 कोटी रुपयांची प्रोव्हीजन 2005-2006 च्या बजेटमध्ये आपण करु शकत नाही.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. कुळकर्णी ...

आणि ही जी त्यांनी दुरूस्ती करण्याची विनंती केली त्याला राज्यपालांनी अनुमती दिल्यानंतर, .. त्याबाबतचे पत्र माननीय राज्यपालांच्या सही-शिक्क्याने असताना ते त्यांच्या सेक्रेटरीने दिलेले आहे काय वगैरे हा येथे चर्चेचा विषय होऊ शकत नाही. अध्यक्ष महाराज, कलम 371(2) च्या अधिकारा नुसार माननीय राज्यपालांनी पत्र पाठविल्यानंतर.. एक स्पेशल केस म्हणून राज्याच्या सचिवांना त्यांनी अनुमती दिली आहे म्हणजे these are mandatory directions by the Governor and they should be accepted on the floor of the House.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, साऱ्या चर्चेचा उद्देश हाच आहे की, राज्यातील मागास भागातील पाटबंधारे प्रकल्पांना पैसा मिळावा. डिसेंबरमध्ये जी चर्चा या सदनामध्ये झाली ती आता माझ्याकडे आहे. 16 डिसेंबरला ही चर्चा झाली आणि तेव्हा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला होता ...

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझा मुद्दा असा आहे की, नागपूर अधिवेशनातील सदनाचे रेकॉर्ड पाहून आपण या बाबतचा निर्णय घेणार आहात. मग तो मुद्दा येथे काढून त्यावर चर्चा करण्यात काय अर्थ आहे ? सभापतींचा अधिकार माननीय मंत्री महोदय कसा काय घेत आहेत ? ... अध्यक्ष महाराज, माननीय अर्थमंत्र्यांनी नागपूर अधिवेशनातील ते रेकॉर्ड काढून वाचण्यास सुरूवात केली आहे ... खरे तर आपण स्वत: याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. ... माननीय अर्थमंत्र्यांना अशा प्रकारे तो मुद्दा येथे काढून मूळ विषय बाजूला न्यायचा आहे ....

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.गडकरी यांनी माझ याबद्दल गैरसमज करून घेतला आहे. मी त्यांना विनंती करतो की, कृपया मला माझी बाजू येथे मांडू द्यात, नंतर आपण बोलू शकता ...

(सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.गडकरी बोलत असतात...)

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेता आणि माननीय अर्थमंत्री आपण दोघांनीही खाली बसावे. मी मघाशी सांगितले आहे की, त्या दिवसाचे प्रोसिडींग मी स्वत: तपासतो आणि त्यामध्ये जे योग्य आहे तेच ठेवले जाईल आणि जे योग्य नाही ते काढून टाकले जाईल. ...

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, तर मी असे सांगत होतो की, नागपूर ...

..... केके 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : माननीय अर्थमंत्र्यांना मी माहिती देऊ इच्छितो की, माननीय सभापतींनी दिलेल्या निर्णयावर सभागृहामध्ये चर्चा करायची नसते ....

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहाचे नियम मलाही माहीत आहेत. मी देखील 20 वर्षापासून या ठिकाणी सदस्य आहे ... अध्यक्ष महाराज, तर मी आपल्याला असे सांगत होतो की, ही चर्चा येथे का आली तर मागासलेल्या भागाचा जो अनुशेष आहे तो भरून काढण्यासाठी त्या भागांना पैसा मिळवा म्हणून. हा जो मुद्दा आहे त्या संदर्भात माझ्या हातामध्ये नागपूर अधिवेशनातील प्रोसिडींग आहे. त्यावेळी सन्माननीय श्री.गडकरी यांनी 500, 200, 100 कोटी द्या म्हणून सांगितले ....

(मा.विरोधी पक्षनेता श्री.गडकरी बोलत असतात .... अडथळा ...)

आणि त्यावेळी तत्कालीन पाटबंधारे मंत्री सन्माननीय श्री.अजित पवार यांनी ते मान्य केलेले आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी त्याची खात्री करून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. .... (अडथळा) ... अध्यक्ष महाराज, 31 मार्चला ते पैसे देऊ म्हणून आम्ही सांगितले होते आणि मला केवळ सभागृहाला एवढीच माहिती करून द्यायची आहे की, 31 मार्च 2005 रोजी आम्ही दिलेला शब्द पाळला आहे आणि 500 कोटी रुपये विदर्भ विकास मंडळाला देण्याची व्यवस्था झालेली आहे. ... (अडथळा) .... अध्यक्ष महाराज, ही बातमी केवळ मी आपल्याला सांगत आहे की, आपण गेल्या वर्षी हे केलेले आहे आणि पुढील वर्षी माननीय राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे करणार आहोत. ....

सभापती : सभागृहाचे कामकाज मी 15 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे. ..

सभागृहाची बैठक 3.04 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.

(यानंतर श्री.जागडे ..... एलएल 1 ...

अशुधीत प्रत / शोधनीसाठी नाही

(सभापतीस्थानी : मा उपसभापती)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही या सदनात तीन ते चार वैधानिक मुद्दे उपस्थित केले आहेत. ॲटर्नी जनरलना लोकसभेत आणि राज्यसभेत बोलाविण्याची प्रथा आहे. आता त्याना कायदेशीर बाबीचा सल्ला पाहिजे असेल तर ते मॅटर सुप्रिम कोर्टाकडे रेफर करतात. तसेच आपल्या विधीमंडळात प्रथा आहे. जेव्हा सदनात वैधानिक मुद्दे उपस्थित होत असतात, तेव्हा सरकारला ॲडव्होकेट जनरल सरकारच्या बाजुने आपले मत देत असतात.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

आणि म्हणून माझी आपणाला व सरकारला विनंती आहे. हा आपला अधिकार आहे. एक तर आम्ही उपस्थित केलेल्या तीन मुद्दयांच्या संदर्भात आपण आम्हाला उत्तर द्यावे की ते चूक आहे की बरोबर आहे? आपण सभागृहाचे सार्वभौम आहात. आम्ही काढलेले तीन मुद्दे पुन्हा सांगतो.

उपसभापती : मला माहीत आहेत...

श्री. नितीन गडकरी : या तीन मुद्दयांपैकी डायरेक्शन्स चेंज होतात, अमेंडमेंट होतात त्या डायरेक्शन्सनेच होतात. श्री. शंकरन साहेबांनी तसे पत्रामध्ये म्हटले आहे की, तुम्ही आम्हाला नवीन डायरेक्शन्स द्या किंवा जुन्या डायरेक्शन्स सुधारुन द्या. आणि या ठिकाणी चार पानी पत्र मिळाले आहे की, तुमच्या मताशी सहमत आहे. हे पत्र काही डायरेक्शन्स होऊ शकत नाही. म्हणून डायरेक्शन्स या डायरेक्शन्सने अमेंडमेंट झाल्या नसतील तर ओरिजिनल डायरेक्शन्स रेकॉर्डवर आहेत....

उपसभापती : सभागृहाची बैठक मी 3.45 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे. दरम्यानच्या काळात माननीय विरोधी पक्ष नेते आपण स्वत:, सन्माननीय श्री. बी. टी. देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेब व सन्माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी कृपया माननीय सभापतींच्या दालनामध्ये चर्चेसाठी यावे.

सभागृहाची बैठक 3.21 मिनिटांनी, 3.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

<u>सभापतीस्थानी - तालिका सभापती(श्री.अनंत तरे)</u>

तालिका सभापती : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 3.45 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.अशोक मोडक)

तालिका सभापती (डॉ.अशोक मोडक) : तुर्तास सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 1 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता तहकूब झाली.)

--

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

सभापतीस्थानी माननीय सभापती

सभापती :औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने आज या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते,श्री. नितीन गडकरी, सन्माननीय प्रा. बी. टी. देशमुख, सन्माननीय दिवाकर रावते, विधान परिषद सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी तसेच सन्माननीय वित्त मंत्री, श्री. जयंत पाटील या सर्वांनी एका अत्यंत महत्वाच्या विषयाच्या अनुषंगाने साधक-बाधक चर्चा या सदनामध्ये केली. ज्या चर्चेचा उगम मला वाटते 1983-84 पासून या महाराष्ट्राच्या सर्वांगींण विकासाच्या अनुषंगाने झाला. त्या गोष्टीचा उल्लेख सन्माननीय प्रा. बी.टी. देशमुख साहेबांनी या औचित्याच्या मुद्दाच्या अनुषंगाने जे विचार मांडले त्यामध्ये केला. 1984 मध्ये त्यावेळेसचे मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतदादा पाटील यांनी संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्वागीण विकासाचा निर्णय घेत असतांना विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र की, ज्यामध्ये कोकण आहे. उत्तर महाराष्ट्र आहे. या संपूर्ण सर्व विभागांचा समतोल विकास करण्याच्या अनुषंगाने दांडेकर समिती स्थापन केली. 1984 मध्ये त्या समितीचा रिपोर्ट आपल्याला उपलब्ध झाला. त्यानंतरच्या काळात ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्राच्या विधानसभेने आणि विधान परिषदेने घेतला. आणि या महाराष्ट्रामध्ये विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या तिन्ही विभागांच्या अनुषंगाने वैधानिक विकास मंडळाची निर्मिती व्हावी अशा पध्दतीचा तो ऐतिहासिक निर्णय आहे. त्या निर्णया नंतर सुध्दा दहा वर्षा नंतर प्रत्यक्ष 1984 मध्ये या देशाच्या घटनेप्रमाणे राष्ट्रपतीनी घटनेच्या कलम 371 (2) खाली याबाबतीमध्ये महाराष्ट्रामध्ये विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र अशी वैधानिक विकास मंडळे जाहीर केली. आणि त्या त्या विभागातील जी प्रगती आहे,किंवा त्या त्या विभागामध्ये असणारा अनुशेष आहे, तो अनुशेष पूर्ण व्हावा या अनुषंगाने माननीय नामदार राज्यपाल त्याना घटनेच्या कलम 371 (2) खाली अधिकार दिले. ते अधिकार दिल्या नंतर महाराष्ट्रामध्ये दर वर्षी बजेटमध्ये माननीय नामदार राज्यपाल यांनी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या विभागामध्ये विशेषत: सिंचन विभागाच्या दृष्टीने आणि अन्य 8 वेगवेगळया सेक्टरच्या अनुषंगाने त्या त्या विभागातील विकासाची कामे पूर्ण करण्याकरिता तरतुदी करण्यासाठी या पध्दतीने काही सूचना दिल्या आणि डायरेक्टिव्हज् दिल्या.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा. सभापती .....

आज या औचित्याच्या मुद्दयाच्या माध्यमातून सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि मी मघाशी सांगितल्या प्रमाणे सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, माननीय वित्तमंत्री श्री. जयंत पाटील, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी या सर्वांनी या ठिकाणी विचार मांडत असताना यामध्ये माननीय राज्यपालांना असणारे जे वैधानिक अधिकार आहेत त्या अधिकाराच्या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा या विभागाला ज्या काही तरतुदी देणे आवश्यक आहे, किंबहुना त्या तरतुदी बंधनकारक आहेत, त्या तरतुदी देण्याच्या दृष्टीने ज्या काही डायरेक्टीव्हज आहेत त्या डायरेक्टीव्हज माननीय राज्यपालांनी दिल्यानंतर त्या पध्दतीने तरतुदी झाल्या किंवा कसे याबाबतीतील माहिती सदनाला द्यावी अशा पध्दतीचा अट्टहास गेली तीन वर्षे सातत्याने झाला. त्या त्या वेळी ही चर्चा सदनामध्ये झाली आणि त्यानंतर त्याबाबतीतील तरतुदी या ठिकाणी सांगितल्या आणि त्या तरतुदीच्या बरहुकुम त्या त्या विभागामध्ये विकास होईल यादृष्टीने प्रयत्न झ ाले. आज सुध्दा त्या अनुषंगाने जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये माझ्या दृष्टीने एक अत्यंत महत्वाचा मुद्दा होता. मी या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट करीन की, माननीय राज्यपालांनी दिलेले जे आदेश असतील, मग त्याला डायरेक्टीव्हज म्हणा किंवा लेटर्स म्हणा, त्याबाबतीमध्ये या सदनामध्ये कोणतीही चर्चा करणे योग्य आहे असे मला वाटणार नाही. म्हणून मी असे सांगेन की, आपल्या मनामधील जी अपेक्षा आहे त्या अपेक्षेव्यतिरिक्त माननीय राज्यपालांचे जे अधिकार आहेत त्याबाबतीत या ठिकाणी अनवधानाने कोणतीही चर्चा झालेली असेल तर ती आपण कामकाजातून बाजूला काढू. फक्त वैधानिक विकास मंडळाच्या अनुषंगाने विशेषत: विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राच्या बाबतीमध्ये ज्या काही तरतुदी करणे बंधनकारक आहे त्या अनुषंगाने जी परिस्थिती आहे त्यांच्या बाबतीमध्ये किमान दोन ते अडीच तास चर्चा झाली आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने जे काही निष्कर्ष निघतील त्याच्यावर कोणता निर्णय घ्यावयाचा याबाबतीतमध्ये या ठिकाणी आपण आपली मते मांडली, अचूक मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला आणि त्याबाबतीत मी असे सांगेन की, माननीय वित्त मंत्र्यांनी सुध्दा या बाबतीमध्ये सर्व कायदेशीर मुद्दे तपासून घ्यावेत. मला आवश्यकता असेल तर त्या पध्दतीने त्यांच्याकडून ती माहिती मी जरुर घेईन. त्याबाबतीत त्यांनी संपूर्ण सखोल अभ्यास करावा. मी याबाबतीतील निर्णय मंगळवार रोजी या सदनामध्ये देईन.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

मा. सभापती .....

औचित्याच्या मुद्दयाच्या बाबतीमध्ये मी वेगळा काही निर्णय देण्यापेक्षा याबाबतीत निर्माण झालेला जो विषय आहे त्याबाबतीत तुम्ही केलेले जे मार्गदर्शन आहे त्या मार्गदर्शनावर मला आवश्यकता वाटली तर मी तुमचा सल्ला जरुर घेईन आणि त्यावेळी तो निर्णय देईन. एवढाच याबाबतीतील माझा निर्णय आहे. आज तो निर्णय मी राखून ठेवलेला आहे. आजचे उर्वरित कामकाज हे आज न घेता ते यानंतरच्या काळामध्ये आपण घेऊ. लक्षवेधी सूचना असतील किंवा अशासकीय काम असेल...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, याबाबतचा निर्णय आपण केव्हा देणार आहात ?

सभापती : याबाबतचा निर्णय मी मंगळवार रोजी देईन असे सांगितले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आजचे बाकीचे कामकाज आपण स्थगित करावे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्दयावरची चर्चा आपण थांबविलेली आहे. परंतु पुढचे जे सर्व कामकाज आहे, त्यामध्ये लक्षवेधी सूचना आहेत, अशासकीय कामकाज आहे, ते कामकाज आपण घ्यावयास पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रघात असा आहे की, आपण शुक्रवार दिवशी दुपारी साडेचारला सभागृहाचे कामकाज संपवितो. सन्माननीय सदस्यांना गावी जावयाचे असते.

सभापती : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. भुजबळ साहेबांना मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी मी आता जाहीर केले की, उर्वरित जे कामकाज आहे ते रहित होणार नाही. ते कामकाज नंतरच्या काळामध्ये आपण घेऊ. मी असा निर्णय घेतला आहे की, आजचे कामकाज आता आपण तहकूब करु.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 4 एप्रिल, 2005 रोजी दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 25 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 4 एप्रिल, 2005 च्या दुपारी 2.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही